नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १८६ * * नागपूर * मंगळवार, दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## भूस्खलनात आतापर्यंत २४ मृत्यू

■ वृत्तसंस्था, दार्जिलिंग/शिमला, दि. ६ :
पश्चिम बंगालमधील दार्जिलिंगमध्ये शनिवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे झालेल्या भूस्खलनात मृतांची संख्या २४ वर पोहोचली आहे. यामध्ये सात मुलांचा समावेश आहे. अनेक लोक अजूनही बेपत्ता आहेत, तर अनेक घरे ढिगाऱ्यात वाहून गेली आहेत.
दार्जिलिंग आणि सिक्कीममधील रस्ते संपर्क देशाच्या इतर भागापासून तुटला आहे. पर्यटन हंगामात, दार्जिलिंग आणि सिक्कीममध्ये २००० हून अधिक पर्यटक अडकले आहेत. दार्जिलिंग, जलपाईगुडी, कूचबिहार, कालिम्पोंग आणि अलीपुरद्वार जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी बाधित भागांना भेट दिली.

अग्राग्रलेख

## खरीखरी...

## सनातनी की तनातनी

आज एका तथाकथित सनातन धर्मिय वकिलाने सर्वोच्च न्यायालयामध्ये भारताचे सरन्यायाधीश गवई यांच्याकडे आपला जोडा भिरकावण्याचा प्रयत्न केला. सर्वोच्च न्यायालयातील सुरक्षा यंत्रणेने या तथाकथित सनातन धर्मियाला अटक केली आहे. हा वकील 14 वषार्पासून सर्वोच्च न्यायालयामध्ये वकिली करत आहे खरंतर वकील म्हणजे वकील असतात. वकिलांना कुठे 'कील' मारावी, कोठे दगड मारावा कुठे मेख मारावी, कुठे पाचर मारावी आणि कुठे शब्द वापरावेत हे साधे समजत नसेल तर त्याची वकिली अगदी नकली आहे असे समजावे. समाजात सर्व प्रकारचे लोक असतात, प्रत्येकाला आपला धर्म प्रिय असतो, कोणे एकेकाळी अशाच नकली सनातन धर्मियाने तुकाराम महाराजांबरोबर अनेक जारण-मारणाचे प्रयोग केले होते. त्या नकली सनातन्याला कोणीही आज ओळखत नाही. जीवनाचे तत्वज्ञान रोखठोक शब्दात वर्णन करणाऱ्या संत तुकाराम महाराजांना आजही संपूर्ण जग ओळखते. अजून एक उदाहरण द्यायचे झाले तर फक्त संत नव्हे, खरेखुरे राष्ट्रसंत गाडगेबाबा कोणत्याही गावात गेल्यावर आधी त्या गावाची साफसफाई करीत. त्या गावातील घाण स्वच्छ करीत असत. त्यांचा नेहमीच असा उपदेश असायचा की, मुलांना शिक्षण द्या शिकवा. माणसातील देव बघा आणि ओळखा, मंदिरात घाण करून देव प्रसन्न होत नाही देव देव्हाऱ्यात नाही तो मनुष्याच्या अंतरंगात असतो. हे गाडगेबाबांनी सर्वांना शिकवले. एका कीर्तनामध्ये मानवतेचे आणि स्वच्छतेचे धडे देत ते निरूपण करीत होते. तेव्हा त्यांच्या मुलाच्या निधनाची तार आली, तरीही त्यांनी आपले चित्त ढळू न देता शांतपणे कीर्तन चालू ठेवले. ते म्हणाले, हजारो लोक रोज मारतात मी एकासाठी कशाला रडू , हा खरा सनातन धर्म आहे. कारण 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा देव तेथेचि जाणावा' हे संत तुकारामांचे वचन ज्या माणसाला समजले तो खरा साधू आणि तोच खरा सत्पुरुष आहे. भगवद्गीतेमध्ये स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगताना भगवान श्रीकृष्णांना जेव्हा अर्जुन याबाबत विचारतो तेव्हा स्वतः भगवान श्रीकृष्ण काय बोलले ते पाहूया, जेव्हा अर्जुनाने भगवंतांना विचारले,

*स्थिरावला समाधींत स्थित-प्रज्ञ कसा असे*
*कृष्णा सांग कसा बोले कसा राहे फिरे कसा ।*
*तेव्हा वसुदेवसुत भगवान म्हणाले की,*
*कामना अंतरातील सर्व सोडूनि जो स्वयें*
*आत्म्यांतची असे तुष्ट तो स्थित-प्रज्ञ बोलिला ।*

खरा स्थितप्रज्ञ, संयमी आणि सधर्मी असा असतो. पण सनातन धर्माच्या नावाखाली धिंगाणा घालण्याचे पेव सध्या फुटलेले आहेत. समाजामध्ये प्रेम भावापेक्षा वैरभाव कसा वाढेल याची शर्यत लागलेली आहे. महात्मा गांधी यांनी सत्य आणि अहिंसा यांची शास्त्रोक्त शस्त्रे बनवून भारताला सनातन धमार्ची खरी ओळख दिली. त्यामुळेच आज जगभरातील प्रत्येक देशात महात्मा गांधींचा पुतळा आहे. महात्मा गांधींच्या पुतळ्याला दोन ऑक्टोबर रोजी राहुल गांधी यांनी राजघाटावर जाऊन श्रद्धांजली अर्पण केली नाही म्हणून, बोंबा करणाऱ्या लोकांना हे माहीतच नव्हते की राहुल गांधी त्यावेळी ज्या देशामध्ये होते. त्या देशातील गांधीजींच्या पुतळ्याच्या चरणी त्यांनी आपली श्रद्धांजली अर्पिली होती. आपल्या देशात गंमत अशी आहे की नको त्या गोष्टीचे भांडवल करण्याचा भलताच सोस आपल्याला लागलेला आहे. वैष्णव जण तो तेणे कहीएं , जो पिड पराई जाणे रे, पण दुसऱ्याची पीडा दूर करण्याऐवजी त्या पीडेला आपल्या उपयोगासाठी वापरणाऱ्या कृत्याचे कोण समर्थन करील. सर्वोच्च न्यायालयातील आजची घटना आणि घोषणा कोणताही सच्चा सनातनधर्मी सहन करू शकणार नाही. आपल्या देशात संविधानाप्रमाणे कायद्याचे राज्य आहे. या कायद्याचे राज्यात काही नियम असतात ते नियम पालन करणे त्या न्यायालयाशी संबंधित वादी, प्रतिवादी, वकील आणि त्या अधिकार कक्षेतील सर्वांनीच हे नियम पाळले पाहिजेत. एखाद्या गुन्हेगारी वृत्तीच्या आरोपीने असा गुन्हा केला असता तरी ते एक वेळ खपले असते. पण जो कायद्याचा कीस काढतो अशा वकिलाने आज जे काही घृणास्पद कार्य केले आहे. ते म्हणजे जिथे आपण जेवण करतो तिथेच विष्ठा विसर्जन करण्यासारखे आहे. कायद्याप्रमाणे त्याला जी शिक्षा व्हायची ती होईलच, किंबहुना सरन्यायाधीशांनी मोठ्या मनाने त्याला माफ केले असेल किंवा करतीलही. पण सनातन धर्माला डाग लावणाऱ्या या वकीलरुपी तथाकथित सनातन धर्मीयाला खराखुरा सनातनी कधीच माफ करणार नाही, एवढे मात्र खरे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## सर्वोच्च न्यायालयात सीजेआय गवई यांच्यावर

# हल्ल्याचा प्रयत्न

### सनातनचा अपमान सहन करणार नाही म्हणत वकिलाने फेकला बूट

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. ६ :
सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश बीआर गवई यांच्यावर सोमवारी हल्ला करण्याचा प्रयत्न एका वकिलाने केला, जेव्हा सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठ एका प्रकरणाची सुनावणी करत होते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वकील डेस्कवर गेला, त्याने त्याचा बूट काढला आणि सरन्यायाधीशांवर फेकण्याचा प्रयत्न केला. न्यायालयाच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला पकडले आणि घेऊन गेले.

कोर्टातून बाहेर पडताना वकिलाने घोषणाबाजी केली, "आम्ही सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही." या घटनेनंतर, सरन्यायाधीशांनी न्यायालयात उपस्थित असलेल्या वकिलांना त्यांचे युक्तिवाद सुरू ठेवण्यास सांगितले. ते असेही म्हणाले, "या सर्व गोष्टींनी त्रास देऊ नका. मलाही या गोष्टींनी त्रास होत नाही; या गोष्टीने मला काही फरक पडत नाहीत."

मध्य प्रदेशातील खजुराहो येथे भगवान विष्णूंच्या ७ फूट उंच, शिरच्छेदित पुतळ्याच्या जीर्णोद्धारावर सरन्यायाधीश गवई यांच्या टिप्पण्यांमुळे वकिलाला राग आला असावा असे मानले जात आहे. सरन्यायाधीशांनी मूतीर्चा खटला फेटाळून लावत म्हटले की, "जा आणि देवाला ते स्वतः करायला सांगा. तुम्ही भगवान विष्णूचे कट्टर भक्त असल्याचा दावा करता, जा



आणि त्यांची प्रार्थना करा."

खजुराहो येथील जवारी (वामन) मंदिरातील भगवान विष्णूच्या ७ फूट उंच तुटलेल्या मूर्तीच्या जीर्णोद्धाराची मागणी करणारी याचिका फेटाळण्यात आली. याचिकाकर्त्याने असा दावा केला आहे की मुघल आक्रमणादरम्यान मूतीर्चे नुकसान झाले होते आणि तेव्हापासून ती त्याच स्थितीत आहे. म्हणून, सर्वोच्च न्यायालयाने भाविकांच्या पूजा करण्याच्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी आणि मंदिराचे पावित्र्य पुनर्संचयित करण्यासाठी या प्रकरणात हस्तक्षेप करावा.

या प्रकरणातील याचिकाकर्ता राकेश दलाल यांनी या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आणि हा निर्णय त्यांच्या धार्मिक भावनांचा अपमान असल्याचे म्हटले. राकेश यांच्या मते, न्यायालयाने असेही स्पष्ट केले की ही मूर्ती मूळ स्थितीत राहील. पूजा करू इच्छिणारे भाविक दुसऱ्या मंदिरात जाऊ शकतात.

## नगरपरिषदा व नगरपालिकांसाठी

# महिला आरक्षण जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ६ :



राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची घोषणा करण्यात आली. एकूण 247 नगरपालिका आणि 147 नगरपंचायतीसाठी ही सोडत मंत्रालयात काढण्यात आली. या प्रक्रियेनंतर 33 नगरपरिषदांपैकी 17 नगरपरिषदांमध्ये अनुसूचित जातीच्या महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला जानेवारी महिन्याअखेर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याचे निर्देश दिल्यानंतर प्रशासन तयारीला लागले आहे.

त्यानुसार आज मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात मंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत काढण्यात आली.

या आरक्षण प्रक्रियेत महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. विशेषतः अनुसूचित जातीच्या महिलांना 17 नगरपरिषदांमध्ये संधी देण्यात आली आहे. मोहोळ, ओझर, भुसावळ, शिर्डी, दिग्रस, अकलूज आणि बीडसारख्या प्रमुख नगरपरिषदांमध्ये महिलांना आरक्षण मिळाल्याने स्थानिक राजकारणात नवीन नेतृत्व उदयास येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

देऊळगावराजा, मोहोळ, तेल्हारा, ओझर, वानाडोंगरी, भुसावळ, घुग्गूस, चिमूर, शिर्डी, सावदा, मैनदर्गी, दिगडोहदेवी, दिग्रस, अकलूज, बीड आणि शिरोळ या 17 नगरपरिषदांसाठी अनुसूचित जाती महिला प्रवर्ग आरक्षित करण्यात आले आहे.

64 नगरपरिषदांपैकी 34 नगर परिषदांमधील नगराध्यक्षपद हे ओबीसी महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. त्यात इगतपुरी, भोकरदन, जुन्नर, दौंड, माजलगाव, कर्जत, रोहा यांसारख्या महत्त्वाच्या शहरांचा समावेश आहे.

या व्यतिरिक्त, भगूर, विटा, बल्हारपूर, धाराशिव, उमरेड, कुळगाव बदलापूर, हिंगोली, फुलगाव, मुरुड जंजीरा, शिरूर, काटोल, मूल, मालवण, देसाईगंज, हिवरखेड, अकोट, मोर्शी, नेर- नवाबपूर, औसा, देगलूर, चोपडा, सटाणा, दोंडाईचा वरवडे, बाळापूर, कुरडुवादी, धामणगावरेल्वे आणि वरोरा या नगरपरिषदांचाही समावेश ओबीसी महिला आरक्षित यादीत आहे.

भगूर, इगतपुरी, विटा, बल्हारपूर, धाराशिव, भोकरदन, जुन्नर, उमरेड, दौंड, कुलगाव बदलापूर, हिंगोली, फुलगाव, मुरुड जंजीरा, शिरूर, काटोल, माजलगाव, मूल, मालवण, देसाईगंज, हिवरखेड, अकोट, मोर्शी, नेर-नवाबपूर, औसा, कर्जत, देगलूर, चोपडा, सटाणा, दोंडाईचा वरवडे, बाळापूर, रोहा, कुरडुवादी, धामणगावरेल्वे, वरोरा नगरपरिषदा ओबीसी महिलांसाठी राखीव करण्यात आल्या आहेत. आरक्षण जाहीर होताच कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारल्याचे दिसून येत आहे.

## सरन्यायाधीशांवरील हल्ल्याचा निषेध

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :



सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ला देशासाठी धोक्याची घंटा असल्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिला आहे.

सरन्यायाधीशांवर अशा प्रकारे हल्ल्याचा प्रयत्न होणे हा केवळ न्यायवस्थेचाच नव्हे तर लोकशाही, संविधान व संपूर्ण देशाचा घोर अवमान आहे, असे ते म्हणालेत. राज्यातील इतरही अनेक नेते तथा प्रतिष्ठित व्यक्तींनी गवईंवर त्यांच्या न्यायदालनात झालेल्या कथित हल्ल्याचा जोरकस शब्दांत निषेध केला आहे.

शरद पवार म्हणाले, लोकशाही आणि संविधानाच्या मूल्यांना आधार मानून वाद-प्रतिवादातून न्याय्य भूमिकेकडे जाण्यासाठी न्यायव्यवस्था असते. त्याच न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च संस्थेत मुख्य न्यायमूर्तींवरच अशा प्रकारे हल्ल्याचा प्रयत्न होणं हा केवळ न्यायव्यवस्थेचाच नव्हे तर लोकशाहीचा, संविधानाचा आणि देशाचा घोर अवमान आहे. आपल्या देशात पेरलं जाणारं विष आता संविधानाच्या सर्वोच्च संस्थांनाही जुमानत नाही, ही देशासाठी धोक्याची घंटा आहे.

**हा हल्ला मनुवादी विचारसरणीचा द्योतक - वडेट्टीवार**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी हा हल्ला काही लोकांच्या डोक्यात खोलवर रुजलेल्या मनुवादी विचारधारेचे प्रतिक असल्याचा आरोप केला आहे. सर्वोच्च न्यायालयात आज सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर एक वकिलाने वस्तू फेकून हल्ला करण्याचा प्रयत्न केला याचा आम्ही निषेध करतो.

**भाजपच्या प्रशिक्षण केंद्राची ही निर्मिती - संजय राऊत**

खासदार संजय राऊत यांनीही या हल्ल्याचा निषेध केला आहे. सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश भुषण गवई यांच्यावरील हल्ल्याचा प्रयत्न हा डॉ आंबेडकर आणि संविधानावरील थेट हल्ला आहे. हल्लेखोर बेगडी हिंदुत्ववादी आहेत. भाजपच्या प्रशिक्षण केंद्राची ही निर्मिती आहे, असे राऊत म्हणालेत.

## रुग्णालयात आग, ८ रुग्णांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, जयपूर, दि. ६ :
जयपूरमधील सवाई मानसिंग (एसएमएस) रुग्णालयाच्या ट्रॉमा सेंटरच्या आयसीयूमध्ये रविवारी रात्री उशिरा आग लागली. या घटनेत 3 महिलांसह 8 रुग्णांचा मृत्यू झाला.
ट्रॉमा सेंटरमधील न्यूरो आयसीयू वॉर्डच्या स्टोअररूममध्ये रात्री ११:२० वाजता आग लागली, जिथे कागद, आयसीयू उपकरणे आणि रक्त सॅम्पलर ट्यूब साठवले जात होते. जयपूरच्या एसएमएस रुग्णालयात मृतांची संख्या आता आठ झाली आहे. दिगंबर वर्मा यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. यापूर्वी प्रशासनाने सात रुग्णांच्या मृत्यूची पुष्टी केली होती.

## वैद्यकीय विद्यार्थिनीवर महिनाभर बलात्कार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ६ :
दिल्लीत एका १८ वर्षीय एमबीबीएस विद्यार्थिनीवर महिनाभर बलात्कार झाला. पीडितेने शुक्रवारी (३ ऑक्टोबर) एफआयआर दाखल केला, ज्याची माहिती आता जाहीर करण्यात आली आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका २० वर्षीय तरुणाने तिला पार्टीच्या बहाण्याने दिल्लीतील आदर्श नगर येथील एका हॉटेलच्या खोलीत नेले. त्याचे दोन मित्रही तिथे होते. तिघांनी तिच्यासोबत पेय ओतले. तरुणी बेशुद्ध पडल्यानंतर, मुख्य आरोपीने तिच्यावर बलात्कार केला तर इतर दोन पुरुषांनी ही घटना रेकॉर्ड केली.

## बिहारमध्ये दोन टप्प्यात विधानसभा निवडणुका

### ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी मतदान १४ नोव्हेंबरला निकाल जाहीर

■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. ६ :
बिहारमधील निवडणुका दोन टप्प्यात होतील. ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी मतदान होईल आणि १४ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होतील.

निवडणूक प्रक्रिया ४० दिवस चालेल. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत सांगितले की, या निवडणुकांसाठी एसआयआर अंतर्गत मतदार यादी अपडेट करण्यात आली आहे. नामांकनाच्या १० दिवस आधीपर्यंत गहाळ नावे जोडता येतील. अशा मतदारांना नवीन मतदार कार्ड मिळतील.
बिहार विधानसभेत २४३ जागा आहेत, ज्या अंदाजे ७४.२ दशलक्ष मतदारांचे प्रतिनिधित्व करतात. यामध्ये १०० वर्षांवरील १४,००० मतदारांचा समावेश आहे. मतदान केंद्रांवर प्रवास करण्यास असमर्थ असलेले लोक फॉर्म १२डी भरून घरून मतदान करू शकतील. राज्यातील १४ लाख मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. बिहारमधील मतदान केंद्रांवर मोबाईल फोन घेऊन जाण्याची परवानगी असेल.
निवडणूक आयोग २२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करणार आहे. सर्व पक्षांनी आयोगाला छठ सणानंतर मतदान करण्याची विनंती केली आहे. त्यामुळे राज्यात दोन टप्प्यात मतदान होण्याची अपेक्षा आहे.

## ३ शास्त्रज्ञांना वैद्यकशास्त्रातील नोबेल

■ वृत्तसंस्था, स्कॉटहोम, दि. ६ :



२०२५ चा वैद्यकशास्त्रातील नोबेल पुरस्कार मेरी ई. ब्रुनको, फ्रेड रॅम्सडेल आणि शिमोन साकागुची यांना परिधीय रोगप्रतिकारक सहनशीलतेच्या क्षेत्रातील संशोधनासाठी देण्यात आला आहे.
त्यांनी शरीराची शक्तिशाली रोगप्रतिकारक शक्ती कशी नियंत्रित केली जाते हे शोधून काढले जेणेकरून ती चुकून आपल्या स्वतःच्या अवयवांवर हल्ला करू नये. आपली रोगप्रतिकारक शक्ती आपल्याला दररोज हजारो आणि लाखो सूक्ष्मजीवांपासून वाचवते.

हे सर्व सूक्ष्मजीव वेगवेगळे दिसतात. अनेकांनी मानवी पेशींचा वेष घेण्याची क्षमता देखील विकसित केली आहे, ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्तीला कोणत्यावर हल्ला करायचा आणि कोणत्याचे संरक्षण करायचे हे ओळखणे कठीण होते. या तिघांना १० डिसेंबर रोजी स्टॉकहोममध्ये ९ कोटी रुपयांचे बक्षीस, सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र देण्यात येईल.

ब्रुनको, रॅम्सडेल आणि साकागुची यांनी ही प्रक्रिया समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी नियामक टी-पेशी, रोगप्रतिकारक शक्तीचे "रक्षक" ओळखले, ज्या सुनिश्चित करतात की रोगप्रतिकारक पेशीने आपल्या स्वतःच्या शरीरावर हल्ला करू नये.

याच्या आधारे, कर्करोग आणि स्वयंप्रतिकार रोगांवर उपचार शोधले जात आहेत. शिवाय, हे शोध अवयव प्रत्यारोपणात देखील मदत करत आहेत. शिवाय, आता अनेक उपचारांवर क्लिनिकल चाचण्या सुरू आहेत.

मेरी ब्रँकोव्ह आणि फ्रेड रॅम्सडेल यांनी २००१ मध्ये आणखी एक मोठे संशोधन केले. त्यांनी उंदरांचा एक विशिष्ट प्रकार ऑटोइम्यून रोगांना विशेषतः संवेदनशील का आहे याचा शोध घेतला. त्यांना आढळले की या उंदरांमध्ये फॉक्सपी३ नावाच्या जनुकात उत्परिवर्तन होते.

शिवाय, त्यांनी दाखवून दिले की मानवांमध्ये याच जनुकातील उत्परिवर्तनांमुळे आयपीईएक्स हा गंभीर ऑटोइम्यून रोग होतो. दोन वर्षांनंतर, साकागुची यांनी या संशोधनात भर घालून दाखवले की फॉक्सपी३ जनुक १९९५ मध्ये ओळखलेल्या पेशींच्या विकासावर नियंत्रण ठेवतो. या पेशी, ज्यांना आता नियामक टी-पेशी म्हणतात, इतर रोगप्रतिकारक पेशींचे निरीक्षण करतात आणि आपली रोगप्रतिकारक शक्ती स्वतःच्या ऊतींना नुकसान पोहोचवत नाही याची खात्री करतात.

साकागुची यांनी स्वयंप्रतिकार रोगांपासून संरक्षण करणाऱ्या रोगप्रतिकारक पेशी शोधून काढल्या.

## म्हणून आनंदाचा शिधा बंद?

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ६ :
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतांना त्यांच्या कार्यकाळात गरीब, गरजूंसाठी आनंदाचा शिधा वाटप पुरवठा विभागाकडून करण्यात येत होता.



ही योजना कायम राहिल्यास एकनाथ शिंदेंचे नाव होऊ शकते.त्यांचे नाव होऊ नये म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आनंदाचा शिधा बंद केला, अशी खरमरीत टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. लाडकी बहीण योजना देखील लवकरच बंद केली जाईल, असेही ते म्हणाले.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमरावती विभागीय आढावा बैठकीसाठी हर्षवर्धन सपकाळ अकोल्यात आले असतांना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सत्ताधाऱ्यांवर गंभीर आरोप केले.सत्ताधारी पक्षातील नेत्यांमध्ये कुरघुडी सुरू आहे. एकनाथ शिंदेंना मोठेपण मिळू नये, म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंदाचा शिधा योजना बंद केली.

आता काही महिन्यांमध्ये लाडकी बहीण योजना देखील बंद केली जाईल. बिहार निवडणुकीत भाजपची प्रचंड वाताहत होणार आहे. या निवडणुकीत भाजपच्या विरोधात मतप्रवाह आहे. बिहार राज्यातील राहुल गांधींच्या जनता यात्रेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

राहुल गांधींनी मतचोरीचे गंभीर प्रकरण चव्हाट्यावर आणल्याने भाजपची चांगलीच कोंडी झाली. बिहारच्या निवडणुकीत त्याचा निश्चित प्रभाव पडेल, असा विश्वास हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.

स्थानिक संस्थांच्या निवडणुका काँग्रेस पूर्ण ताकदीने लढणार आहे. या निवडणुकांमध्ये पक्षाला यश मिळण्यासाठी मोचेर्बांधणी केली. विभागनिहाय आढावा घेतला जात आहे. निवडणुकांच्या दृष्टीने स्थानिक पदाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

या निवडणुकीमध्ये काँग्रेसने युती करण्याचे अधिकार स्थानिक पातळीवर दिले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीची चर्चा ही स्थानिक पातळीवर केली जाईल, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

## ७ राज्यांतील ८ जागांवर विधानसभा निवडणुका जाहीर

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ६ :
निवडणूक आयोगाने सात राज्यांमधील आठ विधानसभा जागांसाठी पोटनिवडणुकांची घोषणा केली आहे. या जागांसाठी ११ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे आणि १४ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होतील. जम्मू आणि काश्मीरमधील बडगाम आणि नागरोटा, राजस्थानमधील अंता, झारखंडमधील घाटशिला (एसटी), तेलंगणातील जुबली हिल्स, पंजाबमधील तरनतारन, मिझोरममधील दंपा आणि ओडिशातील नुआपाडा विधानसभा मतदारसंघात निवडणुका होणार आहेत.
जम्मू आणि काश्मीरमधील बडगाम आणि नागरोटा या दोन विधानसभेच्या जागा ऑक्टोबर २०२४ पासून रिकाम्या आहेत. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी गंदरबल जागा कायम ठेवण्याचा निर्णय घेतल्याने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर बडगाम जागा रिक्त झाली. २१ ऑक्टोबर २०२४ पासून ही जागा रिक्त आहे. दुसरीकडे, आमदार देवेंद्र सिंह राणा यांच्या निधनानंतर ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी नगरोटा जागा रिक्त झाली.

राजस्थानमधील बारन जिल्ह्यातील अंता विधानसभा जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे, जी कंवरलाल मीणा यांनी आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झाली होती. विधानसभेच्या अशा रिक्त जागांवर निवडणूक जाहीर झाली आहे.

# आमदारांच्या खर्चाला चाप!

## विधिमंडळ समित्यांचे सर्व दौरे रद्द

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :
राज्यातील पूरस्थिती आणि प्रशासनिक व्यस्ततेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने सर्व समित्यांचे दौरे रद्द करण्याचे आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे आमदारांमध्ये नाराजीची चिन्हे दिसत आहेत, कारण समित्यांच्या दौऱ्यांमुळे त्यांना स्थानिक भागातील कामकाजाचे प्रत्यक्ष निरीक्षण करता येते.
विधानमंडळातील समित्या सरकारच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी स्थापन केल्या जातात. सभागृहातील चर्चेत वेळ मर्यादित असल्याने, समित्यांच्या माध्यमातून सभागृहात थेट चचेर्साठी वेळ नसलेल्या विषयांवर सखोल निरीक्षण करता येते. समितीचे सदस्य दौरे करून प्रशासनाच्या कामकाजाचा आढावा घेतात आणि अहवाल विधिमंडळाला सादर करतात. मात्र, हे अहवाल सरकारवर बंधनकारक नसतात.

**समित्यांमध्ये सदस्य आणि मागील तक्रारी**

विधानमंडळाच्या समित्यांमध्ये दोन्ही सभागृहांचे सदस्य सामील असतात. काही वेळा दौऱ्यादरम्यान आमदारांनी अधिकाऱ्यांकडून महागड्या भेटवस्तू मागितल्याच्या तक्रारी



मांडल्या गेल्या आहेत. पूर्वी बाबासाहेब कुपेकर यांच्या अध्यक्षतेत काही आमदारांच्या दौऱ्यांवर बंदी घालण्यात आली होती, मात्र त्या वेळी काही आमदार नाराज झाले होते. आता पुन्हा दौरे रद्द केल्याने अशीच नाराजी निर्माण होण्याची शक्यता आहे.


**आदेशाचे स्वरूप व समित्यांची संख्या**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने आदेश दिला आहे की, राज्यातील अतिवृष्टीमुळे विविध उपाययोजना करण्यात स्थानिक प्रशासन व्यस्त असल्याने पुढील आदेशांपर्यंत मुंबई शहर व उपनगर वगळता राज्यातील सर्व जिल्ह्यांत समित्यांचे दौरे आयोजित करू नयेत. विधानमंडळात 15 पेक्षा अधिक समित्या कार्यरत आहेत. त्यात लोकलेखा, अंदाज, सार्वजनिक उपक्रम, उपविधान, नियम, अनुसूचित जाती व जमाती कल्याण, महिलांचे हक्क व कल्याण, अल्पसंख्याक, विशेषाधिकार अशा विविध समित्यांचा समावेश आहे.

यापूर्वी धुळे दौऱ्यात अंदाज समिती प्रमुखांच्या सचिवांच्या कक्षातून 1 कोटी 84 लाख रुपयांची रोकड सापडल्याने राज्य राजकारणात मोठी खळबळ उडाली होती. ही खोली शिंदे गटाचे आमदार अर्जुन खोतकर यांच्या सहाय्यक किशोर पाटील यांच्या नावावर आरक्षित असल्याचे समोर आले होते.

या घटनेनंतरच विधानमंडळ समित्यांच्या दौऱ्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. धुळ्यातील या रेस्ट हाऊसमध्ये आढळलेल्या बेहिशेबी रोकड प्रकरणानंतर विधानसभेच्या समित्यांचा विषय आता पुन्हा चर्चेत आला आहे.

## लाडकी बहीण योजनेमुळे सर्वच खात्यांना निधीची कमतरता



**मुंबई :** राज्यात आर्थिक ओढाताण अधिक तीव्र होत चालली असताना अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी लाडकी बहीण योजना, आनंदाचा शिधा आणि शिवभोजन थाळी यांसारख्या योजनांवरील निधीअभावाची स्पष्ट कबुली दिली आहे. लाडकी बहीण योजना 35 ते 40 हजार कोटी रुपयांवर जाते, त्यामुळे काही गोष्टी यंदा करता येणार नाहीत, असे सांगत भुजबळ यांनी सरकारच्या आर्थिक मर्यादांचा उल्लेख केला. निधीअभावामुळे योजनांमध्ये ओढाताण होणार असल्याचेही भुजबळ म्हणाले.राज्य सरकारकडून सणासुदीच्या काळात आनंदाचा शिधा वाटप केला जायचा. मात्र, आता ही योजना बंद पडणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. 2023 मध्ये सरकारने गुढीपाडवा, आंबेडकर जयंती, गणेशोत्सव आणि दिवाळी यावेळी 'आनंदाचा शिधा' वाटप केले होते. परंतु यंदाच्या गणेशोत्सव आणि दिवाळीत सरकारकडून आनंदाच्या शिधाबाबत कोणतीही हालचाल झाली नाही. त्यामुळे 'शिवभोजन थाळी' प्रमाणेच ही योजना देखील निधीअभावी बंद होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ यांनी आपली भूमिका मांडली आहे. छगन भुजबळ यांनी आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. लाडकी बहीण योजना 35 ते 40 हजार कोटी रुपयांवर जाते. तेवढे पैसे काढायचे म्हटल्यास सगळीकडेच या गोष्टीचा फटका बसतो, असे मला स्वतःला वाटत असल्याचे भुजबळ म्हणाले. राज्यात पावसामुळे शेतीची प्रचंड हानी झाली असून, त्यालाही मोठ्या प्रमाणावर निधी द्यावा लागणार आहे. त्यामुळे निधीची ओढाताण होत राहणार आहे. म्हणून काही गोष्टी यावर्षी करता येणे शक्य नाही, अशी प्रतिक्रिया छगन भुजबळ यांनी दिली.

# झवेरी बाजार परिसराचा कायापालट करणार : मुख्यमंत्री

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** अनेक दशकांचा वारसा आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचा वाटा असलेल्या झवेरी बाजार परिसराला रत्न आणि आभूषण उत्सवामुळे सध्या नवे रूप आले आहे. या बाजार परिसराची पुनर्रचना आणि सुशोभीकरण करण्यासाठी झवेरी बाजार वेल्फेअर असोसिएशनने पुढाकार घ्यावा, राज्य शासनाच्या वतीने त्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबईच्या ऐतिहासिक दागिने बाजाराचे वैभव, परंपरा आणि आर्थिक महत्त्व पुन्हा प्रदर्शित करण्यासाठी झवेरी बाजार वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने प्रथमच 'झवेरी बाजार जेम्स अँड ज्वेलरी फेस्टिव्हल 2025' चे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव 22 सप्टेंबर ते 26 ऑक्टोबर 2025 दरम्यान आयोजित करण्यात आला असून 6 ते 16 ऑक्टोबर 2025 दरम्यान चालणाऱ्या मुख्य




प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झवेरी बाजार परिसरात झाले. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, झवेरी बाजार वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष हितेश जैन, सचिव किशोर जैन यांच्यासह ज्वेलरी क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, झवेरी बाजार हा भारतीय रत्न व दागिने उद्योगाचा कणा असून, येथील कारागिरीला जगभरात मान्यता आहे. काळानुसार अडचणी असूनही झवेरी बाजाराने आपली परंपरा व वैभव टिकवले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून येथील व्यापाऱ्यांना जागतिक स्तरावरील व्यापाऱ्यांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध झाली आहे. भारताच्या निर्यात क्षेत्रात या उद्योगाचा मोठा वाटा असून व्यावसायिकांनी आपल्या क्षमता वाढवत न्याव्यात, या उद्योगाचे अर्थव्यवस्थेतील योगदानही वाढतच राहील. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नेहमी अडचणींमध्ये संधी शोधण्याची प्रेरणा देतात, त्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावर कितीही अडचणी आल्या तरीही रत्न व दागिन्यांच्या बाजाराचे महत्त्व कधीही कमी होणार नाही, उलट भविष्यात तो अधिक विस्तारेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

झवेरी बाजार वेल्फेअर असोसिएशन आणि इंडिया गोल्ड मेटाव्हर्सदरम्यान यावेळी सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार व्यापारामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्यापार अधिक सक्षम करण्यात येणार आहे. या कराराचेही मुख्यमंत्र्यांनी स्वागत केले. झवेरी बाजाराला प्रदर्शनाच्या रूपात साकारण्यात आलेला हा उपक्रम असेच वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे सांगून संपूर्ण परिसरच एका प्रदर्शन क्षेत्रात रूपांतरित झाला आहे. त्याचप्रमाणे कार्यक्रमात पारंपरिक सांस्कृतिक वारसा, परंपरा आणि आधुनिक सजावटीचे दर्शन घडविण्यात आले आहे. लोकमान्य टिळक, सावित्रीबाई फुले, विविध देवींच्या नावाने असलेली प्रवेशद्वारे, राम मंदिराची भव्य प्रतिकृती अशा विषयांवर आधारित सजावट करण्यात आली आहे, याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी आयोजकांचे कौतुक केले. रत्न आणि आभूषण क्षेत्रात उत्कृष्ट योगदान दिलेल्या उद्योजकांचा यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. झवेरी बाजार वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष हितेश जैन यांनी या उत्सवासाठी राज्य शासन, पर्यटन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई पोलीस यांचे सहकार्य लाभल्याबद्दल आभार मानले.

## मोदींकडून महाराष्ट्रासाठी नवा अध्याय
### ७५ हजार तरुणांना रोजगारक्षम प्रशिक्षण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** महाराष्ट्रातील तरुणांसाठी एक सुवर्णसंधी! पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ८ ऑक्टोबर रोजी सुरू होणाऱ्या मुख्यमंत्री अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम उपक्रमामुळे राज्यभरात रोजगारक्षमतेचा नवा अध्याय लिहिला जाणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या या योजनेत राज्यातील तब्बल ७५,००० प्रशिक्षणार्थ्यांना आधुनिक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन ऑनलाइन पद्धतीने होणार असून, राज्यभरात ६०० ठिकाणी एकाचवेळी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या समारंभात विश्वकर्मा समाजातील पारंपरिक कारागीरांचा सन्मानही केला जाणार आहे.

राज्यातील ४१९ शासकीय आयटीआय आणि १४१ तांत्रिक विद्यालयांमध्ये एकूण २,५०६ तुकड्या सुरू होत आहेत. या



माध्यमातून पुढील वर्षापर्यंत एक लाख प्रशिक्षणार्थ्यांना लाभ मिळवून देण्याचा निर्धार विभागाने व्यक्त केला आहे.

या अभ्यासक्रमांमध्ये ड्रोन तंत्रज्ञान, इलेक्ट्रिक वाहन, सोलर ऊर्जा, सायबर सुरक्षा, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ग्रीन हायड्रोजन, मोबाईल रिपेअरिंग, सोशल मीडिया इन्फ्लुएंसर अशा नवयुगीन विषयांचा समावेश आहे. महिलांसाठी स्वतंत्र ३६४ विशेष बॅचेस सुरू होणार असून, गडचिरोली, लातूर, नागपूर आणि अमरावती येथे स्थानिक उद्योगांनुसार विशेष प्रशिक्षण केंद्रे उभारली जाणार आहेत.

## ओल्या दुष्काळसाठी राज्यभर एल्गार आंदोलन

■ **महासागर प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर, दि. ६ :** राज्यात ओला दुष्काळ लागू करा, शेतकरी शेतमजुरांचे संपूर्ण कर्ज माफ करा व नुकसानीची रास्त भरपाई सर्व नुकसानग्रस्तांना द्या या प्रमुख मागण्यांसाठी येत्या १० ऑक्टोबर रोजी राज्यभर आंदोलन करण्याची हाक देण्यात आली आहे. अखिल भारतीय किसान सभा, सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीटू) व अखिल भारतीय शेतमजूर युनियन या संघटनांच्या संयुक्त ऑनलाईन बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती कॉ. डॉ. अजित नवले यांनी दिली. ओल्या दुष्काळासंदर्भातील मागण्यांबाबत या तीनही संघटनांनी नुकताच मराठवाड्याचा संयुक्त दौरा केला. मराठवाडा विभागातील आठही जिल्ह्यांचा एक जबरदस्त मोर्चा या प्रश्नांसाठी ३० सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयावर काढण्यात आला.

# आनंदाचा शिधा बंद होणार
### सरकारकडून कोणतीही हालचाल न झाल्याने नाराजीचे वातावरण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** राज्यातील सर्वसामान्य जनतेला सणासुदीच्या काळात थोडासा दिलासा मिळावा, त्यांच्या घरात गोडधोडाची चव टिकून राहावी, या हेतूने सुरु करण्यात आलेली राज्य सरकारची 'आनंदाचा शिधा' योजना आता बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. गेल्या दोन वर्षांत ही योजना अनेक गरीब कुटुंबांसाठी दिलासा ठरली होती. परंतु यंदाच्या गणेशोत्सव आणि दिवाळीत सरकारकडून कोणतीही हालचाल न झाल्याने गोरगरीब जनतेमध्ये नाराजीचे वातावरण आहे. 'शिवभोजन थाळी' प्रमाणेच ही योजना देखील निधीअभावी बंद होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

'आनंदाचा शिधा' योजनेअंतर्गत राज्यभरातील रेशन दुकानदारांकडून प्रत्येक पात्र शिधापत्रिकाधारकाला केवळ 100 रुपयांत एक किलो चणा डाळ, साखर आणि एक लिटर खाद्यतेल दिले जात होते. यामुळे गोरगरीब कुटुंबांच्या घरात सणासुदीच्या काळात स्वयंपाकघर




उजळून निघायचे.

2023 मध्ये सरकारने गुढीपाडवा, आंबेडकर जयंती, गणेशोत्सव आणि दिवाळी यावेळी 'आनंदाचा शिधा' वाटप केले होते. त्याचबरोबर 2024 मध्ये अयोध्येतील राममंदिराच्या प्राणप्रतिष्ठा आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्तानेही या किट्स वितरित करण्यात आल्या. मात्र, यंदा या योजनेबाबत कोणतीही घोषणा झाली नसल्याने दिवाळीपूर्वीच्या उत्साहावर विरजण पडले आहे.

## सरन्यायाधीशांवरील हल्ला देशासाठी धोक्याची घंटा : शरद पवार



**मुंबई :** सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ला देशासाठी धोक्याची घंटा असल्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिला आहे. सरन्यायाधीशांवर अशा प्रकारे हल्ल्याचा प्रयत्न होणे हा केवळ न्यायवस्थेचाच नव्हे तर लोकशाही, संविधान व संपूर्ण देशाचा घोर अवमान आहे, असे ते म्हणालेत. राज्यातील इतरही अनेक नेते तथा प्रतिष्ठित व्यक्तींनी गवईंवर त्यांच्या न्यायदालनात झालेल्या कथित हल्ल्याचा जोरकस शब्दांत निषेध केला आहे. सरन्यायाधीश भूषण गवई आज सकाळी आपल्या न्यायदालनात न्यायदानाचे काम करत होते. त्यावेळी एका वकिलाने आपला बूट काढून त्यांच्या दिशेने फेकण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तिथे उपस्थित सुरक्षा रक्षकांनी तत्काळ त्या व्यक्तीच्या मुसक्या आवळल्या. प्रत्यक्षदर्शींच्या मते, सनातन का अपमान, नहीं सहेगा हिंदुस्तान, अशी नारेबाजी हल्लेखोराने यावेळी केली. या अनपेक्षित घटनेमुळे देशाच्या न्यायव्यवस्थेत एकच खळबळ माजली आहे. शरद पवारांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.

### कोल्ड्रिफ कफ सिरपमुळे एमपीत बालकांचे मृत्यू
## राज्य सरकार अलर्ट मोडवर




**मुंबई :** मध्य प्रदेश आणि राजस्थान राज्यांमध्ये कफ सिरपच्या सेवनामुळे बालकांचा मृत्यू झाल्याच्या धक्कादायक घटनांनी देशभरात खळबळ उडाली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य अन्न व औषध प्रशासन विभागाने सावधगिरीचा उपाय म्हणून तातडीने टोल फ्री हेल्पलाइन क्रमांक सुरू केला आहे. राज्यातील सर्व मेडिकल दुकानांना आणि रुग्णालयांना संबंधित औषधाचा साठा तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कोल्ड्रिप सिरप नावाचे हे औषध मे 2025 ते एप्रिल 2027 या कालावधीतील बॅचमध्ये उत्पादन झालेले असल्यास ते अत्यंत धोकादायक ठरू शकते. या सिरपमध्ये डायइथिलीन ग्लायकोल हा विषारी रसायन घटक आढळला आहे. या रसायनामुळे शरीरातील मूत्रपिंड आणि यकृताचे कार्य थांबून गंभीर विषबाधा होऊ शकते, असा प्राथमिक अहवालात उल्लेख आहे. मध्यप्रदेश आणि राजस्थानमध्ये याच सिरपच्या सेवनानंतर काही बालकांचा मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्यानंतर प्रशासनाने सावधगिरीचा इशारा दिला आहे. महाराष्ट्रातही अशी औषधे उपलब्ध असल्याची शक्यता लक्षात घेऊन तात्काळ तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

# बसचा अपघात, एक ठार, चार जण जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** दादर परिसरात शनिवारी रात्री प्लाझा येथील बस थांब्याजवळ बेस्ट बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात एक पादचारी ठार झाला असून, एका महिलेसह चार प्रवासी गंभीर जखमी झाले. घटनास्थळी पोलीस, बेस्ट उपक्रमातील अधिकारी व इतर अत्यावश्यक पथक पोहचले. त्यानंतर जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमींवर रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

बेस्ट उपक्रमातील मातेश्वरी कंपनीची बस शनिवारी रात्री बेस्ट मार्ग क्रमांक १६९ वर धावत होती. ही बस वरळी आगारावरून प्रतीक्षानगर आगाराकडे जात होती. रात्री ११.३० च्या सुमारास बस प्लाझा बस थांब्याजवळ येत असताना दादर टीटीकडून शिवाजी पार्कच्या दिशेने भरधाव वेगात जाणाऱ्या एका टेम्पो ट्रॅव्हलरच्या चालकाचे नियंत्रण सुटले. या टेम्पोने थेट बसला पुढील बाजूच्या उजव्या चाकाला जोरदार धडक दिली. जोरदार धडक बसताच बेस्ट बस डावीकडे वळली. बस थांब्यावर उभ्या प्रवाशांना आणि पादचाऱ्यांना चिरडत बस पुढे गेली.

या अपघातात बसचे पुढील चाक तुटले, समोरील काचही तुटल्या. बेस्ट बसला धडकल्यानंतर टेम्पो ट्रॅव्हलरने रस्त्यावर उभ्या असलेली एक टॅक्सी आणि एका खासगी मोटारीही धडक दिली. यात दोन्ही गाड्यांचे मोठे नुकसान झाले. या अपघातात पादचारी शहाबुद्दीन (३७) जागीच ठार झाला. अपघातानंतर त्यांना तातडीने शीव रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी शहाबुद्दीन यांना मृत घोषित केले. याव्यतिरिक्त अन्य चार जण या अपघातात जखमी झाले. राहुल अशोक पडाले (३०), रोहित अशोक पडाले (३३), अक्षय अशोक पडाले (२५) आणि विद्या राहुल मोते (२८) अशी या चौघांची नावे आहेत.

# नाशिकमध्ये खंडणीसाठी गोळीबार

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ६ :** हॉटेल व्यावसायिकाकडून १० टक्के प्रोटेक्शन मनी वसूल करण्यासाठी दहशत निर्माण करण्याकरता शनिवारी मध्यरात्री २.३० वा. हॉटेल ऑरामध्ये केलेल्या गोळीबारात एक ग्राहक गंभीर जखमी झाला. सुदैवाने मांडीत गोळी लागल्याने त्याचा जीव वाचला. हॉटेलात वाद झाल्यानंतर हॉटेल व्यावसायिकाकडून प्रोटेक्शन मनी ही टोळी घेत असल्याचे तपासात समोर आले. धक्कादायक बाब म्हणजे हॉटेलमध्ये माजी नगरसेवकपूत्र भूषण लोंढे याच्या टोळीतील काही सदस्य वाद घालायचे. वाद मिटवण्यासाठी लोंढे हाच मध्यस्थीची १० टक्के रक्कम घेत होता. याप्रकरणी भूषण लोंढेसह १३ जणांवर गुन्हा दाखल केला असून पथकाने रात्रीच शुभम पाटील उर्फ भुरा, आकाश उर्फ अभिजीत अडांगळे, दुर्गेश वाघमारे या संशयितांना अटक केली.

सहायक निरीक्षक ज्ञानेश्वर भडांगे यांच्या तक्रारीनुसार शनिवारी मध्यरात्री २.३० वाजता नाइस संकुल येथील हॉटेल ऑरा बार अँड रेस्टॉरंट येथे काही तरुणांमध्ये भांडण सुरू होते. वाद मिटवण्यासाठी भूषण लोंढे वत्यांच्या टोळीचे शुभम पाटील उर्फ भुरा, प्रिंस सिंग, दुर्गेश वाघमारे, आकाश उर्फ अभिजीत अडांगळे, राहुल गायकवाड, सनी विठ्ठलकर, शुभम निकम, वेदांत चाळगे आणि पाच संशयित हॉटेलमध्ये आले.

## देवेंद्र भुजबळ लिखित "माध्यमभूषण" प्रकाशित

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** आकाशवाणी, दूरदर्शनचे निमार्ते, कॅमेरामन, संकलक, रंगभूषाकार, चित्रपट पटकथा लेखक, दिग्दर्शक,तंत्रज्ञ, जाहिरात, जनसंपर्क, प्रकाशन अशा विविध माध्यमातील व्यक्तींच्या जीवन कथा उलगडणारे, निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ लिखित "माध्यमभूषण" या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच मुंबईतील हॉलिडे इन मध्ये करण्यात आले. या पुस्तकामुळे वाचकांना माध्यमांचे अंतरंग समजून घेता येईल असा विश्वास विवेक प्रकाशनाचे संपादक रवींद्र गोळे यांनी या वेळी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, विविध माध्यमांमधून विविध सेलिब्रिटी, विविध घटना, प्रसंग, कथा नेहमीच आपल्यासमोर येत असतात. पण हे सर्व आपल्यासमोर सादर करणाऱ्या व्यक्ती नेहमीच पडद्याआड राहून, आपली भूमिका बजावत असतात. या पुस्तकामुळे अशा सर्व व्यक्तींचे योगदान किती अमूल्य आणि अपरिहार्य असते हे आपल्याला जाणून घेता येईल.


अमेरिकास्थित ज्येष्ठ अभियंते तथा सामाजिक बांधिलकी



मानणारे विनोद बापट या वेळी बोलताना म्हणाले की, या पुस्तकात भारताबरोबरच अमेरिका, सिंगापूर, नेदरलँड्स या देशातील व्यक्तींच्या जीवन कथा आणि त्यांचे माध्यमातील कार्य यावरही लिहिले असल्याने ,त्या त्या देशातील जीवन, समाज रचना, भारतीय व्यक्तींचे योगदान वाचकांना कळू शकेल. रामायणफेम कॅमेरामन अजित नाईक यांनी सांगितले.



# महर्षी वाल्मिकी-भक्तीतून वाल्मिकी रामायण महाकाव्यापर्यंत



भारतीय संस्कृतीत ज्या ऋषींनी मानवतेला आध्यात्मिक मार्गदर्शन दिले, त्यामध्ये महर्षी वाल्मिकी यांचे स्थान अत्युच्च आहे. वाल्मिकी रामायण या अद्वितीय ग्रंथाचे रचयिता, संस्कृत साहित्यातील प्रथम महाकाव्य रचणारे आणि 'आद्यकवी' म्हणून ओळखले जाणारे वाल्मिकी ऋषी हे केवळ कवी नव्हते, तर ते महान तत्वज्ञ, सदगुरू, आणि समाजसुधारक देखील होते. नामस्मरणातून प्राप्त झालेले दिव्यज्ञान वाल्मिकी ऋषींच्या जीवनात घडलेले आमूलाग्र परिवर्तन हे त्यांच्या नामस्मरणाच्या सातत्याने आणि तपश्चर्येनें शक्य झाले.

वाल्मिकी ऋषी नी त्यांचा जीवनप्रवास नामस्मरनाचे सिद्दीतून सिद्ध केला.त्यांचा दैदिप्यमान ज्ञानसिंधू जीवनप्रवास हेच सिद्ध करतो की दृढ इच्छाशक्ती, गुरुकृपा आणि प्रभुनाम यामुळे कोणताही मनुष्य सद्गती प्राप्त करू शकतो. प्रभू श्रीरामांचे दिव्य रूप, त्यांचे आदर्श, त्यांचे चरित्र आणि जीवनमूल्ये यांचे अत्यंत सूक्ष्म व प्रभावी चित्रण त्यांनी वाल्मिकी रामायण ग्रंथामध्ये केले आहे. विशेष म्हणजे, राम जन्माच्या हजार वर्षे आधी या महाकाव्याची रचना झाली, हे केवळ अद्भुतच नव्हे, तर दिव्यता सिद्ध करणारे आहे.



**उमेश महादेवराव ढोणे**
**सहआयोजक**
**महर्षी वाल्मिकी जयंती महोत्सव समिती, अमरावती जिल्हा**
**मो.: ९०४९०६७३३१**

### ज्ञानाचा दीप पेटवणारे काव्य

'वाल्मिकी रामायण' हे फक्त एक ग्रंथ नाही, तर ती धर्म, नीतिमत्ता, कर्तव्य, भक्ती, प्रेम आणि सत्य यांचे जीवनमूल्य सांगणारी ज्ञानगंगा आहे. जवळपास २४,००० संस्कृत श्लोकांतून रचलेले हे महाकाव्य आजही मानवतेसाठी एक अमोल ठेवा आहे. प्रत्येक श्लोकात प्रभू श्रीरामांच्या जीवनातील विविध पैलूंना उलगडले आहे. हे श्लोक फक्त ऐतिहासिक वा पौराणिक दृष्टिकोनातून नव्हे, तर आत्मिक उन्नतीसाठी मार्गदर्शक ठरतात.

### आदर्श गुरू, जीवनशिक्षक

महर्षी वाल्मिकी हे केवळ कवि नव्हते, तर एक महान शिक्षक होते. "गुरू ब्रह्मा, गुरू विष्णु, गुरु देवो महेश्वरा" या श्रेणीत समाविष्ट होणाऱ्या या महान ऋषींनी शिक्षण, संस्कार आणि आत्मपरिवर्तनाचे महत्व संपूर्ण मानवजातीस पटवून दिले. त्यांच्या जीवनकथेने आपणांस सांगितले की, कोणताही माणूस अज्ञान, अधर्म, अंधार यांपासून दूर जाऊन प्रकाश, ज्ञान, आणि धर्ममार्गाचा स्वीकार करू शकतो.

### सध्याच्या समाजाला दिलासा देणारे आदर्श

आजच्या धावपळीच्या, संघर्षमय युगात महर्षी वाल्मिकी यांच्या जीवनातून आणि रामायणातून आपणास संयम, सहनशीलता, सत्यनिष्ठा, आणि सदाचाराचे मूल्यमापन करता येते. व्यक्तीने जर स्वतःच्या अंतरंगात डोकावले, आत्म्याचा आवाज ऐकला आणि प्रभुनामात स्वतःला विलीन केले, तर ईश्वराचे साक्षात्कार होणे अशक्य नाही, हे महर्षी वाल्मिकी सांगतात.

### समाजप्रबोधन आणि प्रेरणा

महर्षी वाल्मिकी यांचा जीवनप्रवास हीच साक्षरतेची, परिश्रमाची, आणि सकारात्मक परिवर्तनाची प्रेरणा आहे. हजारो वर्षांपूर्वी जेव्हा समाज अंधश्रद्धा, हिंसा आणि अज्ञानात होता, तेव्हा या ऋषींनी लेखनीचा वापर करून सत्य, धर्म, भक्ती आणि ज्ञान, ज्ञानसाधना, नामस्मरण या साधनेवर जोर देतं प्रचार केला. हेच आजही समाजासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

### समारोप

महर्षी वाल्मिकी हे एक दैवी प्रेरणास्थान आहे. त्यांची जयंती म्हणजे केवळ एक उत्सव नाही, तर मानवतेसाठी आत्मपरीक्षणाचा, श्रद्धेचा, आणि नवनिमार्णाचा दिवस आहे. त्यांच्या जीवनशैलीचा आदर्श घेवून आपणही सत्य, प्रेम, सेवा आणि भक्तीच्या मार्गावर चालावं, हीच खरी त्यांना त्यांचे जयंतीनिमित्ताने प्रार्थना, वंदना ठरेल.

"जय महर्षी वाल्मिकी"
" कोटी कोटी प्रणाम "

# एमएसआरडीसीचे रस्ते प्रकल्प गुणवत्तापूर्ण आणि पूर्ण करावेत : मेघना साकोरे-बोर्डीकर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येणारी सर्व कामे वेळेत, गुणवत्तापूर्ण आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करावीत, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

निर्मल भवन, नरिमन पॉईंट येथील एमएसआरडीसी कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, सहसंचालक मनूज जिंदल, तसेच भू-सर्वेक्षण विभागाचे महाव्यवस्थापक रामदास खेडेकर आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, नागरिकांच्या सोयीसाठी आणि वाहतुकीच्या सुलभतेसाठी काटेकोरपणे कामे करावीत. प्रकल्पाच्या गतीमध्ये दिरंगाई चालणार नाही. प्रत्येक प्रकल्पाच्या तांत्रिक आणि भौगोलिक बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला असून या कामांमुळे अंतर कमी होणार आहे. वेळ आणि इंधनाची बचत होऊन प्रवास सुखकर होण्यास मदत होणार असून यासाठी नियोजनबद्ध अंमलबजावणीसाठी करण्याचे निर्देश राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

बैठकीत रेवस-रेड्डी राष्ट्रीय महामार्गातील गुहागर तालुक्यातील १३ ते १५ कि.मी रस्त्याचे पुनःसर्वेक्षण व फेररचना, विरार-अलिबाग महामार्ग, नाशिक शहर वतुर्ळाकार रस्ता (रिंग रोड) तसेच भंडारा-गडचिरोली द्रुतगती महामार्ग या प्रकल्पांच्या प्रगती अहवालाचे सादरीकरण करण्यात आले.

## मुंबईत ड्रोन व फ्लाइंग कंदील उडविण्यास बंदी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :** दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची सुरक्षितता आणि शांतताभंग होऊ नये यासाठी पोलिसांनी बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात ड्रोन व फ्लाइंग कंदील उडविण्यास आणि विकण्यास बंदी घातली आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये कारवाई करण्यात येणार आहे. मुंबई शहर व उपनगरात दिवाळीत फटाक्यांची आतषबाजी करण्यासह ड्रोन आणि फ्लाइंग कंदील उडविण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन आणि बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर्स, हॅण्ड ग्लायडर्स हॉट एअर बलून आदींच्या उड्डाण क्रियांना आकाशात उडविण्यास बंदी घालण्यात आली आहे.

# पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 'बीजेएस'चा पुढाकार

## निराधार विद्यार्थ्यांचे पालकत्व घेणार, सामाजिक दायित्व, वैद्यकीय सेवाही उपलब्ध करून देणार

■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. ६ :** अतिवृष्टीमुळे राज्यात मोठे नुकसान झाले असून, या संकटसमयी पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी भारतीय जैन संघटनेने (बीजेएस) पुढाकार घेतला आहे. निराधार विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारणार असून, शिक्षणासह वैद्यकीय सेवाही उपलब्ध करून देणार आहे. यंदा अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले. पिकांच्या रुपाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून घेतला. अनेकांच्या घरातही पुराचे पाणी घुसले. परिणामी गृहपयोगी साहित्य वाहून गेले. घरातील धान्याची नासाडी झाली. शैक्षणिक साहित्यही भिजले. दरम्यान भारतीय जैन संघटनेकडून पूरग्रस्तांना मदतीचा हात देणार आहे. याबाबत संघटेनेचे संस्थापक शांतिलालजी मुथा यांनी, राज्यातील पूरग्रस्त परिस्थितीबाबत ऑनलाइन मिटिंग आयोजित केली होती. या बैठकीत



राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर सांखला, राज्याध्यक्ष केतन शहा, राज्य महासचिव प्रवीण पारख, मॅनेजिंग डायरेक्टर कोमल जैन यांनीही मार्गदर्शन केले. भारतीय जैन संघटना ही गत ४० वर्षापासून राज्यातील सर्वच संकटप्रसंग व शेतकऱ्यांना सातत्याने सहकार्य करीत आलेली आहे. यावेळेही भारतीय जैन संघटनेच्या वतीने एक अॅक्शन प्लॅन तयार केला आहे. भारतीय जैन संघटनेने जिल्हाधिकारी वर्षा मीणा यांना निवेदन सादर केले. अकोल्यात झाली चर्चा अकोला येथे भारतीय जैन संघटनेच्या वतीने यासंदर्भात जिल्हाधिकारी वर्षा मीणा यांना एक निवेदन दिले. या वेळी भारतीय जैन संघटनेचे मार्गदर्शक प्रा. सुभाष गादिया, अकोला शहराध्यक्ष विमल जैन, सचिव नीलेश गोठी, पूर्वाध्यक्ष अॅड. दीपक जैन, डॉ. तुषार जैन, महिला जिल्हाध्यक्षा ममता जैन, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल येदवर, समाजसेवा अधीक्षक जगदीश वानखडे आणि वरिष्ठ लिपिक शुभांगी लिंगे उपस्थित होत्या. मदतीसाठी बीजेएसने नियोजन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने पूरग्रस्त भागात विस्थापितांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणार आहे. जैन समाजातील किंवा इतर डॉक्टरांशी संपर्क करून वैद्यकीय सेवा पुरवणार आहे. जिल्हा व तालुका पातळीवर कार्यकर्त्यांची फळी तयार करून त्यांनी करावयाच्या कामाचा अॅक्शन प्लॅन तयार करणार आहे. मंदिर किंवा स्थानकात संपर्क करून त्या ठिकाणी जीवदया संदर्भात जनावरांना चारा देण्यासाठी काय सहकार्य मिळू शकते, याबद्दल चर्चा करून निर्णय घेणार आहे. या वर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी पूरपरिस्थितीमध्ये अनेक ठिकाणी मनुष्यहानी झालेली आहे. अनेक लोक मृत्युमुखी पडले आहेत, त्यांच्या मुला-मुलींचे इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षणाची जबाबदारी बीजेएसकडून स्वीकारणार आहे. गेल्या १२ वर्षात राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अशा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींनाइयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत शैक्षणिक पुनर्वसनासाठी वाघोली येथे आणणार आहे. याबाबत संदर्भात जिल्हा प्रशासनाशी चर्चा करून निर्णय घेणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सहकार्य करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य : प्रा. मुकेश लोहिया



■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ६ :** आपण ज्या समाजात राहतो, ज्या समाजामुळे आपली अनेक कार्ये सिद्धीस जातात, त्या समाजाचे खरोखरच आपल्यावर खूप उपकार आहेत. परंतु आपण या समाजाचे काही देणे लागतो त्या समाजासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे ही भावना मात्र हल्ली बोटावर मोजण्या इतक्या लोकांमध्येच आपल्याला दिसून येते. परंतु असे असतानाही याला फाटा देणाऱ्या अनेक मोठ्या मनाच्या व्यक्तीही समाजात आहेत. यातीलच एक नाव म्हणजे प्रा. मुकेश लोहिया. शहरातील अत्यंत नामांकित ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयातून रसायनशास्त्र या विषयाचे विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून सेवानिवृत्त झालेले श्री लोहिया यांनी सेवानिवृत्तीनंतर लोकसेवा हेच आपले ब्रीद मानून स्वतःला समाजसेवेत झोकून दिलेले आहे. गोर-गरीबविद्यार्थी, शाळा महाविद्यालये,अंध विद्यालये अशा अनेक ठिकाणी श्री लोहिया त्यांना जमेल तसे सहकार्य करीत असतात. हरिना च्या माध्यमातून अवयवदान, देहदान व नेत्रदान याकरिता जनजागृती त्याचा प्रचार व प्रसाराचे कार्य सुद्धा श्री लोहिया सर मनोभावे करतात. मुख्याध्यापक दिलीप सदार हे ब्रिजलाल बियाणी मधील सरांचेच विद्यार्थी आहेत. श्री लोहिया सर व सदार यांना गायनाचा छंद असल्यामुळे रघुवीरचे चंद्रकांत पोपट यांच्या संगीत साधनां कराओके क्लब मध्ये गायनाच्या सरावादरम्यान यांच्या भेटी नेहमीच होतात. अशाच एका भेटीतील झालेल्या चर्चेमुळे श्री लोहिया सरांनी वीर वामनराव जोशी प्राथमिक शाळेला भेट देऊन शाळा पाहिली व विद्यार्थ्यांशीही चर्चा केली. व शाळेला संगणकांची अत्यंत गरज असल्यामुळे त्यांनी देणगी स्वरूपात शाळेकरीता तीन नवीन संगणक संच प्रदान केले. नुकत्याच झालेल्या नवरात्रोत्सवात महानवमीच्या दिवशी शाळेत आयोजित केलेल्या गरब्याच्या कार्यक्रमात श्री मुकेश लोहिया सर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असताना या कार्यक्रमादरम्यान माता अंबादेवी व एकवीरा देवी यांचे पूजनानंतर त्यांनी अनेक विद्यार्थी व पालकांच्या उपस्थितीत शाळेचे मुख्याध्यापक दिलीप सदार व समस्त कर्मचारीवृंद यांना तीन संगणक संच व इतर साहित्य शाळेकरीता प्रदान केले. त्यावेळी सर्व विद्यार्थी व पालकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत व कौतुक केले. यावेळी पालकांना मार्गदर्शन करीत असताना श्री लोहिया सरांच्या भावना अनावर झाल्या होत्या, 'शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी ही केवळ शाळेची,संस्थेची अथवा शिक्षकांची नाही तर समाजातील प्रत्येक घटकाची आहे, त्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सहकार्य करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, संपूर्ण जगात ५ करोड ८० लाखाच्या वर विद्यार्थी,तर एकट्या आपल्या भारतात पंधरा ते वीस लाख विद्यार्थी शाळेत अनेक कारणास्तव जाऊ शकत नाहीत, आपण सर्व विद्यार्थी खूप भाग्यवान आहात, आपण श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या वीर वामनराव जोशी प्राथमिक शाळेत शिक्षण घेत आहात, आपले मुख्याध्यापक दिलीप सदार हे माझेच विद्यार्थी आहेत, त्यांच्यासारखे सदैव शाळेचा विचार करणारे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव धावपळ करणारे उपक्रमशील व बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे व्यक्ती हेआपल्या शाळेचे मुख्याध्यापक आहेत. आपल्यासाठी अत्यंत मेहनत घेणारे शिक्षक व कर्मचारी वृंद आहे?.हे सर्व आपली स्वतःच्या मुलांसारखी काळजी घेतात. या सर्व गोष्टींचं सोनं आपण सर्वांनी करायला हवं. पुढेही मी सतत शाळेच्या संपर्कात राहून मला जे जे जमेल ते सर्व काही मी शाळेसाठी नक्की करेल.' असे आश्वासन प्रा.श्री मुकेश लोहिया यांनी यावेळी सर्व उपस्थित पालकांना व विद्यार्थ्यांना दिले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुजित खोजरे व आसावरी सोवळे यांनी केले. कार्यक्रमास ज्योती मडावी, सुजित खोजरे, आसावरी सोवळे, सचिन वंदे, मनीषा श्रीराव, विलास देठे, अमोल पाचपोर, चित्रा विघे, दिपाली गंगारे, इत्यादी कर्मचाऱ्यांसह प्रणाली व अविनाश माहुरे, ज्योती झांजोटे, शारदा तायडे, मोहिनी राऊत, भारती रत्नपारखी, मीना मरस कोल्हे, पल्लवी नेरकर, प्रीती प्रधान, निकिता बघेले, आरती पंचारिया,मनीषा सातोकर, रीना साळुंखे, पद्मा पवार, आरती वानखडे, कोमल श्रीवास इत्यादी पालकांसह विद्यार्थ्यांची भरगच्च उपस्थिती होती.

# घरकुल लाभार्थ्यांना त्वरित अनुदान वितरण केले जावे

## बाळापूर गटविकास अधिकारी यांना दिले निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
**वाडेगाव, दि. ६ :** बाळापूर पं. स. अंतर्गत येत असलेल्या ग्रा. पं. वाडेगाव येथील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर यादीतील ७०० ते ८०० लाभार्थी अद्याप पहिल्या हप्त्या पासून वंचित आहेत. तर उर्वरीत लाभार्थी हे पहिल्या हप्त्यानंतरच्या मिळणाऱ्या हप्त्यापासुन वंचित आहेत. या लाभार्थ्यांना त्वरित अनुदानाचे वितरण करा, अशा मागणीचे निवेदन वाडेगाव येथील भाजपाचे तालुका सरचिटनीस सुनिल शा मानकर व माजी ग्रा पं उपसरपंच सुनिल घाटोळ यांनी गटविकास अधिकारी यांना सादर केले आहे.



अंदाजे ३५ हजार लोकसंख्या असून, घरकुल लाभार्थी संख्या मोठी असल्यामुळे अंदाजे एक हजारांवर लाभार्थी मंजुर यादीमध्ये आहेत. त्यातील काही लाभार्थी यांनी घरकुल मिळेल आशेने आपली कच्चे घरे पाडून ठेवली आहेत. त्यांना अद्यापपर्यंत पहिला हप्ता सुद्धा मिळाला नाही. लाभार्थ्यांना चातका प्रमाणे प्रतीक्षा करावी लागत आहे. बरेच लाभार्थी असे आहेत की त्यांना पाहिला हप्ता कुणाला दुसरा हप्ता अनुदान मिळाले मात्र उर्वरित हप्ते बाकी असून ते सुद्धा प्रतीक्षा करत आहेत. लाभार्थ्यांचा संयमाचा बांध फुटण्याआधी लाभार्थी यांना अनुदान देण्यात यावे, यासाठी येथील ग्रामपंचायत उपसरपंच सुनील घाटोळ भाजपाचे तालुका सरचिटणीस सुनील मानकर यांनी बाळापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी बंडू नाना पजई यांना निवेदन दिले.

# टाकरखेड हे आदर्श गाव निर्माण करू

## सरपंच लता डहाके यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी
**उदयनगर, दि. ६ :** उदयनगर गाव स्वच्छ करणे ही काळाची गरज आहे. आपला परिसर स्वच्छ असल्यास विविध आजारांपासून बचाव होतो आणि आरोग्य सुदृढ राहते. गावाला सर्व सुविधा पुरवण्यासाठी आपण काम करत आहोत. सर्वांनी मिळून टाकरखेड हे आदर्श गाव म्हणून निर्माण करू, असे आवाहन सरपंच लता ज्ञानेश्वर डहाके यांनी केले. मुख्यमंत्री समृद्ध अभियानांतर्गत टाकरखेड येथे दि. २ ऑक्टोबर रोजी श्रम संस्कार शिबिर व स्वच्छता अभियान राबवण्यात आले. यावेळी सरपंच डहाके

**श्रम संस्कार शिबिर व स्वच्छता अभियान**

यांच्यासह ग्रामस्थांनी स्मशानभूमी, मंदिर व शाळा परिसरात स्वच्छता करून वृक्षारोपण केले. यावेळी सरपंच डहाके बोलत होत्या. यावेळी ग्राम सचिव माने, ज्ञानू डहाके, बाळू खरात, उमेश सुरोशे, तुळशीराम खपके, विकास डहाके, विवेक खेंते, पोलिस पाटील अनंता वाघ, समाधान खरात, ज्ञानेश्वर लंके, रेणुका खरात, कोकिळा काळे, बेबी शिंदे, राम थोरात, उद्धव गाडे आदी उपस्थित होते. स्वच्छता अभियानात सहभागी नागरिक.

# श्री बल्लाळ देवीच्या चरणी १९ लाख ६३ हजार अर्पण

## अमडापूर येथे नवरात्रोत्सवात भाविकांकडून देणगी

■ महासागर प्रतिनिधी
**उदयनगर, दि. ६ :** अमडापूर येथील श्री बल्लाळ देवी मंदिरात नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. दहा दिवस चाललेल्या नवरात्रोत्सवादरम्यान लाखो भाविकांनी दर्शन घेतले. या दरम्यान भाविकांनी आई जगदंबेच्या चरणी एकूण १९ लाख ६३ हजार २५७ रुपयांची देणगी अर्पण केली. श्री बल्लाळ देवी मंदिरात नवरात्रोत्सवादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. या कालावधीत विविध ठिकाणांवरून आलेल्या लाखो भाविकांनी देवीचे दर्शन घेतले. तसेच परिसरात भरवण्यात आलेल्या यात्रेचा आनंद घेतला. नवरात्रोत्सवाच्या कालावधीत भाविकांनी दिलेल्या दिलेले गुप्त दान आणि विविध माध्यमांतून केलेलेल्या देणगीची आज, दि. ३ ऑक्टोबर रोजी संस्थानच्यााया वतीने मोजणी करण्यात आली. यावेळी बल्लाळ देवी संस्थानचे अध्यक्ष वल्लभराव देशमुख, विश्वस्त मंडळ आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. मंदिराच्या दानपेटीत गुप्त देणगीच्या स्वरुपात ५ लाख ९४ हजार ४०० रुपये, पावतीच्या स्वरुपात ४ लाख ९५ हजार ४८७ रुपये, बाजार ७ लाख ४१ हजार १५०



रुपये, तर वस्त्र विक्रीच्या स्वरुपात १ लाख ३२ हजार २२० रुपये अशी एकूण १९ लाख ६३ हजार २५७ रुपयांची देणगी भाविकांनी अर्पण केल्याचे यावेळी सांगण्यात आले. मागील वर्षीपेक्षा यावर्षी देणगीत वाढ झाली असल्याचे संस्थानचे अध्यक्ष वल्लभराव देशमुख यांनी यावेळी सांगितले. भक्तांनी श्रद्धेने दिलेली ही देणगी संस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी खर्च केली जाते. याशिवाय बल्लाळ देवी संस्थानला दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. याच देणगीच्या आधारे संस्थानने आतापर्यंतचा नेत्रदीपक विकास साधला आहे. शेगाव येथे जाणाऱ्या दिंड्या येथे मुक्कामी असतात.

# कुलगुरूंचे हस्ते सदाशांती आधारगृहातील कु. रजनी हिचे सपत्नीक कन्यादान

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. ६ :** विद्यापीठ रोडवरील बहुउद्देशीय आरोग्य व समाजकल्याण संस्था द्वारा संचालित सदाशांती आधारगृहामधील कु. रजनी, कु. मंगला व कु. लक्ष्मी या कन्यांचा कन्यादान सोहळा नुकताच मोठ्या थाटात पार पडला.
यावेळी कु. रजनी हिचा विवाह चि. आकाश यांच्याशी, कु. मंगला हिचा विवाह चि. विजय, तर कु. लक्ष्मी हिचा विवाह चि. योगेश कुमार यांच्याशी संपन्न झाला.
यावेळी कु. रजनी व चि. आकाश यांचे कन्यादान संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथील पदव्युत्तर संगणकशास्त्र विभागातील डॉ. श्वेता मिलिंद बारहाते यांच्या आशीर्वादाने पार पडले. संत गाडगे बाबांच्या दशसूत्री संदेशामध्ये गरीब तरुण - तरुणींचे लग्न हा मोलाचा संदेश



दिला आहे. त्याचे पालन कुलगुरूंनी सपत्नीक करुन संत गाडगे बाबांचे विचार पुढे नेण्यास फार मोलाची मदत केली आहे. याप्रसंगी शुभाशिर्वाद देतांना कुलगुरू म्हणाले, सदाशांती आधारगृहाचे डॉ.एस.पी. इंगळे व सचिव प्रमोदिनी इंगळे आपल्या आईवडीलांचा वारसा पुढे नेत आहेत.
ज्यांचे कोणीही नाही, अशा निराधार मुलामुलींना आधार देण्याचे व त्यांना मोठे करण्याचे महान कार्य संस्थेच्यावतीने आजवर अखंडपणे केल्या जात आहे. समाजाकरीता ही निश्चितच भूषणावह व आदर्शमय बाब आहे. तीनही मुलींचा लग्न सोहळा याठिकाणी संपन्न झाला.
कु. रजनीचे कन्यादान करण्याचे भाग्य आम्हाला मिळाले असून तीनही जोडप्यांना विवाहाकरीता आणि त्यानंतर त्यांचे भावी जीवन सुखसमाधानाने जावो, अशा सदिच्छा देवून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ सदैव त्यांच्या पाठीशी राहील, असे आश्वासन कुलगुरूंनी याप्रसंगी दिले.

# "एक तीर एक कमान, सर्व आदिवासी एक समान



**बुलढाण्यात मोर्चाद्वारे आदिवासींचा आक्रोश!**

■ महासागर प्रतिनिधी
**बुलडाणा, दि. ६ :** राज्यात आरक्षणावरून रान पेटले असून विविध समाजांतर्फे आरक्षणविषयक मागण्यांसाठी आंदोलने करण्यात येत आहे. राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील आणि जागृत बुलढाणा जिल्ह्यातही हेच चित्र आहे. जिल्ह्याच्या तेराही तालुक्यांत आरक्षणाच्या मागण्यांवरून मोर्चे, धरणे, आदी आंदोलने सुरू आहे. मागील एक महिन्यापासून या आंदोलनाचा धडाका सुरूच आहे. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या बुलढाणा शहरात आज, सोमवारी, ६ ऑक्टोबरला सकल आदिवासी समाजातर्फे आदिवासी आरक्षण बचाव आक्रोश मोर्चा काढण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयावर आज काढण्यात आलेला हा मोर्चा सर्वसामान्य स्थितीतील आदिवासी समाजाचे शक्तिप्रदर्शन ठरला. भगवान एकलव्य यांच्या प्रतिमा असलेले वेगवेगळ्या रंगाचे ध्वज, हाती तीरकमान घेऊन अस्सल आदिवासीची वेशभूषा साकारलेले युवक, हाती असलेले फलक, महिलांची लक्षणीय उपस्थिती, ढोल-ताशांच्यागजरावर थिरकणारे युवक, मोर्चाने फुलून गेलेले रस्ते, पोलिसांचा बंदोबस्त, असा या मोर्च्याचा थाट होता.
बंजारा आणि धनगर समाजाने केलेल्या अनुसूचित जमातीतील आरक्षण मागणीच्या विरोधात आदिवासी हक्क व आरक्षण बचाव कृती समितीच्यावतीने बुलढाण्यात आक्रोश मोर्चा काढण्यात आला. शहरातील जयस्तंभ चौकातील वीर एकलव्य पुतळ्यापासून हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर हजारो आदिवासी बांधवांसह धडकला. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले. आदिवासी आरक्षण बचाव आक्रोश मोर्चाच्या नेत्या नंदिनी टारपे, एकलव्य संघटनेचे प्रदेश सचिव मधुकर पवार, आदिवासी पारधी संघटनेचे विदर्भ सचिव गजानन सोळंके, एकलव्य भिल्ल समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मोरे यांच्या मार्गदर्शनात काढण्यात आलेल्या या मोर्चात हजारो आदिवासी बांधवांची उपस्थिती होती. मोर्चादरम्यान आदिवासी बांधवांनी ऋएक तीर एक कमान, आदिवासी एक समान, अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता.

# 'भुलाबाई'ला जपण्याचा वसा!

**बुलढाणा :** आजच्या संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्पर्धेच्या युगात बुलढाणा जिल्ह्यासह महाराष्ट्रातील अनेक जुन्या परंपरा, उत्सव, संस्कृती लोप पावत चालल्या आहेत. 'केजी वन'पासून दप्तरांचे जड ओझे आणि शैक्षणिक क्षेत्रातील स्पर्धेत मुलांचे बालपण हरवले आहे! शारीरिक, मानसिक आरोग्यासाठी घातक भ्रमणध्वनीवरील 'गेम'मुळे बालमंडळी मैदानाकडे येत नाहीत. असाच शहरी तर सोडाच पण ग्रामीण भागातूनही हद्दपार होण्याच्या मार्गावर असलेला एक उत्सव म्हणजे भुलाबाई. भुलाबाई उत्सवाची परंपरा बुलढाणा जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये कशीबशी टिकून आहे. भुलाबाई उत्सव हा विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशातील महिला, मुलींचा एक पारंपरिक सण. अनंत चतुर्दशीला गणेश विसर्जन झाल्यावर भाद्रपद पौर्णिमेपासून भुलाबाईची स्थापना केली जाते. हा सण कोजागिरी पौर्णिमेपर्यंत साजरा केला जातो. या उत्सवात भुलाबाई ही पाहुणी म्हणून एका घरात येते आणि या काळात टिपऱ्या खेळणे, पारंपरिक गाणी म्हणणे व प्रसाद वाटणे, असे कार्यक्रम केले जात.

# सामाजिक बंधन म्हणूनच आदर्श विवाह आचार संहितेचे पालन करा

■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. ६ :** मराठा समाजातील विवाह सोहळ्यातील बाईट व अनिष्ट प्रथा चिंतेचा विषय झाला आहे .या प्रथांना लगाम लागावा यासाठी आदर्श विवाह आचारसंहिता तयार करुन ती सामाजिक बंधन म्हणून ती सर्वांनी पाळावी. या ज्वलंत विषयावर अकोला जिल्ह्यातील विवाह मंडळाच्या संयुक्त सभेत गंभीरतेने विचार मंथन करण्यात आले. मराठा सेवा संघ अंतर्गत क्रांतीसिंह नाना पाटील वधूवर सुचक कक्षाचे वतीने विवाह मंडळांची संयुक्त सभा येथे शनिवारी झाली. या सभेला अकोला जिल्ह्यातील विवाह वधूवर सुचक मंडळाचे पदाधिकारी व सदस्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देवून सहकार्य केले.
या सभेत मराठा मंडळाचे ज्येष्ठ नेते महादेवराव भुईभार, महिला आयोगाच्या माजी सदस्या डॉ, आशाताई मिरगे, मराठा सेवा संघाचे माजी सचिव प्रदीप चोरे, मध्यस्थी मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब फोकमारे, सहकोषाध्यक्ष राममूर्ती बालसिंगे, देवराव पाटील हागे, संत वासुदेव





महाराज ज्ञानपीठ संस्थेचे विश्वस्त नंदकिशोर हिंगणकर, अॅड. संतोषराव गोळे, ज्योतीताई चोरे यांनी सभेत या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. विविध मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी चर्चेत सहभाग घेऊन मौलिक सूचना सभेत मांडल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रांतीसिंह नाना पाटील वधूवर सुचक कक्षाचे जिल्हाध्यक्ष रामेश्वर सपकाळ तर आभारप्रदर्शन मराठा सेवा संघाचे कोषाध्यक्ष अतुल अंधारे यांनी केले.
या सभेला मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. रणजीत कोरडे, माजी अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम तायडे, श्रीकांत बिहाडे, सुनील जानोरकर, डॉ. अशोक ओळंबे, संदीप निमळ, माणिकराव गावंडे, राजेंद्र मोहोकार, अविनाश गावंडे, नागोराव वानखडे, ज्ञानदेवराव वनारे, अविनाश पाटील, बाळासाहेब रावणकार, डी.ओ. म्हैसने, दिनकरराव सरप, दशरथ जवरे, विजय बोरकर, विजय ताथोड, शालिग्राम गावंडे, स्वाती हिंगणकर, देवानंद इंगळे, तुळिशराम भरणे, दिपक आखरे, विजय सपकाळ, श्रीराम वानखडे, वासुदेव कडू, सखाराम पागरुत, बाळकृष्ण काळे, विक्रम जानोरकर, शामबापू देशमुख, नरेंद्र मुळे, डॉ. अमर तऱ्हाळे, गजानन महल्ले, कार्यालयाचे दिलीप देशमुख, विनोद साबळे आदी उपस्थित होते. पुढील पिढीसाठी आदर्श निर्माण करण्याची गरज अकोला जिल्ह्यात मराठा समाजातील विवाह प्रथांतील वाढता दिखावा, खर्चिकपणा आणि अनिष्ट रीतिरिवाज यावर लगाम घालण्यासाठी आदर्श विवाह आचारसंहिता तयार करून ती समाजबांधील बंधन म्हणून अंमलात आणावी, असा ठराव संयुक्त विवाह मंडळाच्या सभेत करण्यात आला. क्रांतीसिंह नाना पाटील वधूवर सुचक कक्षाच्या पुढाकाराने आयोजित या सभेत समाजातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून सकारात्मक मत व्यक्त केले. या माध्यमातून साधेपणाने विवाह लावावेत, सामाजिक जबाबदारी जपत पुढील पिढीसाठी आदर्श निर्माण करावा, असा महत्त्वपूर्ण संदेश दिला गेला.

**पुढील पिढीसाठी आदर्श निर्माण करण्याची गरज अकोला जिल्ह्यात मराठा समाजातील विवाह प्रथांतील वाढता दिखावा, खर्चिकपणा आणि अनिष्ट रीतिरिवाज यावर लगाम घालण्यासाठी आदर्श विवाह आचारसंहिता तयार करून ती समाजबांधील बंधन म्हणून अंमलात आणाव**

**PUBLIC NOTICE** Family Suit No. 71/2024 Fixed On: 09/10/2025

**IN THE COURT OF JUDGE, FAMILY COURT AT. VISNAGAR. DIST - MAHESANA, STATE-GUJARAT.**

**Applicant :- Maheta Vishalkumar Rajeshkumar**
Resident-22, Samved-2, Kansa N.A. Vistar, Visnagar, Ta. Visnagar, Dist-Mahesana Pin Code No-384315, Mob-8306177024. **Versus**
**Opponent : Maheta Jyotiben** W/o Vishalkumar Rajeshkumar and D/o Raju Chandrikapure Age- 25, Religion-Hindu R/o Naka No. 2, Near Durga mata Mandir, Kamathi road, Khamankheri, Antrasvani, Nagpur, Kamti, Maharastra-441002
Where as the aforesaid case has been filed by applicant against you praying decree of divorce U/s 13 of Hindu Marriage Act 1955. You are hereby directed to appear in person or through your pleader duly instructed on the **09th day of October 2025 al about 10.30 a.m.** to show cause, against the application failling wherein the said application will be heard and determined ex-parte.
Given under my hand and the seal of the Court on 16 day of September, 2025.

**Preapred By (Mr. M.J.Solanki) Asistant** — Court Seal — **Checked By (Mrs.N.P.Patel) Supritendent, Family Court, Visnagar**

# बालकांच्या जीवावर उठली औषधं

मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये विषारी खोकल्याचे सिरप प्यायल्याने आतापर्यंत १६ मुलांचा मृत्यू झाला आहे. गेल्या तीन वर्षांत भारत आणि जगातील इतर अनेक देशांमध्ये भारतीय कंपन्यांनी उत्पादित केलेल्या कफ सिरपचे प्रमाण वाढले आहे. हे सिरप प्यायल्याने ३०० हून अधिक मुलांचा मृत्यू झाला आहे. २०२२ मध्ये आफ्रिकन देश गांबियामध्ये एकाच वेळी ६६ मुलांचा मृत्यू झाला होता. या कफ सिरपमध्ये असे काय आहे जे त्यांना मुलांसाठी विषारी बनवते? सरकार औषधी कंपन्यांना हे विषारी सिरप बनवण्यापासून का रोखू शकत नाही?

-----------

**कफ सिरपमध्ये साधारणपणे दोन घटक असतात:**

१. खोकला दाबणारा

खोकल्याचे कारण आणि तीव्रतेनुसार या औषधात वेगवेगळे घटक असतात. क्लोरफेनिरामाइन आणि फेनिलेफ्रिन सामान्यतः वापरले जातात, जे तुम्हाला सिरपवर लिहिलेले दिसेल. हे औषध सहसा ४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना दिले जाते, परंतु सरकारने आता त्यावर बंदी घातली आहे.

४ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांना डेक्स्ट्रोमेथोर्फन हायड्रोब्रोमाइड नावाचे औषध असलेले सिरपदेखील दिले जाऊ शकते. याला सिरपचा सक्रिय घटक म्हणतात. याव्यतिरिक्त, जर जास्त कफ निर्माण होत असेल तर, अँम्ब्रोक्सिल आणि ग्वायफेनेसिन असलेले सिरप देखील दिले जाते. जर बाळाला आमांशामुळे छातीत जडपणा येत असेल तर लेव्होसाल्बुटामोल सारखी ब्रोन्कोडायलेटर औषधे दिली जाऊ शकतात किंवा स्टीम इनहेलेशनची शिफारस केली जाते.

**२. औषध विरघळवण्यासाठी वितळलेले, चवीचे सॉल्व्हर**

ही औषधे सहसा पावडर स्वरूपात असतात. म्हणून, त्यांना विरघळवण्यासाठी सॉल्व्हर आवश्यक असते. मुले कडू औषधे गिळू शकत नाहीत, म्हणून गोड पदार्थ म्हणजे सॉर्बिटॉल किंवा ग्लिसरीन, ग्लिसरॉल किंवा प्रोपीलीन. ग्लायकोलसारखे घट्ट करणारे घटक जोडले जातात. यामुळे औषध घट्ट राहते पण तोंडात चिकटत नाही.

जेव्हा सॉल्व्हेंटऐवजी इथिलीन ग्लायकॉल किंवा डायथिलीन ग्लायकॉल वापरले जाते, तेव्हा ते मुलांसाठी विषारी बनते. EG आणि DEG हे रंगहीन आणि गंधहीन अल्कोहोल आहेत जे पेंट्स, हायड्रॉलिक ब्रेक फ्लुइड्स, शाई, बॉलपॉइंट पेन आणि इतर उद्योगांमध्ये औद्योगिक रसायने म्हणून वापरले जातात.

औषधांमध्ये EG किंवा DEGचे प्रमाण ०.१% पेक्षा जास्त नसावे. भारताची केंद्रीय औषध मानक संघटना देखील या मानकाचे पालन करते. औषधांमध्ये EG किंवा DEGचे जास्त प्रमाण विषारी मानले जाते. ग्लिसरीन असलेल्या औषधांची चाचणी करताना, EG किंवा DEGचे प्रमाण ०.१% पेक्षा जास्त नसेल याची काळजी घेतली पाहिजे. इथिलीन ग्लायकॉलचा वापर उद्योगांमध्ये अँटीफ्रीझ आणि शीतलक रसायन म्हणून केला जातो.

जेव्हा EG किंवा DEG शरीरात प्रवेश करते तेव्हा विषारी चयापचय तयार होतात. उदाहरणार्थ, एथ्र ऑक्सॅलिक ॲसिड तयार करते आणि अएक्ष लएअ नावाचे ॲसिड तयार करते. रक्तात धोकादायक ॲसिड जमा होण्याला 'मेटाबॉलिक ॲसिडोसिस' म्हणतात. यामुळे मूत्रपिंड आणि मज्जासंस्थेचे नुकसान होते. याव्यतिरिक्त, ही रसायने रक्तातील ऑक्सिजनचा प्रवाह रोखतात, ज्यामुळे पेशी मरतात.



गेल्या तीन वर्षांत भारतात आणि परदेशात ३०० हून अधिक मुले विषारी डांग्या खोकल्यामुळे मृत्युमुखी पडली आहेत. यातील बहुतेक मुले पाच वर्षांपेक्षा कमी वयाची होती. बहुतेक प्रकरणांमध्ये, हे विषारी सिरप बनवणाऱ्या कंपन्या भारतीय होत्या...

आफ्रिकन देश गांबियामध्ये, भारतीय कंपनीने उत्पादित केलेल्या कफ सिरप प्यायल्याने २०२२ मध्ये ६६ मुले मृत्युमुखी पडतील. 'मेडेन फार्मास्युटिकल्स'च्या चार कफ सिरपमध्ये DEG आणि EG सारखे विषारी पदार्थ होते.

इंडोनेशियामध्ये ऑक्टोबर २०२२ मध्ये विषारी खोकल्याच्या सिरप प्यायल्याने २०० मुलांचा मृत्यू झाला. या औषधांमध्ये डीईजी देखील आढळून आले, ज्यामुळे मूत्रपिंड निकामी झाले. सरकारने सात औषध कंपन्यांविरुद्ध खटला दाखल केला होता आणि सिरपच्या विक्रीवर बंदी घातली होती.

डिसेंबर २०२२ मध्ये भारतीय औषध कंपनी मॅरियन बायोटेक प्रायव्हेट लिमिटेडने १८ मुलांचा मृत्यू मद्यपानामुळे झाल्याचे सांगितले. उझबेकिस्तानच्या आरोग्य मंत्रालयाने सांगितले की भारतीय खोकल्याच्या सिरपमध्ये ईजी असते.

आफ्रिकन देश कॅमेरूनमध्ये २०२३ मध्ये भारतीय खोकला सिरप "नॅचरकोल्ड" प्यायल्याने सहा मुलांचा मृत्यू झाला. बाटलीवर उत्पादकाचे नाव "फ्रॅकॉन इंटरनॅशनल (इंग्लंड)" असे लिहिले होते, परंतु तपासणीनंतर असे दिसून आले की हे सिरप भारतीय कंपनी, रेमन लॅब्सने बनवले आहे.

२०२० मध्ये जम्मू आणि काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात कोल्डबेस्ट-पीसी कफ सिरप खाल्ल्याने १२ मुलांचा मृत्यू झाला. हे सिरप हिमाचल प्रदेशस्थित डिजिटल व्हिजन फार्मा कंपनीने बनवले होते. त्यात ३४% डीईजी असल्याचे आढळून आले.

गांबियामध्ये ६६ मुलांच्या मृत्यूनंतर, WHO ने चार भारतीय खोकल्याच्या सिरपवर बंदी घालण्याची मागणी केली. गांबियामध्ये ६६ मुलांच्या मृत्यूनंतर, WHO ने चार भारतीय खोकल्याच्या सिरपवर बंदी घालण्याची मागणी केली.

औषध कंपन्या मुलांच्या सिरपमध्ये EG आणि DEG सारखे विषारी पदार्थ का मिसळतात? तर याचे कारण नफेखोरी आहे. औषधे घट्ट करण्यासाठी आणि मुलांना ती रुचकर बनवण्यासाठी ग्लिसरीन आणि प्रोपीलीन ग्लायकॉल. सुरक्षित मानले जाते. ही वैद्यकीय वापरासाठी सुरक्षित रसायने आहेत. EG आणि DEG ही स्वस्त, औद्योगिक दर्जाची रसायने आहेत. कारण, ग्लिसरीनप्रमाणेच, ते रंगहीन आणि गंधहीन द्रव आहे, फायदेशीर औषध कंपन्या ग्लिसरीनला पर्याय म्हणून याचा वापर करतात. जर योग्य प्रयोगशाळेतील चाचण्या केल्या नाहीत तर त्यांना सीरममध्ये शोधणे कठीण होते.

दरवर्षी अनेक खोकल्याच्या सिरप नवीन नावांनी आणि ब्रँडने लाँच केल्या जातात. कंपन्या स्वस्त रसायनांचा वापर करून कमी किमतीत उत्पादने लाँच करतात. डॉक्टर हे सिरप मुलांना कमिशनसाठी किंवा निष्काळजीपणाने लिहून देतात.

भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा औषध निर्यातदार देश आहे. इंडिया ब्रँड इक्विटी फाउंडेशनच्या मते, देशभरात सुमारे १३,००० परवानाधारक औषध ब्रँड आहेत. कंपनीने कोणतेही नवीन औषध लाँच करण्यासाठी सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशनकडे अर्ज करावा लागतो.

कंपनीने औषधाचा फॉर्म्युला जुना असल्यास, तो स्टेट ड्रग्ज स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशनकडून मंजूर केलेला असणे आवश्यक आहे. राज्य पातळीवर परवाना सहज मिळू शकतो. २०२३ पासून, सरकारने औषध कंपन्यांसाठी "गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिस" अनिवार्य केले आहे. प्रमाणपत्र घेणेदेखील अनिवार्य करण्यात आले आहे.

राज्य पातळीवर, अन्न सुरक्षा आणि औषध नियंत्रक विभाग देखील औषधांच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी जबाबदार आहे. औषध नियंत्रण विभागाचे अधिकारी त्यांच्या प्रयोगशाळेत कारखान्यातील औषधांची चाचणी करण्याची जबाबदारी घेतात. या टप्प्यावर, अधिकारी आणि औषध कंपन्यांमधील संगनमतामुळे, निकृष्ट दर्जाच्या औषधांना अनेकदा क्लीन चिट दिली जाते.

राजस्थानमधील अन्न सुरक्षा आणि औषध समस्या उघड झाल्या आहेत. नियंत्रक विभागाच्या एका अधिकाऱ्याने बनावट औषधे बनवताना पकडलेल्या १४-१५ फार्मसी कंपन्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. गेल्या तीन वर्षांत, त्यांनी बनावट औषधांच्या डेटामध्ये फेरफार केला आणि तो लोकसभा आणि नीती आयोगाला लीक केला. तो राज्य विधानसभेतही असाच खोटा डेटा पाठवण्याचा विचार करत होता, परंतु ते होण्यापूर्वीच विभागीय तपासात संपूर्ण प्रकरण उघडकीस आले.

औषधांच्या बनावटीमध्ये सहभागी असलेल्या कंपन्यांविरुद्ध तपास आणि कारवाईत निष्काळजीपणाची असंख्य प्रकरणे आहेत. या कथा समोर आल्या आहेत. मेडेन फार्मास्युटिकल्सच्या कफ सिरपमुळे गॅम्बियामध्ये ६६ मुलांचा मृत्यू झाल्यानंतर, कंपनीच्या हरियाणा सॅम्पल्स प्लांटमधून घेण्यात आले आणि नियामक संस्थांनी असे ठरवले की सिरपमध्ये कोणतेही EG किंवा DEG नाही.

मेडेनचे कामकाज तात्पुरते स्थगित करण्यात आले असले तरी, कोणतेही फौजदारी आरोप किंवा आर्थिक दंड आकारण्यात आला नाही. कफ सिरपमुळे मारियनच्या मुलांचा मृत्यू झाल्यानंतर, कंपनीने तिच्या डॉक-१ मॅक्स सिरपचे उत्पादन बंद केले.

मध्य प्रदेशातील छिंदवाडा येथे कोल्ड्रिफ कफ सिरप प्यायल्यानंतर ३२ दिवसांत १६ मुलांचा मृत्यू झाला. तथापि, प्रशासनाने आतापर्यंत फक्त ११ मृत्यूंची पुष्टी केली आहे.

पहिला संशयित रुग्ण २४ ऑगस्ट रोजी नोंदवण्यात आला. पहिला मृत्यू ७ सप्टेंबर रोजी झाला. त्यानंतर, उर्वरित मुलांचा मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे एकामागून एक मृत्यू झाला. १५ सप्टेंबर रोजी, मध्य प्रदेश सरकारने राज्यात कोल्ड्रिफ सिरपवर बंदी घातली आणि तामिळनाडू सरकारला चौकशी करण्याची विनंती केली, कारण हे औषध तामिळनाडूतील कांचीपुरम येथे बनवले जात होते.

३ ऑक्टोबर रोजी, तामिळनाडू सरकारने कोल्ड्रिफ सिरपमध्ये ४८.६% डायथिलीन ग्लायकॉल असल्याची पुष्टी केली. त्यानंतर, केरळ आणि तामिळनाडूमध्ये त्यावर बंदी घालण्यात आली. छिंदवाडा पोलिसांनी औषध कंपनी आणि मुलांना सिरप लिहून देणाऱ्या डॉक्टरला अटक केली. प्रवीण सोनी यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला. रात्री उशिरा प्रवीणलाही अटक करण्यात आली.

देशभरात बालकांच्या जीवावर उठलेल्या या कंपन्यावर सरकारकडून खरेच प्रामाणिक कारवाई होईल की, बालकांचे जीव असेच जात राहतील?

■ ■ ■

# सत्याच्या आवाजाला कैद करता येत नाही..!

**गजानन कुसुम ओंकार हरणे**
**खडकी, अकोला.**
**9822942623.**

मेणबत्त्यांच्या उजेडात लोकशाहीचा प्रश्न सायंकाळी सूर्यास्तानंतर अकोल्याच्या रस्त्यांवर हजारो हातांत मेणबत्त्या पेटल्या होत्या. त्या केवळ प्रकाशाच्या ज्योती नव्हत्या; त्या होत्या लोकशाहीच्या, स्वातंत्र्याच्या आणि सत्यासाठी लढणाऱ्या आवाजांच्या मशाली. देशातील शांती, विज्ञान, शिक्षण आणि पर्यावरण यांसाठी अखंडपणे कार्य करणाऱ्या लडाखच्या गांधी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मा. सोनम वांगचूक यांच्या अटकेच्या निषेधार्थ हा कॅण्डल मार्च आयोजित करण्यात आला होता.

शांततेच्या मार्गाने, संविधानाने दिलेल्या अधिकारांच्या चौकटीत लोकांनी सरकारविरोधात आपला असंतोष व्यक्त केला. घोषणांनी अकोल्याचा आकाश दुमदुमून गेला सोनम वांगचूक यांना तातडीने मुक्त करा! पर्यावरण रक्षकांचा आवाज दाबला जाऊ शकत नाही!, शांततेच्या मार्गाने लढणाऱ्या विचारांना सलाम! या ज्योती फक्त मेणबत्त्यांच्या नव्हत्या, त्या सत्याच्या होत्या. त्या सांगत होत्या विचारांना कैद करता येत नाही, सत्याला तुरुंगात डांबता येत नाही, आणि लोकशाहीला दबावाखाली ठेवता येत नाही.

**सोनम वांगचूक लडाखचा गांधी आणि नवभारताचा स्वप्नद्रष्टा**

३ इडीयट्स चित्रपटातील फुंसुख वांगडू ही व्यक्तिरेखा जिच्या जीवनावर आधारित आहे तो खरा मनुष्य म्हणजे सोनम वांगचूक अभियंता, शिक्षण सुधारक, पर्यावरण योद्धा आणि समाजमनाचा शास्त्रज्ञ. लडाखच्या कठीण भौगोलिक आणि सामाजिक परिस्थितीत त्यांनी विज्ञान, शिक्षण आणि पर्यावरणाला लोकजीवनाशी जोडण्याचे काम केले.

सेक मॉल स्कुल्स आणि हिमनदी साठवण प्रकल्पांद्वारे त्यांनी दाखवून दिले की विज्ञान म्हणजे केवळ प्रयोगशाळा नव्हे तर जीवन बदलण्याचे साधन आहे. ते केवळ एक शिक्षक नव्हते, तर नवभारताचे स्वप्न पाहणारे विचारवंत होते. त्यांचे काम सांगते की विकास हा निसगार्चा विध्वंस करून नव्हे तर त्याच्याशी मैत्री करून शक्य आहे. त्यांनी शाश्वत ऊर्जेचे तंत्रज्ञान विकसित केले, स्थानिकांना स्वयंपूर्ण केले, आणि शिक्षणात प्रयोगशीलतेचा नवा अध्याय लिहिला. त्यामुळेच लोक त्यांना लडाखचा गांधी म्हणतात कारण ते शांततेच्या मार्गाने परिवर्तन घडवतात, सत्यावर ठाम राहतात आणि जनतेला जागृत करतात.

**अटक म्हणजे विरोधकांना गप्प करण्याचे षड्यंत्र**

अशा एका प्रज्ञावान, निरपेक्ष, राष्ट्रप्रेमी व्यक्तिमत्त्वाला सरकारने तुरुंगात डांबले. त्यांचा ह्गुन्हाह्न एवढाच त्यांनी सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित केला, पर्यावरणाच्या नाशावर आवाज उठवला, लोकशाहीच्या मूल्यांचे स्मरण करून दिले. ही अटक केवळ एका व्यक्तीची नाही. ती म्हणजे विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि लोकशाहीवरील हल्ला.

आजच्या भारतात सत्ताधाऱ्यांविरुद्ध बोलणे म्हणजे देशद्रोह. जो प्रश्न विचारतो तो शत्रू. जो सत्य सांगतो तो कट्टर. लोकशाहीचे चौथे स्तंभ, माध्यमे, विद्यापीठे, समाजसंस्था यांनाही दबावाखाली ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. लोकांच्या मतभेदांना गुन्हा ठरवले जात आहे.

हे दृश्य नवीन नाही. इतिहासात जेव्हा जेव्हा सत्ताधाऱ्यांना त्यांच्या अहंकाराला आव्हान देणारे आवाज ऐकू आले, तेव्हा त्यांनी त्या आवाजांना गप्प करण्याचा प्रयत्न केला. पण तेव्हा इतिहासाने प्रत्येक वेळी सिद्ध केले विचार कधीच तुरुंगात बंद होत नाहीत.

**लोकशाही ते ठोकशाही इतिहासाची पुनरावृत्ती**

ब्रिटिश सत्तेखाली भारताने हेच पाहिले होते. महात्मा गांधींनी अहिंसक आंदोलन सुरू केले, आणि त्यांनाही कारागृहात टाकले गेले. भगतसिंग, राजगुरू, सावरकर, नेताजी सर्वांनी ब्रिटिशांच्या दडपशाहीला तोंड दिले. पण त्यांच्या तुरुंगवासाने विचार संपले नाहीत; उलट ते जनमानसात अधिक प्रखर झाले.

आजही तीच परिस्थिती पुन्हा येत आहे. फरक इतकाच की आता सत्ता इंग्रजांची नाही, तर भारतीयांची आहे. पण सत्ता मिळताच काही जण इंग्रजांपेक्षाही निष्ठुर झाले आहेत. विरोध करतो तो देशद्रोही ठरतो, जो प्रश्न विचारतो तो शत्रू ठरतो. हेच ठोकशाहीचे लक्षण आहे. लोकशाहीत सत्ता प्रश्नांची उत्तरे देते; ठोकशाहीत सत्ता प्रश्न विचारणाऱ्यांनाच संपवते.

**ऐतिहासिक संदर्भ :** सत्यासाठी लढणाऱ्यांचे दमन. स्वातंत्र्य संग्रामात असंख्य सत्यवादी आणि क्रांतिकारकांना ब्रिटिशांनी गप्प करण्याचा प्रयत्न केला. पण गांधींनी म्हटले होते ते मला तुरुंगात टाकू शकतात, पण माझ्या विचारांना नाही. नेल्सन मंडेला यांनी २७ वर्षे तुरुंगात घालवली, पण दक्षिण आफ्रिकेत वर्णभेदाचा अंत झाला. मार्टिन ल्यूथर किंग जूनियर यांना सतत धमक्या दिल्या गेल्या, पण त्यांनी अमेरिकेत नागरी हक्कांचा नवा अध्याय लिहिला.

आज सोनम वांगचूक यांच्या अटकेतून इतिहास पुन्हा एकदा स्वतःला पुनरावृत्त करत आहे. पण इतिहासाने हेही दाखवून दिले आहे की सत्याच्या बाजूने लढणारे शेवटी जिंकतात. सत्ता क्षणभंगुर असते; विचार चिरंतन असतात. आजचा काळ संविधान वाचवण्याची आणि जनतेला जागृत करण्याची जबाबदारी लोकशाही ही केवळ निवडणुकीत मतदान करण्याचे नाव नाही.

ती आहे मतभेदांचा स्वीकार, विचारस्वातंत्र्याचे रक्षण आणि सत्यासाठी आवाज उठवण्याची हमी. आज भारतासमोर सर्वात मोठे आव्हान आहे .लोकशाहीचे रक्षण.सोनम वांगचूक यांच्या अटकेनंतर एक प्रश्न प्रत्येक भारतीयाने स्वतःला विचारावा लागेल आपण शांत राहिलो तर उद्या आपला आवाज कोण ऐकेल?

आज जर आपण त्यांच्या बाजूने उभे राहिलो नाही, तर उद्या आपल्या स्वतःच्या स्वातंत्र्याचा गळा घोटला जाईल. ही लढाई फक्त एका व्यक्तीची नाही, ती आहे प्रत्येक नागरिकाच्या अधिकारांची.म्हणूनच आज गरज आहे लोकांनी रस्त्यावर उतरायची, संविधान हातात घ्यायची, आणि लोकशाही वाचवण्याची. जात, धर्म, पंथ, पक्ष या सगळ्या भिंती मोडून एकत्र येण्याची. नेपाळमध्ये जेव्हा सरकार हुकूमशाहीकडे वळले, तेव्हा सामान्य लोकांनी रस्त्यावर उतरून लोकशाही परत आणली. भारतातही तीच वेळ आली आहे.

**अकोल्यातून उठलेली ठिणगी, आशेचा किरण**

अकोला शहरातील सज्जनशक्तीने या ठोकशाहीविरोधात आवाज उठवून आशेची ठिणगी पेटवली आहे. गांधी जवाहर बागपासून हुतात्मा स्मारकापर्यंतचा कॅण्डल मार्च हे केवळ आंदोलन नव्हते; ते होते एक वचन सत्यासाठी लढा देण्याचे, लोकशाही वाचवण्याचे, विचारांना कैद न होऊ देण्याचे.

विविध विचारांचे, धर्मांचे, संघटनांचे , पक्षाचे लोक एकत्र आले. ही एकजूट सांगते की लोकशाहीवर हल्ला हा फक्त एका पक्षावर किंवा धर्मावर नव्हे तर संपूर्ण देशावर असतो.

या मार्चमध्ये पेटलेल्या मेणबत्त्या सांगतात अंधार कितीही दाटला तरी प्रकाशाचा एक किरण त्याला छेदून जातो. आणि तो किरण आहे "जनता".

विचारांना कैद करता येत नाही, लोकशाही वाचवणे हेच राष्ट्रसेवा सोनम वांगचूक यांची अटक ही एक व्यक्तीची नाही ती संपूर्ण विचारप्रणालीवर हल्ला आहे. हा हल्ला शिक्षणावर आहे, विज्ञानावर आहे, पर्यावरणावर आहे, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे देशाच्या लोकशाहीवर आहे. पण इतिहासाचा अनुभव सांगतो सत्ता विचारांना संपवू शकत नाही. ती माणसाला तुरुंगात टाकू शकते, पण विचारांना नाही.आज प्रत्येक भारतीयाने आपल्या अंतःकरणात हा प्रश्न विचारावा आपण शांत राहणार का?

जर आपण शांत राहिलो, तर पुढील पिढ्यांना आपण लोकशाहीचा सूर्य नव्हे तर ठोकशाहीचा अंधार देऊन जाऊ. पण जर आपण जागे झालो, एकत्र आलो, तर आपण या अंधाराला छेदून नवा पहाट आणू शकतो.सोनम वांगचूक हे आज तुरुंगात असतील, पण त्यांचे विचार तुरुंगाच्या भिंतींपलीकडे पसरत आहेत. ते लोकांच्या मनात अंकुरत आहेत, आणि ही अंकुरणारी बीजेच उद्याची लोकशाही वाचवतील.या लढ्यात सहभागी होणे म्हणजे केवळ एका व्यक्तीच्या पाठिशी उभे राहणे नाही. ते म्हणजे भारताच्या आत्म्याच्या बाजूने उभे राहणे आहे.

-------------------

**(लेखक साहित्यिक, समाजसेवक, समाजसुधारक, कवी, वक्ता, विश्लेषक, प्रबोधनकार, आंदोलक, प्रचारक, वारकरी, योगा शिक्षक आहेत.)**

■ ■ ■

# तरुणांचे राजकारण आणि राजकारणातील तरुण

हल्ली तरुणांना केंद्रस्थानी ठेवून म्हातारे लोक राजकारण करत आहेत. रोजगार, उद्योग यावर बोलतांना भर दिला जातो, परंतू प्रत्यक्षात कोणतेही काम केले जात नाही. खरं पाहिले तर राजकारणाच्या माध्यमातून माणूस व देश समृद्ध केले जायला पाहिजे, विकास व विषेश शिक्षण, आरोग्य, रोजगार यावर भर देऊन राजकीय धोरणांची आखणी व्हायला पाहिजे. पण सध्या तसे न होता. शिक्षणावर तर कोणी बोलत नाही, रिक्षा चालवणे, वडापाव विकणे याला रोजगार समजले जाते व त्याची जाहिरात केली जाते.

---------------

जागतिक पातळीवर भारतीय शिक्षणाचा दर्जा काय? भारतात गुणवत्ता पुर्ण शिक्षण मिळते का? शिक्षणात गुणवत्ता वाढण्यासाठी काय केले पाहिजे? शिक्षीत तरुणांनी वडापाव विकायचे का? शासकीय क्षेत्रातील नोकर भरती का केली जात नाही? लोकसंख्येच्या प्रमाणात शासकीय क्षेत्रात मनुष्य बळ आहे का? यावर कोणीही राजकारण करायला तयार नाही. राजकारण म्हणजे केवळ आपल्या दहा पिढ्यांची कमाई करून ठेवायची आणि देशातील जनतेला भिकेला लाऊन देशाची अधोगती करायची हेच धोरण सर्वच पक्षाचे दिसून येते.

आमदार खासदारांच्या पगारात, सुविधेमध्ये वाढ होते तेव्हा कोणीच आवाज उठवत नाही. गप्प राहून सर्व जन स्वतः ची झोळी भरून घेतात. परंतु शिक्षण, रोजगार, आरोग्य यावर बोलायचे तर वेगवेगळ्या प्रकारचे राजकारण करून समिती स्थापन करु, निधी उपलब्ध नाही अशा प्रकारची भाषा वापरून मुख्य विषयांकडे दुर्लक्ष केले जाते. शेतकऱ्यांची जमीन संपूर्ण पाण्याखाली गेली असताना, शेतकऱ्यांकडे दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसताना शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्याची वेळ आल्यानंतर शेतकऱ्यांच्या उद्धवस्त झालेल्या जिवनाचे राजकारण केले जाते तेव्हा राजकीय पक्ष आणि राजकीय नेते सर्वसामान्य लोकांच्या समस्ये विषयी किती गंभीर आहेत हे दिसून येते.

देशाचा विचार केला जवळपास पन्नास लाख कोटी रुपयांचे बजेट चालू वर्षाचे आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर जवळपास सात लाख कोटी रुपयांचे बजेट आहे. हा आकडा सर्वसामान्य लोकांच्या कल्पनाशक्ती च्या बाहेरचा आहे. एवढे मोठे बजेट एका वर्षासाठी असताना पैसा नेमका खर्च होतो कुठे? याचा हिशोब खरचं जनतेला मिळतो का? बरं हा सर्वच पैसा जनतेचा आहे हे तरी जनतेला कळते का? याविषयी जनता किती गंभीर आहे? याची उत्तरे मिळणेच अवघड आहे.

रस्ते, पुल, मेट्रो वाढत आहे असे भासवले जात आहे. कारण मोठमोठे रस्ते, पुल, मेट्रो हजारो करोडो रुपए खर्च करून तयार करण्यात आले. परंतु बरेच बांधलेले कामे उद्घाटना अगोदर, उद्घाटन झाल्यावर एक दोन महिन्यांत खराब व्हायला लागले. मग प्रश्न पडतो निकृष्ठ दर्जाचे काम करून हजारो करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला जातो त्या देशात तरुणांचे भविष्य काय असेल याची कल्पना न केलेली बरी. भ्रष्टाचार करून देशाला भिकेला लावणारे राजकारण सुरू असताना तरुणांच्या हिताचे हिताचे राजकारण होणे शक्य नाही.



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव, ता. मेहकर.**
**जि. बुलढाणा.**
**9130979300**

तरुणांनी भ्रष्टाचार, शिक्षण, आरोग्य, रोजगार यावर बोलुच नये. देशाचा शाश्वत विकास व तरुणांचे कल्याण काय असते हे तरुणांना समजूच नये म्हणून राजकारणाच्या माध्यमातून तरुणांच्या डोक्यात जात धर्म बळकट केला जातो. तरुणांना रोजगार, शिक्षण, आरोग्य आपेक्षा धर्म आणि स्वतः ची जात जास्त प्रिय वाटायला पाहिजे अशी वक्तव्य राजकीय नेत्यांकडून केली जातात.

मग काय, सामाजिक ताणतणाव निर्माण तर होतोच पण ज्याच्या हातात कुटुंबाची जबाबदारी आणि देशाचा कारभार असायला पाहिजे अशी सर्वसामान्य तरुणाच्या हातात दगड धोंडे आणि रहायला तुरुंग मिळतो. जाती धर्मावरून भडकावणारे नेते दंगली नंतर जमानतीही घ्यायला तयार होत नाहीत.

जे नेते शेतकऱ्याने गळफास घेतला तरी धावून येत नाहीत, औषधोपचार न मिळाल्याने मृत्यू झाला तरी मदतीसाठी समोर येत नाही. अनलिमिटेड डाटा देऊन तरुणांना आभासी दुनियेत ढकलणारे सरकार तरुणांना उदरनिर्वाहासाठी मदत करत नसेल आणि प्रत्येक काम हे कमी पगाराचे, कंत्राटी करून नियमित पगार, सुविधा आणि भविष्य निर्वाह निधी अर्थात पिएफ बंद करून मात्र स्वतःचे पगार वाढ, भरभक्कम पेन्शन, चारशे रुपयात अनलिमिटेड कॉल असताना टेलिफोन साठी प्रतिमहिना दहा हजार रुपये, विमान प्रवास व भवनात अत्यंत स्वस्त पण गुणवत्ता पुर्ण जेवन व्यवस्था.. ज्या सुविधा राजकारणातील लोकांनी जनतेला द्यायला पाहिजे तेच लोक जनतेला लूटून स्वतः उपभोग घेत आहेत.

पाण्यामध्ये सर्वकाही वाहून गेल्या नंतर शेतकऱ्यांना थोडेसे अन्न आणि जगण्यासाठी पाच हजार रुपये देणारे नेते मात्र मोबाईल साठी महिना दहा हजार रुपये घेत असतील आणि जनतेला फोन करणे सोडा पण जनतेने केलेला फोन ही उचलत नसतील तर राजकारणी किती इमानदार आणि नितीवान असतील याची खात्री पटते.

आज देशातील तरुण हे अज्ञानी व सुस्त होत चालले आहेत. व्यक्ती व देशासमोर संकटाचा डोंगर उभा असताना तरुणांना पद्धतशीर पणे बाजूला सारून समस्येमध्ये आनंद व्यक्त करण्याची परिस्थिती निर्माण केली जात आहे. धर्मांध, अज्ञानी व सुस्त तरुण देशाच्या व समाजाच्या प्रगतीसाठी बाधक ठरत असतात आणि हिच बाधक परिस्थिती राजकारण्यांनी तयार करून ठेवली आहे.

देशातील गलिच्छ राजकारणाची प्रतीमा सुधारण्यासाठी, तरुणांच्या उर्जेला गती मिळून तरुणांना रोजगार व विकासाची साधने निर्माण करून देण्यासाठी. मानसाची ओळख जाती धर्मावरून नाही तर माणुस म्हणून कमार्ने होण्यासाठी सुशिक्षित आणि जागृत तरुणांनी राजकारणात सक्रिय होणे आवश्यक आहे. जागृत व हक्क अधिकाराची भाषा बोलणारा व्यक्ती कोणत्याही राजकीय पक्षांना नको असतो.

राजकीय पक्षांना व नेत्यांना हुजरेगिरी करणारे आणि सतरंज्या उचलणारे मोठेपणासाठी वाटेल ते करणारे तरुण पाहिजे. म्हणजे त्यांचे बॅनर, स्टेज व सभेचे नियोजन फुकटात होते. राजकारणात सत्य व प्रामाणिक मानसाला फारसी किंमत मिळत नाही. उलट खोट बोलुन फसवणाऱ्या आणि पैसे उकळणाऱ्या लोकांवर राजकारणी लोक लवकर विश्वास ठेवतात. परिस्थिती कशीही असली तरीही आता तरुणाईने राजकारणात शिरून राजकारणाचे समीकरण बदलून माणसासाठी व देशासाठी राजकारण करणे अत्यंत आवश्यक आहे.

जाती धर्म हे वैयक्तिक बाब असुन ते वैयक्तिक पातळीवरच असायला पाहिजे. तरुणांनी अंधविश्वास, थोतांड, पाखंड याला धर्माशी व जातीशी न जोडता विज्ञानवादी बनुन तर्कशुद्ध व मानवतावादी विचाराची पेरणी करावी जेणेकरून समतेचे रोप तयार होऊन मानवेतेची सावली लोकांना मिळेल. म्हाताऱ्या लोकांनी तरुणांच्या भविष्याचा विचार न करता आता तरुणांनी वयस्कर प्रस्तापित नेत्यांना घरी बसून आराम करू द्यावा. कारण म्हाताऱ्या लोकांकडून काम करून घेणे व तरुणांनी बेरोजगार फिरणे हे ना संस्कारात बसत ना संस्कृती मध्ये बसत.

आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. तरुणांनी या निवडणुकडे परिवर्तनात्मक बघून सहभागी व्हावे. परंतु राजकारणात आणि चळवळीमध्ये स्वतः ची घरे भरण्याची स्वप्न बघणाऱ्या तरुणांनी राजकारणा पासून दुर रहावे. जो इमानदार आहे. स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी त्याच्या कडे साधन आहे अशाच इमानदार, वैचारिक व जागृत तरुणांची आज राजकारणात गरज आहे. कोणत्याही नेत्यांचे वा संघटनेच्या गुलाम तरुणांनी राजकारणापासून दुर राहून प्रामाणिक लोकांना संधी द्यावी तरच राजकारणाच्या माध्यमातून देशाची व समाजाची प्रगती होईल. आणि खऱ्या अर्थाने तरुण समृद्ध होतील.

■ ■ ■

# दातांच्या समस्या दूर करण्यासाठी दातून ठरेल फायदेशीर



निरोगी आरोग्यासाठी आयुर्वेदिक गोष्टींचा वापर चांगला मानला जातो. शहरात राहणारे लोक दात स्वच्छ करण्यासाठी ब्रश आणि टूथपेस्ट वापरतात, परंतु खेड्यांमध्ये आणि लहान भागात आजही बरेच लोक दात स्वच्छ करण्यासाठी दातुन वापरतात. याची अनेक कारणे आहेत.

खरं तर, दातुन हा दात स्वच्छ करण्याचा एक नैसर्गिक मार्ग आहे, जो लोक वर्षानुवर्षे वापरत आहेत. टूथपेस्टमध्ये रसायने असतात, परंतु दातुन १००% नैसर्गिक असते, ज्याचे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत आणि दात मुळापासून मजबूत राहतात. त्यात कीटक नसतात आणि ते पांढऱ्या मोत्यासारखे चमकतात. ही आयुर्वेदाची पारंपारिक पद्धत आहे जी स्वस्त व अनेक नैसर्गिक गुणधर्मांनी परिपूर्ण आहे.

शतकांपूर्वी, जेव्हा टूथब्रश किंवा रासायनिक पेस्ट नव्हते, तेव्हा लोक या दातुनाने त्यांचे ब्रश स्वच्छ करायचे. ते कडुनिंब, बाभळी आणि करंजा यासारख्या झाडांच्या फांद्यांनी त्यांचे दात आणि हिरड्यांची काळजी घेत असत. कडुलिंब आणि बाभूळच्या फांद्या कडू असतात आणि नैसर्गिकरित्या त्यात जीवाणूनाशक, जंतुनाशक आणि तुरट गुणधर्म असतात. ते चघळल्यावर तोंडात एक प्रकारचा फेस तयार होतो जो बॅक्टेरिया नष्ट करतो. ते दातांभोवती साचलेली घाण साफ करते.

**दातुन वापरण्याचे फायदे :** जेव्हा तुम्ही दातुन चावता तेव्हा त्याचे तंतू तुमच्या दातांमध्ये जातात आणि नैसर्गिक फ्लॉस म्हणून काम करतात. यामुळे प्लेक आणि अन्नाचे कण काढून टाकले जातात. दातुनची टोक हिरड्यांना मालिश करते, ज्यामुळे रक्ताभिसरण सुधारते, हिरड्या मजबूत होतात. कडुलिंब आणि बाभूळमध्ये असलेले कडू आणि तुरट रस हिरड्यांमधून रक्त येणे, सूज येणे आणि दुर्गंधी यासारख्या समस्यांना मुळापासून नष्ट करतात.


आजकाल बाजारात उपलब्ध असलेल्या टूथपेस्टमध्ये असलेले फ्लोराइड व इतर रसायने दीर्घकाळ वापरल्यास हानिकारक ठरू शकतात. दातुन हा शंभर टक्के नैसर्गिक पर्याय आहे. दातुन केवळ दात स्वच्छ करत नाही तर ते एकूण तोंडी आरोग्य संतुलित करते. त्यात असलेले औषधी गुणधर्म तोंडातील बॅक्टेरिया नष्ट करतात. श्वास बराच काळ ताजा ठेवतात.

आजही तुम्हाला लहान शहरे, गावांमध्ये दातुन वापरताना दिसेल. सकाळी लोक कडुलिंब आणि बाभूळच्या डहाळ्या चघळतात जेणेकरून त्यांचे दात योग्यरित्या स्वच्छ करता येतील.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### अंधश्रध्दा

बऱ्याच लोकाइले
नादच असतो म्हणाना
दिवसभर पाहत राह्यतेत
राशी भविष्याचा रकाना..

दिवस सरू द्या मग
राती वाचून पहा भविष्य
कळून येईल तुम्हाले
किती फसवं हाय हे विश्व..

ग्रहतारेच ठरविती भविष्य
हे मनी ज्याच्या ठसले
सांगा तर मनगट व मेंदू
विधात्याने उगीच कां दिले?

# ग्रोमॅक्स ॲग्री इक्विपमेंटने २डब्ल्यूडी आणि ४डब्ल्यूडी सेगमेंटमध्ये विविध एचपी कॅटेगिरींमध्ये ८ नवे ट्रॅक्टर लॉन्च



**मुंबई, ६ ऑक्टोबर :** ग्रोमॅक्स ॲग्री इक्विपमेंट लिमिटेड (पूर्वीचे महिंद्रा गुजरात ट्रॅक्टर लिमिटेड), जे महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड आणि गुजरात सरकार यांच्यातील संयुक्त उद्यम आहे, यांनी ४डब्ल्यूडी आणि २डब्ल्यूडी कॅटेगिरीमध्ये ८ नवे ट्रॅक्टर लॉन्च केले आहेत. यामध्ये भारतातील पहिली फॅक्टरी-फिटेड कॅबिन सिरीज (सब-५० एचपी सेगमेंट) समाविष्ट आहे.

ग्रोमॅक्सच्या दमदार आणि इंधन-कार्यक्षम डिझेल इंजिन्स तसेच जागतिक दर्जाच्या गिअरबॉक्स तंत्रज्ञानावर चालणारे हे नवे ट्रॅक्टर उच्च परफॉर्मन्ससाठी ओळखले जातात आणि वापरण्यास सोपे आहेत. हे ट्रॅक्टर बागायती शेती, सुपारी शेती, इंटर-कल्टिव्हेशन, पडलिंग आणि हॉलज यांसारख्या विविध शेती गरजांसाठी उपयुक्त ठरणार आहेत.

ट्रॅकस्टार कवच सिरीज अंतर्गत, ग्रोमॅक्सने सब-५० एचपी सेगमेंटमध्ये भारताची पहिली फॅक्टरी-फिटेड कॅबिन सिरीज सादर केली आहे. ही सिरीज शेतकऱ्यांना सुरक्षित, आरामदायी आणि हवामान-प्रतिरोधक कार्यक्षेत्र उपलब्ध करून देते. या कॅबिनमुळे वर्षभर शेती कामे सुलभ होतात आणि उत्पादकता वाढते. कंपनी सुरुवातीला नॉन-एअर कंडिशन्ड व्हेरिएंट उपलब्ध करून देणार असून, पुढील टप्प्यात एअर कंडिशन्ड व्हेरिएंटही बाजारात आणला जाणार आहे.

या नव्या ट्रॅक्टरशिवाय, ग्रोमॅक्सने आपल्या सबसे सही चुनाव कॅम्पेनअंतर्गत दुसरा डीव्हीसीही (डिजिटल व्हिडिओ कमर्शियल) लॉन्च केला आहे. या नव्या मोहिमेत ग्रोमॅक्सची उत्पादने परफॉर्मन्स, उत्पादकता आणि नफा या दृष्टीने शेतकऱ्यांसाठी परवडणारी आणि योग्य निवड असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

लॉन्चच्या वेळी बोलताना वीजय नाकरा प्रेसिडेंट, फार्म इक्विपमेंट बिझनेस, महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड म्हणाले, ग्रोमॅक्समध्ये आमचे ध्येय म्हणजे भारतीय शेतीच्या बदलत्या गरजांना अनुरूप, विश्वासार्ह उत्पादने उपलब्ध करून मॅक्सिमम ग्रोथ साध्य करणे. एका दिवसात ८ नवे ट्रॅक्टर सादर करताना आम्हाला अभिमान वाटतो प्रत्येक ट्रॅक्टर जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानावर आधारित असून शेतकऱ्यांना वर्षभर उत्पादनक्षमतेसाठी सक्षम बनवण्यासाठी डिझाइन केले गेले आहे. भारताचा पहिला सब-५० एचपी फॅक्टरी-फिटेड कॅबिन ट्रॅक्टर लॉन्च करून, ग्रोमॅक्स मूल्य, परफॉर्मन्स आणि परवडणारी किंमत यांचा आदर्श समतोल शोधणाऱ्या वाढत्या ग्राहकवर्गाची सेवा करत आहे. उत्सव काळात लॉन्च झाल्याने हे नवे ट्रॅक्टर ऑक्टोबर २०२५ पासून ग्रोमॅक्स डिलरशिप्सवर उपलब्ध होणार आहेत. नवे ट्रॅक्टर संपूर्ण ग्रोमॅक्स ट्रॅक्टर डिलर्समार्फत उपलब्ध असतील. उत्सव काळात कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, छत्तीसगड, आंध्र प्रदेश आणि तेलंगणामधील ग्रोमॅक्स डिलर्स विशेष ग्राहक योजना देत आहेत. यामध्ये प्रत्येक ट्रॅक्टर खरेदीवर आकर्षक योजना आणि हमखास गिफ्ट दिले जाणार आहे.

# सॅमसंगकडून भारतात बीस्पोक एआय एअर कंडिशनर्सवर 'गो सेव्ह टूडे' मोहिमेची घोषणा

**मुंबई, ६ ऑक्टोबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज बीस्पोक एआय एअर कंडिशनर्सवर 'गो सेव्ह टूडे' मोहिमेची घोषणा केली, जी यंदा सणासुदीच्या काळात ग्राहकांसाठी जवळपास २१,००० रूपयांची बचत देऊ करते. जीएसटी कपात, सुधारित वॉरंटी फायदे आणि ऊर्जा बचत या तीन आधारस्तंभांवर आधारित 'गो सेव्ह टूडे' मोहिम यंदा सणासुदीच्या काळात ग्राहकांना अद्वितीय मूल्य देते. 'गो सेव्ह टूडे' मोहिमेचा भाग म्हणून ग्राहकांना प्रीमियम बीस्पोक एआय एअर कंडिशनर्सच्या खरेदीवर विशेष ५-५-५० ऑफर मिळू शकते, म्हणजेच २२ सप्टेंबर ते १० नोव्हेंबर २०२५ या ५० दिवसांच्या कालावधीमध्ये खरेदी केल्यास विद्यमान ५ वर्षांच्या सर्वसमावेशक वॉरंटी व्यतिरिक्त ५ महिन्यांची अतिरिक्त सर्वसमावेशक वॉरंटी मिळू शकते.

बीस्पोक एआय एअर कंडिशनर ग्राहकांना जवळपास ३८०० रूपयांचा जीएसटी कपातीचा फायदा, तसेच १५०० रूपयांचे इन्स्टॉलेशन मोफत आणि जवळपास ००० रूपयांची बँक कॅशबॅक देखील मिळेल, ज्यामुळे कुटुंबांसाठी यंदा सणासुदीचा काळ अधिक स्मार्ट, अधिक ऊर्जा-कार्यक्षम बीस्पोक एआय एसी खरेदी करण्याकरिता परिपूर्ण वेळ आहे.

बीस्पोक एआय एसी खरेदी करणाऱ्या ग्राहकांना जवळपास १२००० रूपयांच्या ५ वर्षांच्या सर्वसमावेशक वॉरंटीव्यतिरिक्त अतिरिक्त ५ महिन्यांची वॉरंटी देखील मिळेल. जीएसटी दर कपातीसह हे फायदे सॅमसंग एआय एअर कंडिशनर्सला अधिक सहजसाध्य बनवतात.

''आम्हाला 'गो सेव्ह टूडे' मोहिमेच्या माध्यमातून ग्राहकांसोबत सणासुदीचा काळ साजरा करण्याचा, तसेच आमचे प्रगत तंत्रज्ञान अधिक सहजसाध्य करण्याचा आनंद होत आहे. आमची ५-५-५० ऑफर अद्वितीय आहे, जी कुटुंबांना जीएसटी कपातीचे फायदे, विस्तारित वॉरंटी, मोफत इन्स्टॉलेशन आणि बँक कॅशबॅकसह बीस्पोक एआय एअर कंडिशनर खरेदी करण्यास प्रेरित करते. आमची बीस्पोक एआय एअर कंडिशनर श्रेणी दैनंदिन राहणीमान अधिक उत्साहित करत आहे आणि या ऑफर्स स्मार्ट, ऊर्जा-कार्यक्षम कूलिंग अधिक लाभदायी करतात,'' असे सॅमसंग इंडियाच्या डिजिटल अप्लायन्सेसचे उपाध्यक्ष गुफरान आलम म्हणाले.

बीस्पोक एआय विंडफ्री एअर कंडिशनर्स आरामदायीपणा व कार्यक्षमता देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत, तसेच शक्तिशाली कूलिंग देण्यासह वीजेचा कमी वापर करतात. ग्राहक सॅमसंग बीस्पोक एआय एअर कंडिशनर्समधील एआय एनर्जी मोडच्या माध्यमातून जवळपास ३० टक्के ऊर्जा बचत करू शकतात. विंडफ्री कूलिंग, एआय फास्ट अँड कम्फर्ट मोड, ५-स्टेप कन्वर्टिबल कूलिंग आणि क्वाइट ऑपरेशन यांसारखी वैशिष्ट्ये या श्रेणीला आधुनिक राहणीमानासाठी अनुकूल बनवतात.

टिकाऊ रचनेसह कॉपर कंडेन्सर, स्मार्ट सोयीसुविधा जसे वाय-फाय व स्मार्टथिंग्ज ॲप कंट्रोल, लुप्त एलईडी पॅनेल डिस्प्ले, विविध कूलिंग मोड्स (टर्बो, स्लीप, डिह्युमिडिफिकेशन इत्यादी) आणि प्रगत फिल्टर तंत्रज्ञान (फ्रीज वॉश, ऑटो-क्लीन, ॲण्टी-बॅक्टेरिअल फिल्टर) खात्री देतात की, कार्यक्षमता, स्वच्छता आणि सुलभ वापर एकत्रित असतील.

ग्राहक सॅमसंग अधिकृत सहयोगी स्टोअर्स, सॅमसंग.कॉम आणि आघाडीच्या ई-कॉमर्स प्लेटफॉर्म्सवर या उत्सवी ऑफर्सचा आनंद घेऊ शकतात. उत्सवासाठी घराला सुशोभित करायचे असो किंवा प्रियजनांना आरामदायी सुविधा द्यायच्या असोत सॅमसंग बीस्पोक एआय एअर कंडिशनर खरेदी करण्याची ही परिपूर्ण वेळ आहे.

# एअरटेल बिझनेसला भारतीय रेल्वे सुरक्षा संचालन केंद्र (आयआरएसओसी) साठी मिळाला बहुवर्षीय करार

**मुंबई, ६ ऑक्टोबर :** एअरटेल बिझनेसला भारतीय रेल्वे सुरक्षा संचालन केंद्र (आयआरएसओसी) कडून एक बहुवर्षीय करार मिळाला आहे, ज्याअंतर्गत एअरटेल भारतीय रेल्वेच्या डिजिटल नेटवर्कच्या सुरक्षेसाठी अत्याधुनिक आणि व्यापक सायबर सुरक्षा सेवा प्रदान करेल.

भारतीय रेल ही देशातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या सेवांपैकी एक आहे. दररोजची १३,००० हून अधिक गाड्या चालवते, २ कोटींपेक्षा अधिक प्रवाशांना प्रवासाची सुविधा देते आणि लाखो डिजिटल व्यवहार पूर्ण करते. याशिवाय, ती दरवर्षी १.५ अब्ज टनांहून अधिक माल देशभर पोहोचवते. अशा परिस्थितीत प्रवाशांची वैयक्तिक माहिती, पेमेंटशी संबंधित डेटा आणि रेल्वेचे कामकाज जसे की तिकीटबुकिंग, ट्रेन ट्रॅकिंग, मालवाहतूक आणि सिग्नलिंग यांशी संबंधित माहिती सुरक्षित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, विशेषतः अशा काळात जेव्हा सायबर हल्ल्यांचा धोका सतत वाढत आहे.

एअरटेल बिझनेस भारतीय रेल्वेच्या विशाल डेटाबेसचे संरक्षण करण्यासाठी एक मजबूत आणि बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था उभारेल. ही प्रणाली सर्व सुरक्षा नियंत्रणांना एकाच ठिकाणाहून व्यवस्थापित करेल, ज्यामुळे रेल्वेच्या डिजिटल सेवा ज्यामध्ये देशभरातील २६ ठिकाणी कार्यरत सुमारे १,६०,००० कर्मचारी सहभागी आहेत सतत सुरक्षित आणि अखंड चालू राहतील.

या प्रकल्पात अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा वापर केला जाईल, जे जगभरात सर्वात विश्वासार्ह मानले जातात. त्यासोबतच 'मेक इन इंडिया' अंतर्गत विकसित केलेली नवी भारतीय सायबर सुरक्षा तंत्रज्ञानेही समाविष्ट केली जातील. या सर्वांच्या साहाय्याने एअरटेल अशी एक स्मार्ट सुरक्षा प्रणाली उभारेल, ज्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) च्या मदतीने सायबर धोक्यांची ओळख आणि प्रतिबंध केला जाईल. ही व्यवस्था देशाच्या महत्त्वपूर्ण पायाभूत संरचनेचे जसे की रेल्वेचे सर्व प्रकारच्या डिजिटल धोक्यांपासून संरक्षण करण्यासाठी तयार केली जात आहे.

शरद सिन्हा, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक एअरटेल बिझनेस यांनी सांगितले, आजच्या काळात सायबर हल्ल्यांचा धोका सतत वाढत आहे. अशा परिस्थितीत रेल्वेसारख्या मोठ्या व्यवस्थेसाठी आपला डेटा, संचालन आणि प्रवाशांच्या सुरक्षेला बळकट ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एअरटेल बिझनेसमध्ये आम्हाला ठाऊक आहे की अशा धोक्यांपासून बचाव करण्यासाठी प्रगत सुरक्षा प्रणाली किती आवश्यक असतात. आम्हाला अभिमान आहे की आयआरएसओसीने आम्हाला आपला विश्वासू भागीदार म्हणून निवडले आहे, ज्यामुळे आम्ही भारतीय रेल्वेसारख्या विशाल डिजिटल प्रणालीचे ज्यामध्ये देशभरातील नेटवर्क आणि डेटा समाविष्ट आहे. सुरक्षितपणे संरक्षण देऊ शकतो. आमची सुरक्षा व्यवस्था तिकीटिंग आणि डेटा व्यवस्थापन अधिक मजबूत करेल, रेल्वेच्या डिजिटल कामकाजाला सायबर धोक्यांपासून सुरक्षित ठेवेल आणि दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांना सुरक्षित व अखंड डिजिटल सेवा प्रदान करेल.

दिलीप कुमार, ईडीआयपी रेल्वे बोर्ड यांनी सांगितले, आज रेल्वेच्या कामकाज, देखभाल, उत्पादन आणि संसाधनांच्या खरेदीमध्ये डिजिटल माहिती आणि संवाद तंत्रज्ञान अवलंबित्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अशा परिस्थितीत सायबर सुरक्षा अत्यंत आवश्यक बनली आहे. आयआरएसओसीच्या स्थापनेमुळे एक केंद्रीकृत सुरक्षा संचालन केंद्र उभारले जाईल, जे भारतीय रेल्वेच्या डिजिटल मालमत्तेची सातत्याने निगराणी करेल, सायबर धोक्यांची ओळख पटवेल आणि त्यावर तत्काळ कारवाई करेल. हे केंद्र सायबर धोक्यांशी संबंधित माहिती गोळा करेल आणि राष्ट्रीय सायबर सुरक्षा संस्थांशी समन्वय साधून काम करेल. तसेच, माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित संसाधनांच्या संचालन आणि देखभालीचे सुयोग्य नियोजन केल्यामुळे रेल्वेच्या सेवांमध्ये अधिक सुधारणा होईल आणि प्रवाशांना कोणत्याही व्यत्ययाशिवाय सेवा मिळत राहतील.

# मिशन विश्व ममत्व फाऊंडेशनचा तिसरा वार्षिकोत्सव उत्साहात साजरा



**नागपूर, ६ ऑक्टोबर :** मिशन विश्व ममत्व फाऊंडेशनने आपला तिसरा वार्षिकोत्सव अत्यंत उत्साह आणि अभिमानाने साजरा केला. या निमित्ताने संस्थेने ट्रान्सजेंडर समाजाच्या कल्याण आणि सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार पुन्हा दृढ केला. कार्यक्रमाला अनेक मान्यवर, समर्थक आणि समाजातील सदस्यांनी उपस्थित राहून संस्थेच्या समावेशक आणि समानतेच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. दीपप्रज्वलन मुख्य अतिथी सौ. इनुजी मजूमदार (संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, ए.एम. सिनेमा), सौ. मीराजी कडवे (संचालक, तरुण भारत) आणि फाऊंडेशनच्या संचालिका सौ. श्रद्धा जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर फाऊंडेशनच्या ट्रान्सजेंडर सदस्यांनी सादर केलेल्या महिषासुरमर्दिनी स्तोत्राने उपस्थितांचे मन भारावून गेले. या प्रसंगी फाऊंडेशनतर्फे चार ट्रान्सजेंडर व्यक्तींना राणी ढवळे, मोहिनी, सागर आणि प्रवीण यांना अनुक्रमे सामाजिक कार्य, उद्योजकता, कला आणि शिक्षण या क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्यासाठी नागपूर गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

ट्रान्सजेंडर वकील शिवानी सुरकर यांनी फाऊंडेशनच्या प्रकल्पांचा अहवाल सादर केला, तर पी.आर.ओ. मोहिनी यांनी सर्व समर्थकांचे आभार मानून संस्थेचे ध्येय नाकारणे ते स्वीकारणे पुन्हा अधोरेखित केले.

मुख्य अतिथी इनुजी मजूमदार यांनी या वेळी फाऊंडेशनच्या संकेतस्थळ www.vishwamamatwa.org चे उद्घाटन केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

मिशन विश्व ममत्व फाऊंडेशन ट्रान्सजेंडर समाजाच्या शिक्षण, आरोग्य आणि कौशल्यविकासासाठी आपले समर्पित कार्य सातत्याने करत आहे.

# सद्गुरु श्री शिवकृपानंद स्वामीजी यांच्या मंगल वाणीचा हजारो साधकांनी घेतला लाभ

**नागपूर, ६ ऑक्टोबर :** सहसा आपण ज्याला धर्म समजतो ती उपासना पद्धती असून त्यातून आंतरिक बदल घडून येत नाही. आंतरिक बदल घडवण्याकरिता आत्मानुभूतीचे संस्कार आवश्यक असून हे अमूल्य संस्कार समाजातील माणसांपर्यंत पोचावे ह्या उद्देशानेच हिमालयातील सद्गुरूंनी स्वामीजींना ह्या आत्मज्ञानाचा प्रचार प्रसार करण्यास अधिकृत केले, असे आशीर्वचन हिमालयीन सद्गुरु श्री शिवकृपानंद स्वामीजी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित भक्तांना दिले.



ध्यानस्थली नागपूर, मध्यभारत समर्पण आश्रम, ठाणा (पादरी), बुटीबोरी-उमरेड रोड, येथे २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान नवरात्री अनुष्ठानाचे आयोजन करण्यात आले होते ज्या अंतर्गत येथे बांधण्यात आलेल्या भव्य श्री गुरुशक्तिधाम येथे श्री मंगल मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली व दिनांक २ ऑक्टोबर रोजी त्याचा भव्य लोकार्पण सोहोळा आयोजिण्यात आला. त्यावेळी सद्गुरु श्री शिवकृपानंद स्वामीजींच्या आध्यात्मिक सत्संगाचा दस-याच्या शुभमुहूर्तावर हजारो साधकांनी लाभ घेतला.

लोकार्पण सोहोळ्याचा प्रारंभ सुरुवातीला अतिरिक्त पोलिस महासंचालक श्री अजेय रानडे, नागपूर रेंजचे पोलिस महानिरीक्षक श्री संदीप पाटील, राणा शिपिंग कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्री राणा सुर्यवंशी, रुबी हॉल पुणेचे अध्यक्ष डॉ. परवेझ ग्रांट, योग प्रभा भारती सेवा संस्था ट्रस्टच्या व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती शीना ओमप्रकाश, लॉईड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री प्रभाकरण, व कार्यकारी संचालक श्री व्यंकटेशन, गंगाधर इन्फोटेकचे व्यवस्थापकीय संचालक श्री आशीष फडणवीस, बेल लॅब कॅलिफोर्निया विद्यापीठाचे श्री नरसिम्हा रेड्डी, आयसीएआरचे उपसंचालक डॉ. सुरेश चौधरी, गुजरातचे निवृत्त पोलिस महासंचालक श्री एस. एस. खांडवाला यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आला. त्यानंतर पुजनीय गुरुमाँ च्या हस्ते श्री गुरुशक्तीधामचे लोकार्पण करण्यात आले. हे भव्य श्री गुरुशक्तीधाम अवघ्या ९ महिन्यात तयार करण्यात आले आहे. साधकांच्या जयघोषात सद्गुरु श्री शिवकृपानंद स्वामीजींचे मंचावर आगमन झाले.

श्री मंगल मूर्ती मध्ये अंतर्मुख शक्ती स्थापित केले असून त्याचा सान्निध्यात येणाऱ्या साधकांना आत्मसाक्षात्काराची सर्वश्रेष्ठ अनुभूती होऊ शकते. आत्मसाक्षात्काराच्या माध्यमातून आत्मधर्म जागृत होत असून त्यानंतर साधक बाह्य प्रभावांमधून मुक्त होत असून स्वतःच्या आत्म्याचा मार्गदर्शनाखाली सशक्त जीवन जगू शकतात, असे ह्या प्रसंगी सद्गुरू श्री शिवकृपानंद स्वामीजी म्हणाले.


# एण्ड टीव्हीवर होणार गोलमाल!

**मुंबई, ६ ऑक्टोबर :** एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडमध्ये प्रेक्षकांना हसवून-हसवून लोटपोट करणाऱ्या मनोरंजनाचा आनंद मिळणार आहे. हप्पू (योगेश त्रिपाठी) आणखी एका दुविधेमध्ये सापडतो. एका रात्री, त्याची टॉमी रिच नावाच्या माणसाशी भेट होते, जो गंभीर अवस्थेत असतो. तो हप्पूला सांगतो की, गुंडांनी त्याच्यावर हल्ला केला आणि त्याचा मोबा

ल झुडपात पडला आहे. टॉमी हप्पूकडे मदत मागतो, पण न्योच्छावरची मोठी रक्कम घेऊन जाणारा संशयित हप्पू त्याला मदत करण्यास नकार देतो, त्याऐवजी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याचा सल्ला देतो. नंतर, हप्पूला आश्चर्यकारकपणे त्या झुडपांमध्ये सोन्याच्या दागिन्यांनी भरलेली बॅग सापडते. मातारानीची कृपा आहे याची खात्री पटल्यानंतर तो ती बॅग राजेशला (गीतांजली मिश्रा) देतो. राजेश हप्पूच्या नकळत ती बॅग गब्बरला (साहेब दास माणिकपुरी) देते, जो ते सोने वितळवून सोन्याची बिस्किटे बनवण्याचे आश्वासन देतो, ज्यानंतर परिस्थिती आणखी बिकट होते. हप्पूला कळते की दागिने खरोखर टॉमी रिचचे आहेत आणि गब्बर बॅग हरवल्याचे सांगतो तेव्हा अडचणी वाढतात! गब्बरवर संशय आल्याने हप्पू, बेनी (विश्वनाथ चॅटर्जी) आणि मनोहर (नितीन जाधव) सत्य शोधण्यासाठी म्हशींचे रूप धारण करतात. दरम्यान, हृतिक (आर्यन प्रजापती) आणि रणबीर (सोम्य आझाद) मूर्ख हलकेपासून प्रेरित होतात, ज्याने प्लँचेट सादर करून किआराला संमोहित केले होते. मुले देखील कटोरी अम्माला (हिमानी शिवपुरी) त्यांच्या खोडकर हेतूंबाबत सांगितलेल्या खोदीला (शरद व्यास) संमोहित करण्याचा प्रयत्न करतात. पण अम्मा आपल्या हुशारीने मुलांना तसे न करण्यास मार्गदर्शन करते. दुसरीकडे सोनू (संजय चौधरी) मलायकाला (सोनल पनवारा) प्रभावित करण्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू ठेवतो. यावेळी, तो टिनू नावाच्या मुलीसोबत लव्ह ट्रायंगलचे खोटे नाटक करतो, तसेच त्याचा जीव धोक्यात असल्याचे देखील खोटे सांगतो. मलायका त्याच्या जाळ्यामध्ये अडकेल का? आणि हप्पू बॅग शोधण्यामध्ये यशस्वी होईल का?

एण्ड टीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर है'च्या आगामी एपिसोडमध्ये गोंधळ निर्माण होतो, जेथे डेव्हिड चाचाला (अनुप उपाध्याय) दक्षिण आफ्रिकेत मोठी मालमत्ता मिळते आणि तो ती संपत्ती विभुतीला (आसिफ शेख) देण्याचा निर्णय घेतो. कागदपत्रांवर स्वाक्षरी होणार असतानाच एक अनपेक्षित पाहुणी चार्मी (चारुलता) दक्षिण आफ्रिकेहून येते आणि ती स्वतःची ओळख चार्मी डेव्हिड मिश्रा अशी करून देते. अनिता (विदिशा श्रीवास्तव) आणि विभुतीला धक्का बसतो. चाचाजी तिच्या आईबाबत सांगतात आणि त्यांच्या नशिबाचे श्रेय तिच्या आईला देतात. त्यानंतर ते चार्मीच्या नावे प्रॉपर्टी हस्तांतरित करण्याचे ठरवतात. संतप्त, पण बाहेरून शांत असल्याची दाखवणारी अनिता ही संधी गमावण्यासाठी विभुतीला फटकारते. पण, चार्मी तिचा खरा हेतू सांगते की ती कानपूरमधील मॉण्टी नावाच्या मुलाचा शोध घेत आहे, ज्याला काही वर्षांपूर्वी तिचा कुत्रा चावला होता, ज्यामुळे तो कुत्र्यासारखा भुंकत आहे. तिची मॉण्टीला प्रॉपर्टी देण्याची इच्छा आहे.

# शब्दकोडे क्रमांक २२३४



**आडवे शब्द :-**

१) **** **** *** *** दिगंबरा दत्तात्रयाचा मंत्र
११) सत्वांश
१२) द्रवपदार्थ गाळून घेण्याचे साधन
१३) कठोर
१४) मीपणा, अहंकार
१५) अंगरखा
१७) पुष्परस
१८) मुंबईतील एक श्रीमंत उपनगर
२०) हत्तीचे ओरडणे
२१) तल्लीन, तादात्म्य
२३) कशा प्रकारचा?
२५) समानता नसणे
२७) पत्त्यातील जोडपे
२८) फार मोठा फायदा
३०) हाक
३१) मोठी बहीण
३२) सोन्याचा धागा
३३) शहर
३५) धमनी
३६) तेव्हा(ग्रा),
३८) गौणपद
३९) रविवासर ४१) अथवा
४२) कुराणातील वचने
४४) बैलाचा सण
४६) पराभव
४७) कलावंत
४९) बहुतांशी, आजूबाजूस
५०) श्रीकृष्णाचे एक नाव
५२) मोठी कळशी
५३) एक पालेभाजी
५४) पुरुष
५५) एक दागिना
५७) भाजलेल्या विटेचा तुकडा
५८) एकावर एक ठेवणे
६०) ताकदवान माणसाच्या पुढे सर्वच नमतात या अर्थाची म्हण
६३) एक सुगंधी वनस्पती
६५) सप्त
६६) शेगावचे संत
६९) पुष्कळ ओलावा असलेली जमीन
७०) उत्तराधिकारी

**उभे शब्द :-**

१) चोवीस तासाचा काळ
२) मेंढा
३) ढीग
४) शंकराचे एक नाव
५) ताकद
६) राजसुख
७) पुष्पदल
८) किंमत
९) भलता संबंध जोडणे या अर्थाची म्हण
१०) वरई
१६) मजबूत, टिकाऊ, जाड व घट्ट
१७) माया, प्रेम
१९) खरकट्याची प्रचंड रास
२१) कायदेशीर
२२) वाकबगार, पटाईत
२४) शतदा
२५) एखाद्यास पळवून नेणे
२६) गळाला अडकणारा प्राणी
२९) शरम
३४) सूर्याचे एक नाव
३७) वेडावाकडा
३८) पार्वतीचे एक नाव
४०) माजघर, भोजनशाळा
४३) श्रीरामाचा एक पुत्र
४४) मूल
४५) उर्फ
४७) सोवळ्यातील रेशमी वस्त्र
४८) आजच्या आधीचा दिवस
४९) अत्यंत तिखट, जाळणारे
५०) मागाहून
५१) दुःख, वेदना(हिं)
५२) जेमतेम
५३) एक प्रकारचे गोड बी
५४) कबर
५६) उगाच
५९) देशाचे नाणे
६१) एक धातू
६२) पायजमा
६३) षट
६४) मोठी जाड कापडी बैठक
६६) रानरेडा
६७) धमनी
६८) मनाची इच्छा

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# गीतांजली मिश्राने उज्जैनला भेट देऊन महाकालचा आशीर्वाद घेतला!

**मुंबई, ६ ऑक्टोबर :** एण्ड टीव्हीवरील घरेलू कॉमेडी 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये उत्साही राजेशची भूमिका साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा मालिकेमधील त्यांच्या मोहकतेसाठी, तसेच भगवान शिवाप्रती अविरत भक्तीसाठी देखील लोकप्रिय आहेत. निस्सीम शिवभक्त गीतांजली यांची भगवान शिवावर दृढ निष्ठा आहे. त्या त्यांची ताकद, शांतमय स्वभाव आणि सर्जनशीलतेचे श्रेय भोलेनाथच्या आशीर्वादाला देतात. नुकतेच, त्यांनी व्यस्त शूटिंग वेळापत्रकामधून वेळ काढत आध्यात्मिकतेचा अनुभव घेतला, जेथे उज्जैनमधील पवित्र महाकालेश्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले, जे भगवान शिवाच्या पवित्र मंदिरांपैकी एक आहे.

आपल्या दैवी प्रवासाबाबत सांगताना गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''मी उज्जैनमध्ये येताच मला वातावरणामध्ये अद्वितीय दैवी ऊर्जा जाणवली. भक्तीमय उत्साह, सर्वत्र 'हर हर महादेव'चा जयघोष आणि महाकाल मंदिरामधील आध्यात्मिक वातावरणाने त्वरित मला शांतमय अनुभव दिला. सायंकाळी आरतीदरम्यान शिवलिंगासमोर उभे राहण्याचा, तसेच आसपास उपस्थित हजारो भक्तांना पाहण्याचा अनुभव भावनामय होता, ज्याचे शब्दांमध्ये वर्णन करता येऊ शकत नाही. सर्वत्र दैवी वातावरण निर्माण झाले होते, ज्यामुळे माझे मन प्रसन्न झाले.''

भगवान शिवाची निस्सीम भक्त असलेल्या गीतांजली यांचा विश्वास आहे की, भगवान शिव दुष्टाचे विनाशक असण्यासोबत संतुलन व अंतर्गत शांततेचे प्रतीक देखील आहेत. त्या नम्रपणे हात जोडत व स्मित हास्यासह म्हणाल्या, ''मी भगवान शंकराच्या मंदिरामध्ये जाते तेव्हा मानसिकदृष्ट्या, भावनिकदृष्ट्या व आध्यात्मिकदृष्ट्या उत्साहित होते. महाकालची उपस्थिती शक्तिशाली असण्यासोबत दयाळू आहे. मी माझे कुटुंब, मालिका 'हप्पू की उलटन पलटन'ची संपूर्ण टीम आणि आमच्यावर प्रेमाचा वर्षाव करणाऱ्या सर्व चाहत्यांसाठी प्रार्थना केली.''


## आज का अंदाज

मंगळवार ७ ऑक्टोबर २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 1 | 2 | 5 | 8 |
|---|---|---|---|
| 235 | 246 | 690 | 800 |
| 370 | 390 | 500 | 558 |
| 460 | 480 | 780 | 350 |
| 19 | 29 | 53 | 83 |
| 10 | 20 | 57 | 87 |
| 16 | 26 | 54 | 84 |

मुंबई बाजार

| 4 | 5 | 6 | 9 |
|---|---|---|---|
| 149 | 159 | 114 | 270 |
| 257 | 267 | 277 | 450 |
| 347 | 357 | 330 | 360 |
| 43 | 53 | 61 | 91 |
| 47 | 57 | 62 | 92 |
| 40 | 50 | 68 | 98 |

७ ऑक्टोबर २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 31 | 61 | 72 | 02 |
| 35 | 65 | 78 | 08 |
| 39 | 69 | 74 | 04 |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक
ओपन टू क्लोज
0 6 9 8 7

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## राशीभविष्य

**मेष :** कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल, ज्यामुळे मानसिक शांतता लाभेल. आपले आणि परके यांची जाणीव होईल, लहान-मोठे आर्थिक व्यवहार करताना विशेष सावधानता बाळगा.

**वृषभ :** आज नवीन उत्साह, ऊर्जा आणि आनंद अनुभवायला मिळेल. आर्थिक बाजू मजबूत होईल. अनपेक्षित धनलाभ होण्याची शक्यता आहे. तुमच्या ध्येयानुसार जीवनात नवीन मार्ग सापडतील.

**मिथुन :** अनेकांचे सहकार्य मिळाल्याने आज तुम्ही सहजपणे पुढे जाल. ठरवलेल्या गाठीभेटी आणि महत्त्वाचे निर्णय मार्गी लागतील. तुमची आर्थिक बाजू बळकट होईल. दिवस उत्तम आहे.

**कर्क :** आज कामात अधिक ताण जाणवेल. पण कुटुंबाची चांगली साथ मिळेल. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे. उत्तम प्रगतीचे योग आहेत. कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल.

**सिंह :** आज मान-सन्मान आणि प्रतिष्ठा वाढेल. नोकरीत वरिष्ठांची विशेष मर्जी तुमच्यावर राहील. आत्मविश्वासाने काम पूर्ण करा, ज्यामुळे अपेक्षित यश मिळेल. कुटुंबात सुख-शांती नांदेल.

**कन्या :** सरकारी कामात यश मिळेल. धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हाल. आरोग्य चांगले राहील, स्वत:साठी वेळ काढून महत्त्वाचे निर्णय घ्या. मानसिक शांतता लाभेल. आध्यात्मिक प्रगती साधाल.

**तूळ :** आज तुम्हाला कामात अधिक ताण जाणवेल, पण कुटुंबाची चांगली साथ मिळेल. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता असून, उत्तम प्रगतीचे योग आहेत. उधार दिलेले पैसे परत मिळाल्याने चिंता दूर होतील.

**वृश्चिक :** आज कामाचा काहीसा तणाव जाणवेल. आयुष्यातील अडचणींमुळे तुमचे मन अध्यात्माकडे वळेल. वस्तू गहाळ होणार नाहीत, याची दक्षता घ्या आणि काळजी घ्या.

**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य राहील. तुमच्या मनात प्रेम आणि सहकार्याची भावना राहील. जुन्या मित्राला भेटल्याने आनंद होईल. सरकारी कामात निष्काळजीपणा टाळा. तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवा.

**मकर :** मौजमजेच्या वस्तूंवर जास्त खर्च होऊ शकतो. ज्यामुळे भविष्यात समस्या येऊ शकते. तुमच्या उत्पन्नाचा विचार करूनच खर्च करा. तुम्ही घेतलेल्या चांगल्या निर्णयामुळे आज यश मिळण्याचे योग आहेत.

**कुंभ :** रखडलेली आणि जुनी कामे मार्गी लागतील. ज्यामुळे मोठा दिलासा मिळेल. शेती किंवा व्यवसायात नवीन कल्पनांना यश मिळण्याची शक्यता आहे. तुम्ही कुटुंबियांसोबत जास्त वेळ घालवाल.

**मीन :** नकारात्मकता बाजूला सारून फक्त महत्त्वाच्या कामावर लक्ष केंद्रित करा. कामानिमित्त प्रवास होण्याची शक्यता आहे, खर्चावर नियंत्रण ठेवा. आपले आणि परके यांची जाणीव होईल.

# संपूर्ण मान्सूनमध्ये सरासरीपेक्षा ३९ मिलिमीटर जास्त पाऊस

## वर्षभराची पिण्याच्या पाण्याची, शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांची काळजी मिटली



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ६ :
यंदा संपूर्ण मान्सूनमध्ये सरासरीपेक्षा जादा पाऊस पडल्याचे आकडेवारीवर नजर टाकल्यास दिसून येते. जिल्ह्यात वर्षात सरासरी ६९३ मि.मी. पाऊस पडणे अपेक्षित असताना ७३२ मि.मी. पाऊस झाला आहे. त्यामुळे प्रकल्प तुडुंब भरले असून, पिण्याच्या पाण्याची काळजी मिटली. रब्बी हंगामातीलही प्रकल्पातून पाणी मिळण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे.
जिल्ह्यात यंदा जूनच्या प्रारंभी वरूणराजाने फारशी कृपा केली नाही. मृगनक्षत्रात पावसाने पाठ फिरवल्याने अनेकांची चिंता वाढली. मात्र जूनच्या अखेरीस मात्र दोन वेळा मुसळधार पाऊस झाला. परिणामी महिना संपला तेव्हा १५५.८ मि.मी. पावसाची नोंद झाली. हा पाऊस सरासरीच्या ११३.८ टक्के होता. गतवर्षी जून महिन्यात हेच प्रमाण १३९ मिमी (सरासरीच्या १०१.५ टक्के) होते. जुलैत पावसाची संततधार सुरु होती.
मात्र. ऑगस्टमध्ये पावसाने सरासरी गाठता आली नाही. सप्टेंबरच्या अखेर थेट वार्षिक सरासरी पेक्षा जास्त झाल्याची नोंद केली. रुंदीकरणाचे काम ठरली डोकेदुखीः सहा महिन्यांपासून डाबकी रोडच्या रुंदीकरणाचे काम सुरु आहे. मात्र कामाची गती संथ असून, याचा फटका नागरिकांना पावसामुळे अनेकदा बसला होता. रस्ता अनेक ठिकाणी खोदून ठेवला असून दुकाने, घरांसमोर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले होते. परिणामी पाऊस व चिखलातून मार्ग काढताना नागरिकांना प्रचंड कसरत करावी लागली होती. दुकानात साहित्य घेण्यासाठी गेलेल्या ग्राहकांना दुचाकी रस्त्यावरच उभी करावी लागत होती. आता तरी हे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी होत आहे.
नाले सफाईचे दावे पुन्हा ठरले फोल : नाली सफाई व्यवस्थित न झाल्याने पावसाळ्यात सांड पाणी रतनलाल प्लॉटकडून जठारपेठ चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर आले होते. रामनगरात पाणी अनेक ठिकाणी साचले. अनेक ठिकाणी फ्लॅटमध्ये जाण्यासाठीही सदनिका धारकांना कसरत करावी लागली. मुख्य बाजारपेठ, डॉ. आंबेडकर खुले नाट्यगृहाजवळ पाण्याचे लोट वाहत होते.
पाऊस कमी; तरीही नुकसान १) सन २०२३मध्ये एकूण केवळ ७७६ मि.मी. पाऊस झाला. मात्र सहा ते आठ दिवसातच जादा पाऊस झाल्याने झाल होता. जुलैमध्ये १ लाख ६४ हजार हेक्टर, नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये १ लाख ८९ हजार ६८१ तर फेब्रुवारीत अवकाळी पाऊस झाल्याने ९, १५२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांची हानी झाली होती.

# दुर्गादेवी विसर्जन मिरवणुकीवरील दगडफेकीमध्ये १० जण जखमी



■ महासागर प्रतिनिधी
संग्रामपूर, दि. ६ :
तालुक्यातील बावनबीर येथे देवी विसर्जन मिरवणुकीदरम्यान दोन गटांमध्ये वाद होऊन दगडफेक झाल्याची घटना शनिवारी रात्री सरकारी दवाखान्याजवळ घडली. या दगडफेकीत आठ ते दहा नागरिक जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी दवाखान्यात नेत असतानाही त्यांच्या वाहनावर पुन्हा दगडफेक झाल्याचीही माहिती समोर आली आहे. दरम्यान, विसर्जन मिरवणूक थांबली होती. पहाटे तीन वाजता अखेर पोलिसांच्या संरक्षणात दुर्गा देवीच्या मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. त्यानंतर आज गावात प्रचंड बंदोबस्त लावला असून तणावपूर्ण वातावरण होते. दोन गटांमध्ये तुफान दगडफेक झाल्याने गावात प्रचंड तणाव निर्माण झाल्यानंतर अतिरिक्त पोलिस अधीक्षक खामगाव, उपविभागीय अधिकारी (पो.) तसेच सोनाळा व तामगाव पोलिस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. दरम्यान, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी गावात बंदोबस्त तैनात केला होता. या दगडफेकीत दुर्गा मातेच्या मूर्तीचा हात तुटल्याने मूर्तीची विटंबना झाली होती.
तक्रारकर्ता म्हणतो जमावाने दगडफेक केली फिर्यादी भास्कर शहादेव इलामे (वय ३७), व्यवसाय शेती, रा. बावनबिर यांनी पोलिस स्टेशनला तक्रार दिली की, ही घटना ४ ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० वाजताचे सुमारास गावातील सरकारी दवाखान्याजवळ घडली. दुर्गादेवी विसर्जनाची मिरवणूक सुरू असताना काही आरोपींनी गैरकायदेशीर जमाव जमवून मिरवणुकीवर दगडफेक केली. यात मिरवणुकीतील अनेक भाविक जखमी झाले. दगडफेकीत देवीच्या मूर्तीचा हात मोडल्याने भाविकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. नेत्यांच्या भेटी, शांततेचे आवाहन बावनबिर गावात झालेल्या दुर्गादेवी विसर्जन मिरवणुकीतील दगडफेकीच्या घटनेनंतर परिसरातील तणावाचे पार्श्वभूमीवर अनेक मान्यवरांनी गावाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या वेळी सहपालकमंत्री संजय सावकारे, केंद्रीय राज्यमंत्री खासदार प्रतापराव जाधव, माजी मंत्री आमदार संजय कुटे, जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे तसेच अतिरिक्त पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा यांनी बावनबिर येथे भेट देत गावातील नागरिकांशी संवाद साधला. अधिकाऱ्यांनी आणि जनप्रतिनिधींना शांतता व सौहार्द राखण्याचे आवाहन केले आहे.
परिस्थिती सध्या नियंत्रणात असल्याचे पोलिस प्रशासनाने सांगितले आहे.

# गावात एकी असेल तर विकास कोणी रोखू शकत नाही : आमदार संजय कुटे

## पळशी झाशी ग्रामपंचायतीत समृद्ध पंचायतराज अभियान



■ महासागर प्रतिनिधी
संग्रामपूर, दि. ६ :
गावात एकी असेल तर विकास रोखू शकत नाही; पळशी झाशी गावाने एकत्रित राहून विकास साधला ही आनंदाची बाब आहे, असे प्रतिपादन आ डॉ संजय कुटे यांनी केले. तालुक्यातील ग्रामपंचायत पळशी झाशी तर्फे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व सेवा पंधरवडा कार्यक्रमाचा सोहळा ४ ऑक्टोबर रोजी पार पडला, यावेळी आ कुटे बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेशजी महाराज व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूजनाने झाली.टाळ-मृदंगाच्या गजरात गावातून स्वच्छता रॅली काढण्यात आली.
श्री शंकरजी महाराज मंगल कार्यालयात लावण्यात आलेल्या विविध स्टॉल्सची मान्यवरांनी पाहणी करत गटांचे कौतुक केले. महिला बचत गटांचा सहभागाने सेवा पंधरवडा उपक्रमात गावातील महिला बचत गटांनी सहभाग घेत विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. शासकीय सेवा पंधरवडा उपक्रमात सहकार्य करणाऱ्या महिला भजन मंडळांचा तसेच कबड्डी व विविध स्पर्धांमध्ये यश मिळवणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माधुरी कैलास मारोडे या तर प्रमुख मार्गदर्शक आमदार संजय कुटे, तामगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पंडित सोनवणे, उपनिरीक्षक बोपटे, सहाय्यक गटविकास अधिकारी टाले, सरपंच प्रियंका राहुल मेटांगे, उपसरपंच पंचफुला पवार, ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.
प्रास्ताविक राहुल मेटांगे यांनी केले, सूत्रसंचालन गावचे तलाठी रंगदळ यांनी तर आभार प्रदर्शन सचिव हेमंत देशमुख यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सविता चितोडे, गोकुळा ठाकरे, वैशाली मारोडे, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका यांनी मेहनत घेतली.

**विविध प्रदर्शनींचे अव्वल नंबर**

व्यवसाय प्रदर्शन स्पर्धेमध्ये राधास्वामी, जय दुर्गा व फुले शाहू आंबेडकर स्वयंसहायता समूहांनी अनुक्रमे १, २, ३ क्रमांक पटकावले. तसेच डिश डेकोरेशनमध्ये उन्नती समूह शयोगिता शिरसोले, तारूमाता व रमाई महिला समूहांनी पहिल्या तीन क्रमांकांवर बाजी मारली. 'टाकाऊपासून टिकाऊ' वस्तू स्पर्धेमध्ये आदर्श स्वयंसहायता समूह पूजा मारोडे, पूजा बाघ व पुनम गिरी यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

**गाव विकासात अनेकांचे योगदान**

विकासासाठी अनेकांनी योगदान दिले आहे. आमदार कुटे यांनी वेळोवेळी निधी उपलब्ध करून दिला. गावकरीही उत्साहाने उपक्रमात सहभागी होतात.
पत्रकार बांधवांचेही सहकार्यमोलाचे आहे, अशी प्रतिक्रीया सरपंच प्रियंका मेटांगे यांनी व्यक्त केले आहे.
स्पर्धांमधील विजेते संगीत खुर्ची स्पर्धेत कल्पना चितोडे, सुनिता मारोडे व मनीषा मारोडे यांना अनुक्रमे १, २, ३ क्रमांक मिळाले.
रांगोळी स्पर्धेमध्ये निकिता मारोडे, सानिका दाने, योगिता मारोडे व वैष्णवी मारोडे यांनी पहिल्या तीन स्थानांवर झेंडा फडकवला. उखाणे स्पर्धेत मीना राहटे, भारती दामले, हर्षा यादगिरे व मंगला करांगळे यांनी क्रमांक पटकावले.

# आपल्या कार्यातून मौल्यवान योगदान द्यावे : पालकमंत्री दत्तात्रय भरणे

## जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्यात ४० जणांना प्रमाणपत्र वाटप



■ महासागर प्रतिनिधी
वाशीम, दि. ६ :
शासकीय सेवेत रुजू होत असताना नागरिकाभिमुख, जबाबदार आणि कार्यक्षम अशा भावनेने कार्य करा. शासनाने निर्माण केलेल्या संधींचा उपयोग समाजहितासाठी करा आणि आपल्या कार्यातून प्रशासनात मौल्यान्वित योगदान द्यावे. असे प्रतिपादन राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, शासनाची सेवा ही केवळ नोकरी नसून समाजसेवेचे माध्यम आहे.
प्रत्येक कर्मचाऱ्याने आपल्या कार्यातून जनतेच्या विश्वासाला पात्र ठरावे. पारदर्शकता, तत्परता आणि प्रामाणिकपणा या मूल्यांच्या आधारे काम केल्यास शासनव्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल. मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत सर्वसमावेशक सुधारित अनुकंपा नियुक्ती धोरणानुसार ४९ उमेदवार व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त ४६ उमेदवारांच्या नियुक्तीपत्र वितरणाचा जिल्हास्तरीय रोजगार मेळावा दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, वाशीम (नियोजन भवन समिती सभागृह) येथे आयोजित करण्यात आला.यावेळी राज्याचे कृषीमंत्री तथा वाशीम जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे दूरदृष्यप्रणालीव्दारे बोलत होते. यावेळी त्यांनी नियुक्त झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. व्यासपीठावर विधानसभा सदस्य श्याम खोडे, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रास्ताविक जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. ते म्हणाले, शासनाच्या सर्वसमावेशक अनुकंपा भरती धोरणाच्या अंमलबजावणीमुळे वाशिम जिल्ह्यात आज एकाचवेळी ९७ उमेदवारांना शासकीय सेवेत नियुक्तीपत्र देण्यात आले. यामध्ये अनुकंपा भरतीअंतर्गत ४९ उमेदवार व एमपीएससी तर्फे निवड झालेल्या ४८ उमेदवारांचा समावेश आहे. राज्यात आज ५ हजार १८७ अनुकंपा उमेदवारांना, तसेच ५ हजार १२२ एमपीएससी उमेदवारांना अशा एकूण १०,३०९ उमेदवारांना एकाचवेळी नियुक्तीपत्र देण्याचा कार्यक्रम मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. त्याचे थेट प्रक्षेपण नियोजनभवनात आयोजित जिल्हास्तरीय कार्यक्रमात करण्यात आले. यादरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अनुकंपा धोरणांतर्गत व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त नियुक्तीपत्र वितरण करण्यात आले.

# विद्यापीठात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

## ना. चंद्रकांतदादा पाटील यांचे कुलगुरूंचे हस्ते स्वागत



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ६ :
महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील यांनी आज विद्यापीठाला भेट दिली. यावेळी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी पुष्पगुच्छ देवून मंत्रीमहोदयांचे विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठ अतिथीगृहात सहर्ष स्वागत केले. याप्रसंगी विद्यापीठ विकासाविषयक माहिती कुलगुरूंनी मंत्रीमहोदयांना दिली.
मागील दौ-यावेळीमंत्रीमहोदयांच्या हस्ते अनुकंपा धारकांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले होते, त्या जुलै महिन्याचा विद्यापीठ विद्यावार्ता अंक कुलगुरूंनी मंत्रीमहोदयांना प्रदान केला. विद्यावार्ता अंक पाहून मंत्रीमहोदयांनी विद्यापीठाचे कौतुक केले. याप्रसंगी मराठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर, महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुळकर्णी, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख, प्राचार्य डॉ.आर.एम. भिसे, अमरावती विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर, माजी सहसंचालक डॉ. सुबोध भांडारकर, नागपूर विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण, प्रशासन अधिकारी श्री राम राठोड, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# हिसई ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक शौचालयात गवत, झुडपे वाढली

## शासनाच्या लाखो रुपयांच्या योजनेलाच हरताळ फासल्याचे विदारक चित्र समोर

**मंगरुळपीर:** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत मंगरुळपीर पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या हिसई गट ग्रामपंचायतीने मोहगव्हान येथे बांधलेले सार्वजनिक शौचालय सध्या दुर्लक्ष आणि दुरवस्थेमुळे अक्षरशः गवताच्या आणि झुडपांच्या विळख्यात सापडले आहे. वापराअभावी हे शौचालय निष्प्रयोज्य ठरले असून, शासनाच्या लाखो रुपयांच्या योजनेलाच हरताळ फासल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हिसई ग्रामपंचायतीने नागरिकांच्या सोयीसाठी हे सार्वजनिक शौचालय उभारले. मात्र, बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या शौचालयाकडे ग्रामपंचायत प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले. परिणामी, परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात गवत, झुडपे आणि काटेरी वनस्पती वाढल्या आहेत. शौचालयाच्या इमारतीला पूर्णपणे या झुडपांनी वेढले आहे. सध्या शौचालयाच्या परिसरात एवढ्या मोठ्या प्रमाणात झुडपे वाढली आहेत की, तेथे पाऊल ठेवणेही अवघड झाले आहे. वापरासाठी बांधलेले हे शौचालय आता कचरा आणि काटेरी झाडांमध्ये गाढले गेले आहे. यामुळे, ज्या उद्देशाने शासनाने हे शौचालय उभारले होते, तो पूर्णपणे फोल ठरला आहे. या शौचालयाच्या दुरवस्थेकडे मंगरुळपीर पंचायत समिती आणि जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन, शौचालयाची साफसफाई करून ते पुन्हा नागरिकांसाठी सुरू करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अनसिंगला कायदेविषयक जनजागृती दिव्यांग तपासणी मोफत शिबिर संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
वाशीम, दि. ६ :
राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधिज्ञ संघ, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी अनसिंग येथील दिव्यांग मुलांचे विद्यालय येथे कायदेविषयक जनजागृती व दिव्यांग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या राज्य गीताने गीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी व्ही. जी. चौखंडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशीम होते. त्यांनी दिव्यांग व्यक्तींविषयी असलेल्या विविध कायद्यांबाबत माहिती देत उपस्थितांना मार्गदर्शन केले.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MUSTUFA HUSSAIN**. NOW MY NEW NAME IS **MUSTAFA HUSAIN.**
**ADD :** H-NO 48 MASKASATH ROAD OPP POLICE STATION NAGPUR: 440002 (MS)

MY OLD NAME WAS **MEENA HARISHLAL AHUJA**. NOW MY NEW NAME IS **BHAVNA MOHAN BHAGWANI.**
**ADD :** SINDHI COLONY , KHAMLA NAGPUR- 440025

MY OLD NAME WAS **PRAVITA BISWAKARMA / PRATIBHA BISWAKARMA / PRATIMA RAVILAL PARIYAR**. NOW MY NEW NAME IS **PRATIBHA RAVILAL PARIYAR.**
**ADD :** HAJARI PAHAD NAGPUR - 07

MY OLD NAME WAS **KAHEKASHA TABASSUM SAIYYED WASIM ALI /KAHEKASHA TABASSUM SAIYYED WASIM**. NOW MY NEW NAME IS **KAHEKASHA TABASSUM SAIYYAD WASIM ALI.**
**ADD :** 318 ,JUNA JAIL KHANA LODHIPURA NAGPUR 440018
PASSPORT NO.: **R5361364**

MY OLD NAME WAS **NAZEEFA FARIA MOHD MUJAHIDUD-DIN**. NOW MY NEW NAME IS **NAZEEFA FAREA MOHAMMAD MUJAHIDUDDIN QUAZI.**
**ADD :** PLOT NO.1637/A/7,NEW AHBAB SOCIETY, PENTION NAGAR, BORGAON ROAD, NAGPUR 440013 MS

I **ABDUL RAHMAN FARUKH SYED** CHANGING MY DAUGHTER NAME OLD NAME WAS **ALINA SYED.** NOW MY DAUGHTER NEW NAME IS **ALINA ALI.**
**ADD :** GANDHI LAYOUT JAFAR NAGAR NAGPUR-440013

MY OLD NAME WAS **MOHAMMAD FIROZ**. NOW MY NEW NAME IS **FIROZ ABULAIS SHEIKH.**
**ADD :** PLOT NO.165-178, KOLHE LAYOUT, NEAR SABIR MASJID, BHILGAON ROAD, WANJRA, NAGPUR 440026 MS


# ४५ वर्षांपासून रावण दहनासह, दसरा कार्यक्रमातून संस्कृतीचे होतेय जतन



■ महासागर प्रतिनिधी
वाशीम, दि. ६ : दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री कालेश्वर दुर्गा व दसरा महोत्सव समितीच्या वतीने रावण दहन मैदान शुक्रवारपेठ वाशीम येथे दसरा महोत्सव उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष अशोक हेडा होते तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार श्याम खोडे, माजी आमदार विजयराव जाधव, भाजप नेते राजू पाटील राजे, व्यापारी मंडळाचे अध्यक्ष जुगलकिशोर कोठारी, माजी नगर परिषद उपाध्यक्ष भानुप्रतापसिह ठाकूर, राम लोध, समाजसेवक अनिल केंदळे, माजी नगरसेवक व भाजपा जिल्हा कोषाध्यक्ष मिठूभाऊ शर्मा, डॉ. हरिष बाहेती,राजाभैय्या पवार, माजी नगरसेवक राहुल तूपसांडे, माजी नगरसेवक बालू मुरकुटे, भाजप शहराध्यक्ष मनिष मंत्री, समाजसेवक संतोष वानखेडे, नितीन उलेमाले, पप्पू नेनवाणी, समाजसेवक कपिल सारडा, अशोक शर्मा, नारायण बत्तुलवार, बंडू शर्मा, संतोष अग्रवाल, सुभाष गट्टाणी, पत्रकार निलेश सोमाणी, बंडू मारशेटवार, गणेश खंडाळकर, कालेश्वर दुर्गा व दसरा महोत्सव समितीचे अध्यक्ष निलेश जैस्वाल, उपाध्यक्ष गणेश बाळदी, रामुभैय्या चौबे, सागर गुप्ता आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीराम, सीता माता, बजरंगबली व सरस्वती मातेच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर आमदार श्याम खोडे, राजू पाटील राजे, विजयराव जाधव, मनिष मंत्री कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक हेडा यांनी सर्व नागरिकांना दर्स ?याच्या शुभेच्छा देत मागील ४५ वर्षांपासून दसरा कार्यक्रमाच्या संस्कृतीचे जतन केल्याबद्दल श्री कालेश्वर दुर्गा व दसरा महोत्सव समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.


**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com — दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५

क.स.म.क्र./वह.नाम/(शहर)/कावि-१३५४/२०२५ — दिनांक : १७/०९/२०२५
वाचा : १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. शशिकांत डोंगरमल शर्मा, रा. लक्ष्मी निवास, प्लॉट नं. २३०, कर्नाटक संघ हॉलच्या मागे, रामनगर, नागपूर यांचा अर्ज दिनांक २६/०८/२०२५

**-: जाहिरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार शशिकांत डोंगरमल शर्मा, रा. लक्ष्मी निवास, प्लॉट नं. २३०, कर्नाटक संघ हॉलच्या मागे, रामनगर, नागपूर यांनी त्यांच्या आजीच्या मृत्युची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.
सदरहू धनीबाई नथमल शर्मा यांच्या मृत्यु दिनांक २५/०२/२००३ रोजी त्यांच्या राहते घरी रामनगर, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.
त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**Chandrakant Sarode**
Advocate
B.A., LL.B.
Office : Civil Line, Avadut Wadi, Saoner, Dist. Nagpur.
Mob. : 9764498686
e-mail : adv.sarodechandrakant@gmail.com

**-: जाहिर सूचना :-**

आम जनतेस सूचित करण्यात येते की, माझे पक्षकाराने १) श्री. देवराव दामोधर ढवळे, २) श्री. मुरलीधर दामोधर ढवळे, ३) श्री. अशोक दामोधर ढवळे, ४) श्री. राजु दामोधर ढवळे, ५) श्रीमती पुष्पा प्रभाकर धोटे व ६) श्री मती शोभा मधुकर कोराटे यांचे मालकी कब्जा व त्यांचे नावाने शासकीय रेकॉर्डवर दर्ज असलेली खालील वर्णनाची शेती/स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे.
शेती/स्थावर मालमत्तेचे वर्णन : खास मौजा - सावनेर, प.ह.नं. ३४, बं.नं. २१६, तह. सावनेर, जि. नागपूर, खसरा नं. ५५९/१/अ, आराजी १.६३ हे.आर. जमा रु. १०.७०, भो-वर्ग-१ हिस्सा पूर्ण.
सदरहू शेती/स्थावर मालमत्तेबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क संबंध, अधिकार असल्यास किंवा दुसऱ्या कोणालाही विक्रीपत्र अथवा करारनामा केला असल्यास अथवा याबाबत आक्षेप किंवा उजर असल्यास तसेच गहाण, बक्षिस, विक्री किंवा शासकीय, निमशासकीय गहाण कर्ज असल्यास त्यांनी सदर जाहीर सूचना प्रकाशित झाल्यापासून सात दिवसाचे आत खालील पत्त्यावर मूळ कागदपत्रासह स्वतः संपर्क साधावा अथवा पुराव्यासह लेखी आक्षेप घ्यावे. अन्यथा कोणासही उजर नसल्याचे समजण्यात येईल व माझे पक्षकार सदरहू शेती/मालमत्तेचे विक्रीपत्र करुन घेतील व त्याउपरांत उपरोक्त नमूद मालमत्तेबाबत कोणत्याही प्रकारचा उजर भविष्यात ऐकला जाणार नाही याची आम जनतेने काळजीपूर्वक नोंद घ्यावी.
स्थळ : सावनेर
दि. ०७/१०/२०२५

ॲड. चंद्रकांत सरोदे
सिव्हील लाईन, अवधूतवाडी, वार्ड नं.२, सावनेर.
मो. ९७६४४९८६८६



**कोर्ट विद्यमान श्री. रमेश कोळपे तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय**
प्र.क्र. /एम.आर.सी.-/८१/२०२५
मौजा रामटेक ता. रामटेक
जिल्हा नागपूर

**-: जाहिरनामा :-**

ज्याअर्थी सौ. मंजुळा अनिल खेकडे रा. अलंकार टॉकिज मागे पेठ वार्ड, ब्रम्हपुरी, चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर मो. नं. ७२६२९२३७२७ यांनी आजोबा नामे स्व. श्री. शंकर रामचंद्र डोंगरे यांचा मृत्यु दिनांक ०१/०७/१९८२ रोजी मौजा नेहरु वार्ड रामटेक, ता. रामटेक, जि. नागपूर येथे झाला असून मृत्युची नोंद नगर परिषद रामटेक येथे केली नाही. त्याबाबत नगर परिषद रामटेक यांनी दिनांक १९/०५/२०२५ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे स्व. श्री. शंकर रामचंद्र डोंगरे यांचा मृत्यु दिनांक ०१/०७/१९८२ बाबत नगर परिषद रामटेक येथे नोंद घेणेबाबत आदेश पत्र मिळणेकरिता अर्ज सादर केले आहे.
त्याअर्थी या जाहीरनाम्याद्वारे असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद स्व. श्री. शंकर रामचंद्र डोंगरे यांच्या मृत्यु दिनांक ०१.०७.१९८२ बाबत नगर परिषद रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २८/१०/२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजित तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांना नोंद घ्यावी.
सदर जाहीरनामा आज दिनांक ०६/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध करण्यात येत आहे.


स्थळ : रामटेक
दिनांक : ०६/१०/२०२५

(रमेश कोळपे)
तहसिलदार, रामटेक


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन०७१२२७३२५८५१/९१२२९७०२२३/७४४७७३५८५३

# रात्रीच्या चांदण्यात ताजमहल पाहण्याचे सुख काही और!

दिवसा ताजमहालच्या पांढऱ्या संगमरवराचे सौंदर्य सर्वांनाच दिसते; पण रात्रीच्या चांदण्यात ताजमहल पाहण्याचे सुख काही औरच आहे. रात्री त्याचे स्वरूपच बदलते, असे वाटते. लख्ख चांदण्यांचा संगमरवरावर पडणारा प्रकाश आणि त्याच्या समोर असलेल्या यमुनेच्या पाण्यात दिसणारी चांदण्याची लखलख एखाद्या स्वप्नातील जगापेक्षा कमी वाटत नाही. रात्रीचे सर्वात सुंदर दृश्य म्हणजे ताजमहालच्या भिंतींवर पडणारा चांदण्याचा प्रकाश. त्या प्रकाशात त्याचे सौंदर्य काही वेगळेच दिसते. हे दृश्य ते एखाद्या परीकथेसारखे भासते. रात्रीच्या शांततेत यमुना नदीच्या पाण्यात ताजमहालचे प्रतिबिंब एका आरशासारखे दिसते. जणू ती पौर्णिमेच्या चंद्राचीच छबी असावी. ताऱ्यांमध्ये चमकणारा ताजमहाल पाहून डोळ्यांना विश्वास बसत नाही. ते दृश्य खरोखरच डोळ्यांना सुखावणारे असते. ताजमहाल रात्रीच्या विशेष प्रकाशात चमकतो, तेव्हा त्याचे कोरीव



काम आणि संगमरवरी तपशील आणखी स्पष्ट दिसतात. रात्रीच्या प्रकाशात चमकणाऱ्या भिंती त्याचे सौंदर्य अजून वाढवतात. रात्रीच्या वेळी तुम्ही ताजमहाल त्याच्या बागेतून पाहता, तेव्हा आजूबाजूला असलेली शांतता आणि मध्यभागी उभे असलेले ते स्मारक मनाला शांततेची भावना देते. ती शांतता कोणत्याही मेडीटेशनपेक्षा कमी असत नाही. या अंधारात फक्त ताजमहलच नाही, तर त्याच्या आजूबाजूला उभे असलेले मिनारदेखील ताजमहालचे सौंदर्य वाढवतात. ताजमहालची सोनेरी आभा तर पाहण्यासारखी असते. चंद्रप्रकाश आणि त्यातील प्रकाशाच्या संयोगामुळे कधी कधी ताजमहालवर सोनेरी आभा दिसते, जी त्याला एक सोनेरी असे जादुई रूप देते. या अंधारात फक्त ताजमहलच नाही, तर त्याच्या आजूबाजूला उभे असलेले मिनारदेखील ताजमहालचे सौंदर्य वाढवतात. चंद्रप्रकाश आणि त्यातील प्रकाशाच्या संयोगामुळे, कधी कधी ताजमहालावर सोनेरी आभा दिसते. ती त्याला एक सोनेरी असे जादुई रूप देते. रात्रीच्या शांततेत ताजमहाल पाहण्यासाठी येणाऱ्या जोडप्यांसाठी हे ठिकाण म्हणजे खरोखरच प्रेमाचे प्रतिक काय असावे, याची जाणीव करून देईल. सूर्य पूर्णपणे मावळतो, तेव्हा ताजमहाल हळूहळू त्या आकाशातील ताऱ्यांमध्ये एकरूप झाल्यासारखा वाटतो. हे दृश्य पाहणारे एकूण अनुभव कधीही विसरु शकणार नाहीत.

# कॅलिडोस्कोप




# आत्म्याची खरेदी ३३ कोटींना!

पैशाने तुम्ही काहीही खरेदी करु शकता; परंतु एखाद्याचा आत्मा आणि मन खरेदी करू शकत नाही, ही म्हण आता खोटी ठरणार आहे. कारण एका व्यक्तीने तब्बल चार दशलक्ष डॉलर (सुमारे ३३ कोटी रुपये) मोजून तरुणीचा आत्मा खरेदी केला. हे ऐकायला थोडे विचित्र वाटेल. या बातमीने स्थानिक प्रसारमाध्यमांपासून 'सोशल मीडिया'पर्यंत हंगामा माजवला. आता या आत्म्याचे नेमके करायचे काय, असा त्याला प्रश्न पडला आहे. एका महिलेने कथितपणे आपला 'आत्मा' विकून सुमारे ३३ कोटी रुपये मिळवले आहेत. या रकमेतून तिने बाहुल्यांचे कलेक्शन आणि कॉन्सर्ट तिकीट खरेदी केले. रशियाच्या सोशल नेटवर्कींग प्लॅटफॉर्मवर एक व्यक्ती दिमित्री यांनी मजेने एक पोस्ट केली होती. त्यात त्यांनी लिहिले होते, की त्यांना आत्मा विकत घ्यायचा आहे. सुरुवातीला लोकांनी ही मस्करी मानली; परंतु लवकरच ही गोष्ट खरी असल्याचे सिद्ध झाले. करिना नावाच्या या तरुणीने ही ऑफर स्वीकारली. हैराण करणारी बाब म्हणजे यथावकाश या दोघांमध्ये रक्ताने लिहिलेला करार झाला. काही दिवसांनी दिमित्री यांनी यासंदर्भातील रक्ताने लिहिलेला करार 'सोशल मीडिया'वर पोस्ट केला. कॅप्शनमध्ये लिहिले की मी आता पहिला आत्मा खरेदी केला आहे. हा करार रक्ताने साईन केला आहे. करिनाने स्थानिया मीडियाला सांगितले, की आत्मा विकल्याचा आपल्याला काहीही पश्चाताप नाही किंवा लोकांच्या टीकेची पर्वा नाही. करिनाने सांगितले, की रक्कम थेट तिच्या बँक अकाऊंटला गेली आणि त्यानंतर करिनाने बाहुल्यांचे कलेक्शन खरेदी केले. तसेच प्रसिद्ध गायिका नादेज़्दा काडिशेवा यांच्या कॉन्सर्टचे तिकीट खरेदी केले. दुसरीकडे दिमित्री यांचे म्हणणे आहे, की त्यांनी मजेत ही ऑफर दिली होती. मला आशा नव्हती. एखादी महिला खरेच ही ऑफर स्वीकारेल. आता मला स्वत:ला कळत नाही की खरेदी केलेल्या आत्म्याचे काय करायचे! ही घटना एखाद्या हॉरर चित्रपटाच्या पटकथेसारखी वाटते. 'सोशल मीडिया'वर अनेक लोकांनी यास सैतानी प्रवृत्तीशी जोडून टीका केली आहे.




# अबब! केवढं हे कासव

कोट्यवधी वर्षांपूर्वी पृथ्वीवर डायनासोर नामक महाभयंकर आणि महाकाय प्राण्यांचं अस्तित्व होतं. मात्र हे प्राणी या पृथ्वीतलावरून नामशेष झाले. या डायनासोरचे जीवाश्मही सापडले आहेत. या जीवाश्मांवर शास्त्रज्ञ संशोधन करत असतात. तो काळ उलगडण्याचा प्रयत्न सध्या केला जातो. दक्षिण अमेरिकेतल्या कोलंबियामधल्या ताताकोआ वाळवंटात असंच एक भलं मोठं जीवाश्म सापडलं. या जीवाश्माचा आकार एखाद्या गाडीएवढा आहे. हे एका कासवाचं जीवाश्म आहे. एवढ्या मोठ्या आकाराचं जीवाश्म बघून शास्त्रज्ञांनाही आश्चर्याचा धक्का बसला. या प्रचंड मोठ्या कासवाची लांबी १३ फूट आणि वजन २.५ टन असावं, असा अंदाज व्यक्त केला गेला. अशी कासवं साधारण १.३ कोटी वर्षांपूर्वी दक्षिण अमेरिकेत आढळत असत. या जीवाश्माला 'स्टुपेंडेमी जिग्राफिकस' असं नाव देण्यात आलं आहे. कासवाला शिंगं असल्याचं आपण कधी ऐकलेलं नाही. पण नर स्टुपेंडेमी कासवाच्या कवचाच्या दोन्ही बाजूंना समोरच्या बाजूला शिंगं होती. म्हणजेच ही कासवं किती महाकाय आणि भयंकर असतील याचा अंदाज बांधलेलाच बरा. ही कासवं या शिंगांचा वापर स्वत:च्या सुरक्षेसाठी करत असावीत, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. अर्थात याआधीही स्टुपेंडेमी कासवाचं जीवाश्म सापडलं होतं. १९७० मध्येही असंच एक जीवाश्म सापडलं होतं. पण त्यावेळी या प्रजातीबद्दल फारशी माहिती मिळाली नव्हती. सीगोईंग आर्किलोन हे पृथ्वीतलावरचं सर्वात मोठं कासव होतं. त्यानंतर आकाराच्या बाबतीत स्टुपेंडेमीचा क्रमांक लागतो. सीगोईंग आर्किलोन डायनासोर युगाच्या अंताच्या वेळी म्हणजेच जवळपास सात कोटी वर्षांपूर्वी या पृथ्वीवर अस्तित्वात होते, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. एवढी मोठी कासवं पाहिल्यानंतर कोणाच्याही मनात धडकी भरेल.





# दानशूर भिकारी

श्रीमंत लोक मंदिरात दानधर्म करतात. मोठाल्या देणग्या देतात. काही भक्त सोन्या-चांदीचे दागिने अर्पण करतात. शिर्डीच्या साईबाबा मंदिरालाही बरंच दान मिळतं. आंध्र प्रदेशमधल्या विजयवाडा इथल्या साईबाबा मंदिरालाही मोठं दान मिळालं आहे. विशेष म्हणजे हे दान एका भिकाऱ्याने दिलं आहे. ७३ वर्षांच्या या भिकाऱ्याने सात वर्षांच्या काळात तब्बल आठ लाख रुपये दान म्हणून दिले! दानधर्म केल्यामुळे आपल्याला अधिक भीक मिळाल्याचं या भिकाऱ्याचं म्हणणं आहे. यादी रेड्डी असं या भिकाऱ्याचं नाव. यादी याच मंदिराबाहेर भीक मागत असत. मंदिर प्रशासनानेही यादी यांचं कौतुक केलं आहे. रेड्डी यांनी जवळपास ४० वर्षं रिक्षा चालवली. मात्र काही काळानंतर त्यांना गुडघेदुखी सतावू लागली. यामुळे त्यांनी रिक्षा चालवणं सोडलं. मग त्यांनी उदरनिर्वाहासाठी भीक मागायला सुरुवात केली. यादी यांनी पहिल्यावेळी मंदिराला एक लाख रुपये दान दिलं. मंदिरात दान दिल्यानंतर आपल्या उत्पन्नात वाढ झाल्याचं यादी यांचं म्हणणं आहे. या दानधर्मामुळे आपल्याला नवी ओळख मिळाल्याचंही ते सांगतात. त्यांनी दिलेल्या पैशांमधून मंदिराच्या डागडुजीची कामं करण्यात आली आहेत. तसंच यादी यांच्या मदतीने गोशाळाही बांधण्यात येणार आहे. यादी यांचं हे कार्य कौतुकास्पद आहे, पण भीक मागून माणूस एवढे पैसे कमाऊ शकतो याचेही आश्चर्य वाटत आहे.

# अमिबा खरोखरच मेंदू खातो का?

मेंदू खाणारा अमिबा खरोखरच मानवी मेंदू खातो का? मेंदू खाणारा अमिबा एक प्राणघातक आजार निर्माण करतो. एकदा संसर्ग झाला, की जगणे अत्यंत कठीण होते. तथापि, हा आजार संसर्गजन्य नाही, म्हणजेच तो एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरत नाही. मानवी शरीरात ३० ट्रिलियनपेक्षा जास्त पेशी असतात, तर अमिबा हा फक्त एक पेशी असलेला जीव आहे. या एकाच पेशीचा वापर करून अमिबा त्याचे अन्न शोधते, ते खातो, पचवतो आणि नंतर त्याचा कचरा बाहेर टाकते. पाण्याच्या साठ्यात आढळणाऱ्या अमिबाच्या एका प्रजातीने मानवांमध्ये आरोग्याची चिंता निर्माण केली आहे. खरे तर, या वर्षी भारतातील केरळ राज्यात 'मेंदू खाणारा अमिबा' या व्याधीची ६५ हून अधिक प्रकरणे नोंदवली गेली आहेत. त्यामुळे १८ लोकांचा मृत्यू झाला आहे. या अमिबाला वैज्ञानिकदृष्ट्या 'नेग्लेरिया फाउलेरी' म्हणून ओळखले जाते. 'यूएस सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शन' (सीडीसी) च्या वेबसाइटनुसार, मेंदू खाणारा अमिबा गोड्या पाण्यातील तलाव, जलाशय, नद्या, गरम पाण्याचे झरे आणि मातीमध्ये वाढतो. योग्यरित्या देखभाल न केलेले स्विमिंग पूलदेखील या अमिबाच्या प्रजननाचा धोका निर्माण करतात. हा अमिबा असलेल्या पाण्यात आंघोळ करणे अत्यंत धोकादायक आहे. खरे तर आंघोळ करताना हा अमिबा नाकातून शरीरात प्रवेश करू शकतो आणि नंतर



मेंदूपर्यंत पोहोचू शकतो. गेल्या वर्षी मे ते जुलै या कालावधीत केरळमध्ये या व्याधीचे चार रुग्ण आढळले आणि चारही प्रकरणांमध्ये बाधित मुलांचा मृत्यू झाला. या वर्षी नोंदवलेल्या ६७ प्रकरणांपैकी १८ लोकांचा मृत्यू झाला आहे. 'सीडीसी'च्या मते १९६२ ते २०२४ दरम्यान अमेरिकेत या आजाराचे १६७ रुग्ण आढळले. आणि त्यापैकी फक्त चारजणच वाचले. या अमिबाबद्दलचा एक अभ्यास गेल्या वर्षी 'यूएस नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'च्या वेबसाइटवर प्रकाशित झाला होता. त्यानुसार, अंटार्क्टिका वगळता जगातील प्रत्येक देशात या अमिबाची उपस्थिती नोंदवली गेली आहे. १९६५ ते २०१८ दरम्यान जगभरात फक्त ३८० प्रकरणे नोंदवली गेली. हे खूपच दुर्मिळ आहे; परंतु धोकादायकदेखील आहे. या अभ्यासानुसार, हा अमिबा त्याचे प्रजनन चक्र सुरू असताना मानवांमध्ये प्रवेश करतो. मेंदूत प्रवेश केल्यानंतर, हा अमिबा केवळ मेंदूच्या ऊतींचा नाश करत नाही, तर शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीवरही हल्ला करतो. मेंदूतील संसर्गामुळे शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीकडून तीव्र प्रतिक्रिया निर्माण होते. या प्रतिसादामुळे अमिबा मरत नाही; परंतु त्यामुळे मेंदूला तीव्र सूज येते. सुरुवातीच्या लक्षणांमध्ये उलट्या, ताप, डोकेदुखी आणि सुस्ती यांचा समावेश होतो. रोग वाढत जातो, तसतसा गोंधळ वाढणे, मान ताठ होणे, प्रकाशाची भीती आणि झटके येणे यासारखी लक्षणे दिसून येतात. 'सीडीसी'च्या मते, बहुतेक लोक लक्षणे दिसू लागल्यानंतर एक ते १८ दिवसांच्या आत मरतात. बळी सामान्यतः प्रथम कोमात जातो आणि नंतर मरतो.



# सात्विक नाईट क्लब

नाईट क्लब म्हटला की दिवसभर ढणढणाट सुरू असतो. ठेक्यावरची हिंदी, इंग्रजी, पंजाबी गाणी वाजत असतात. या ठेक्यावर तरुणाई बेभान होऊन नाचत असते. नाईट क्लबमध्ये पाश्चात्य संस्कृती नांदते. इथे पाश्चिमात्य नृत्य आणि पाश्चिमात्य संगीताचा जोर असतो. पण एखाद्या नाईट क्लबमध्ये संस्कृती गीतं वाजू लागली तर... संस्कृतमध्ये मंत्र असतात, भजनं असतात. नाईट क्लबमध्ये संस्कृत गाणी कशी वाजू शकतील, असा प्रश्न तुमच्या मनात येणं अगदी स्वाभाविक आहे. मात्र असा एक नाईट क्लब आहे. या नाईट क्लबमध्ये लोक संस्कृत गाण्यांवर थिरकतात. महत्त्वाची बाब म्हणजे हा नाईट क्लब भारतात नाही तर भारतापासून दूर असणाऱ्या एका देशात आहे. अर्जेंटिनातला हा नाईट क्लब म्हणूनच अनोखा ठरतो. अर्जेंटिनाची राजधानी ब्युनस-आयर्समध्ये 'ग्रोव' नावाचा एक नाईट क्लब आहे. इथे गणेश शरणम, गोविंदा गोविंदा, जय जय राधा रमण हरी बोल, जय कृष्ण हरे अशी गाणी वाजतात. या नाईट क्लबमध्ये एकाच वेळी ८०० लोक थिरकतात. या नाईट क्लबमध्ये मद्य मिळत नाही. तसंच इथे येणारे लोक धूम्रपानही करत नाहीत. इथे मांसाहाराला मनाई आहे. अमली पदार्थांचं तर नावही काढता येत नाही. म्हणजेच अत्यंत सात्विक आणि धार्मिक असा हा नाईट क्लब आहे. इथे सॉफ्ट ड्रिंक्स, फळांचे रस आणि शुद्ध शाकाहारी भोजन मिळतं. अर्जेंटिनासारख्या दक्षिण अमेरिकेतल्या देशात असा नाईट क्लब असणं ही अनोखी बाब म्हटली पाहिजे. या नाईट क्लबला एकदा तरी भेट द्यायला हवी.

# नळातून बाहेर पडलं मद्य!

घरातला पाण्याचा नळ उघडल्यानंतर त्यातून पाण्याऐवजी मद्य बाहेर पडू लागलं तर... आपल्याला आश्चर्याचा धक्काच बसेल. हा कोणाचा तरी खोडसाळपणा आहे असं वाटून जाईल. केरळमध्ये असाच विचित्र प्रकार घडला. या राज्यातल्या त्रिसूरमधल्या चलाकुडी तालुक्यातल्या सोलोमन ॲव्हेन्यू अपार्टमेंटमधले लोक नळातून मद्य येऊ लागल्याचं बघून आश्चर्यचकित झाले. सकाळी नळ उघडल्यानंतर त्यातून भुरकट रंगाचं पाणी येऊ लागलं. पाण्याला विचित्र गंधही होता. यामुळे इथले रहिवासी गोंधळून गेले. हे मद्य असल्याचं लक्षात आल्यानंतर सर्वांना धक्काच बसला. कोणी तरी खोडसाळपणा करून टाकीत मद्य मिसळल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. मात्र असा कोणताही प्रकार घडला नसल्याचं कळल्यानंतर रहिवाश्यांनी नगर परिषदेकडे तक्रार केली. मग प्रशासन कामाला लागलं. बराच शोध घेतल्यानंतर महसूल विभागाच्या चुकीमुळे हा गोंधळ झाल्याचं लक्षात आलं. महसूल विभागाने जवळपास सहा हजार लीटर मद्य जप्त केलं आणि ते एका खड्ड्यात टाकून दिलं. हे मद्य जवळच्या विहिरीत मिसळलं. याच विहिरीतून या वसाहतीतल्या लोकांना पाणीपुरवठा होतो. यानंतर सगळा उलगडा झाला. यानंतर या विहिरीच्या साफसफाईचं काम सुरू करण्यात आलं. महसूल विभागाच्या चुकीमुळे या इमारतीतल्या लोकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला.



# विमानात ३५ हजार फुटावर वायफाय

'एअर इंडिया'ने अलीकडेच घोषणा केली आहे, की ते आपल्या काही विमानांमध्ये उड्डाणादरम्यान प्रवाशांना वाय-फाय सुविधा प्रदान करतील. ही सुविधा देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही उड्डाणांमध्ये उपलब्ध असेल. तथापि, ही पहिलीच वेळ नाही, जेव्हा एखादी विमान कंपनी ३५ हजार फूट उंचीवर प्रवाशांना वाय-फाय सुविधा प्रदान करेल. जगभरातील अनेक विमान कंपन्या आधीच ही सुविधा देत आहेत. विमानात बसवलेला अँटेना जमिनीवरील जवळच्या टॉवरवरून सिग्नल पकडतो. विमान जमिनीवर टॉवर नसलेल्या क्षेत्रातून जाईपर्यंत हे सिग्नल राहतात. या तंत्रज्ञानात जमिनीवर बसवलेले टॉवर सिग्नल वरच्या दिशेने प्रक्षेपित करतात. यामध्ये ऑन-बोर्ड अँटेना विमानाच्या खाली बसवलेला असतो. 'सॅटेलाइट सिस्टीम' या तंत्रज्ञानात, वाय-फाय सिग्नल उपग्रहाद्वारे येतात. या तंत्रज्ञानात उपग्रहाद्वारे ग्राउंड स्टेशनवरून विमानांमध्ये इंटरनेट पाठवले जाते. यामध्ये विमानाच्या वरच्या बाजूला ऑन-बोर्ड अँटेना बसवला जातो. आज विमानांमध्ये वाय-फायसाठी या तंत्रज्ञानाचा वापर जास्त केला जात आहे. एलन मस्क यांची स्टारलिंक ही कंपनी या तंत्रज्ञानावर इंटरनेट पुरवते. जमिन किंवा उपग्रह प्रणालींमधून विमानात बसवलेल्या अँटेनामधून इंटरनेट सिग्नल ऑन-बोर्ड राउटरवर प्रसारित केले जातात. या राउटरद्वारे, विमानात बसलेले प्रवासी त्यांच्या फोन, लॅपटॉप इत्यादींशी वाय-फाय कनेक्ट करू शकतात.




विमान उड्डाणानंतर एका विशिष्ट उंचीवर (सुमारे दहा हजार फूट) पोहोचते, तेव्हाच वाय-फाय सुविधा वापरता येते. उड्डाणात वाय-फायद्वारे इंटरनेटचा वेग जमिनीवर उपलब्ध असलेल्या वेगापेक्षा खूपच कमी असतो. विमानांमध्ये मोबाईल डेटा वापरण्यास मनाई असते. इतकेच नाही तर टेक-ऑफनंतर तुम्ही कोणालाही कॉल देखील करू शकत नाही. खरे तर, विमान आकाशात उडत असताना मोबाईल डेटा अनेक समस्या निर्माण करतो. संशोधनातून असे दिसून आले आहे, की यामुळे विमानाच्या नेव्हिगेशन सिस्टीम, रडार इत्यादींमध्ये समस्या निर्माण होऊ शकतात. त्याच वेळी, पायलटच्या हेडसेटमध्ये समस्या असू शकते आणि तो योग्यरित्या संवाद साधू शकत नाही. यामुळे अपघाताची भीती निर्माण होते.

### दुय्यम निबंधक कार्यालयात अनियमितता
# अधिकाऱ्यांची झाडाझडती
## महसूल मंत्री बावनकुळेंनी उघड केला भ्रष्टाचार



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :
शेतजमीनी आणि घरांच्या मोठ्या प्रमाणावर नोंदणी (रजिस्ट्री) दुय्यम निबंधक कार्यालयात केल्या जातात. या कार्यालयांमध्ये पैसे घेतल्याशिवाय कामच होत नाही असा अनुभव कायम सामान्य जनतेला येतो.

यावर महसूल मंत्री आणि भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी थेट नागपूरच्य दुय्यम निबंधक कार्यालयात अचानक धाड टाकत झाडाझडती केली. यावेळी रजिस्ट्री नोंदणीमध्ये अनेक अनियमितता आढळली असून एका ड्रॉवरला कुलूप लावण्यात आले. हे ड्रावर उघडले असता त्यात पैशेही आढळून आले. थेट महसूल मंत्र्यांनीच निबंधक कार्यालयात धाड टाकल्याने संपूर्ण प्रशासनावर धाक निर्माण झाला आहे.

राज्यभरात महसूल विभागात शेतकरी आणि सर्वसामान्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो अशी नेहमीच ओरड असते. अगदी ग्रामपंचायत, तलाठी ते तहसीलदार अशा अधिका?यांकडून असा त्रास दिला जातो.

शेतकरी आणि नागरिकांकडून कधी पैशांची मागणी केली जाते, तर कधी किरकोळ कामासाठीही अनेक हेलपाटे लावले जातात. त्यातच, खरेदी-विक्री कार्यालयातही नागरिकांकडून अतिरिक्त पैशांची मागणी केल्या जात असल्याच्या अनेकदा तक्रारी येतात.

काही दिवसांपूर्वी नागपूर जिल्ह्यातील सावनेर येथील दुय्यम निबंधकाच्या अनेक तक्रारी आल्यानंतर राज्याचे महसूलमंत्री बावनकुळे यांनी कार्यालयास अचानक भेट दिली आणि अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली होती. यापुढे तक्रारी आल्यास, काही गैरव्यवहार झाल्याचे आढळल्यास कारवाई करण्याचा इशारा बावनकुळे यांनी दिला होता.

बावनकुळेंच्या अचानक भेटीमुळे सावनेर प्रशासनाची मात्र धावपळ झाल्याचे दिसून आले होते. नागपूरच्या दुय्यम निबंधक कार्यालयात बावनकुळे यांची अचानक भेट दिली. मंत्री कार्यालयात पोहचल्याने प्रशासनात खळबळ उडाली. बावनकुळे यानी यावेळी लोकांच्या तक्रारींबाबत असलेल्या फाईल्सची तपासणी केली. कामात गैरप्रकार आढळल्यास कारवाई करणार असल्याचा इशारा महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिला.

# नागपूरसह विदर्भातही काही बालकांच्या मृत्यूच्या संशयित घटना
## साठा सापडल्यास तत्काळ कळवण्याचे आवाहन : महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :
मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील चिमुकल्यांच्या मृत्यूमुळे देशभरात एकच खळबळ उडाली आहे. 'कोल्ड्रिफ' या खोकल्याच्या औषधामुळे विषबाधा होऊन एकुण 17 लहान मुलांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या घटनांनंतर महाराष्ट्र सरकारने तात्काळ हालचाल करत, राज्यातील नागरिक आणि मेडिकल दुकानदारांना सावध राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने तातडीने एक टोल फ्री क्रमांक सुरू केला असून, या औषधाचा कोणताही साठा सापडल्यास तत्काळ कळवण्याचे आवाहन केले आहे. तसेच 'कोल्ड्रिफ' सिरपची विक्री, वितरण आणि वापर पूर्णपणे थांबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या औषधात अत्यंत धोकादायक असा डायथिलीन ग्लायकोल हा रासायनिक घटक आढळून आल्याचे प्रयोगशाळेच्या तपासणीत स्पष्ट झाले आहे. तामिळनाडूच्या कांचीपुरम येथील युनिटमध्ये बनवलेल्या या सिरपमध्ये 48.6 टक्के डायथिलीन ग्लायकोल असल्याचे निष्पन्न झाले.






हा घटक सामान्यतः औषधनिर्मितीत 0.1 टक्क्यांपेक्षा जास्त प्रमाणात असू नये. पण कोल्ड्रिफ सिरपमध्ये त्याचे प्रमाण जीवघेणे ठरले आहे. तज्ज्ञांच्या मते, हा रसायन शरीरात गेल्यावर मूत्रपिंड, यकृत आणि मज्जासंस्था निकामी करते. त्यामुळेच या सिरपचे सेवन केलेल्या बालकांचा मृत्यू मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यात 14 चिमुकल्यांचा आणि राजस्थानात 3 मुलांचा या सिरपच्या सेवनानंतर मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर मध्य प्रदेश सरकारने 'कोल्ड्रिफ कफ सिरप' वर तत्काळ बंदी घातली असून, सिरप तयार करणाऱ्या कंपनीच्या विरोधात गंभीर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कारवाईसह एका डॉक्टरलाही अटक करण्यात आली आहे.

तपास यंत्रणांनी सांगितले की, मृत मुलांपैकी बहुतेकांना हे सिरप ताप आणि खोकल्यासाठी दिले गेले होते. पण काही तासांतच त्यांना उलट्या, मूत्र विसर्जन बंद होणे, आणि कोमासारखी लक्षणे दिसू लागली. हे दृश्य पालकांसाठी भयावह ठरले. या घटनेनंतर देशभरातील पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनांची दखल केंद्र सरकारने गंभीरतेने घेतली असून, सर्व राज्यांना तत्काळ सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्र, केरळ आणि तामिळनाडू सरकारने आपापल्या हद्दीत औषध दुकाने, घाऊक विक्रेते आणि रुग्णालयांवर छापेमारी सुरू केली आहे. महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासन विभागाने औषध जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. नागपूर, नाशिक, मुंबई आणि औरंगाबादमध्ये या औषधाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. राज्य सरकारने नागरिकांना आवाहन केले आहे की, जर त्यांच्या घरी कोल्ड्रिफ सिरप असेल, तर ते औषध तात्काळ वापरात आणू नये.

# तीव्र विद्युत तारेच्या स्पर्शाने मायलेकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ६ :
वादळी वाऱ्यासह जिल्ह्यात सर्वदूर मुसळधार पावसाला सुरुवात झाली असताना एक विद्युत तार वादळी तुटून गायीच्या गोठ्यावर पडली. यात गोठ्यातील वासराचा अंत झाला.

या वासराला काय झाले हे पाहण्यासाठी जवळच उभी असलेली एक महिला तेथे गेली. नकळत या विद्युत तारेला स्पर्श झाल्याने तिचाही जागीच मृत्यू झाला. आईला काय झाले म्हणून जवळच उभा असलेला लेक धावला मात्र त्याचाही स्पर्श विद्युत तारेला झाला आणि करूण अंत झाला. मायलेकाच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

साकोली तालुक्यातील मालूटोला येथील महानंदा प्रभुदास इलमकर व सुशील प्रभुदास ईलमकर या मायलेकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

गाय आणि तिच्या वासराचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. त्यापाठोपाठ मायलेकाचाही विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# महासंघाची भूमिका संतापजनक!



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :
राज्यात ओबीसी आरक्षणावरून सुरू असलेल्या संघर्षात काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी थेट राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे आणि भाजपचे आमदार परिणय फुके यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

तायवाडे आणि फुके माझ्यासारखेच ओबीसी समाजातील आहेत. त्यांच्याशी वैयक्तिक वाद नाही, मात्र त्यांनी शासनाच्या जीआरला पाठिंबा देत समाजाच्या पाठीत खंजीर खुपसला, असा घणाघात वडेट्टीवार यांनी केला.

राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार हैदराबाद गॅझेटच्या आधारे मराठा समाजाला ह्यकुणबीह्ण प्रमाणपत्र देत त्यांना ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. याच निर्णयाला डॉ. तायवाडे आणि फुके यांनी समर्थन दिले आहे. वडेट्टीवारांच्या मते, हा निर्णय मूळ ओबीसी समाजाच्या हक्कांवर गदा आणणारा आहे.

महासंघासारखी ओबीसींच्या हितासाठी लढणारी संघटना सरकारच्या बाजूने उभी राहते, तेव्हा ती जनतेचा विश्वासघात करते, अशी तीव्र भावना त्यांनी व्यक्त केली. परिणय फुके हे आमदार आहेत, त्यामुळे ते चर्चेत सहभागी होणं साहजिक मान्य आहे, पण संघटनेच्या भूमिकेमुळे ओबीसींच्या हक्कांचा सौदा झाल्याचा आरोप त्यांनी लावला.

महासंघ सरकारच्या दावणीला बांधले गेले आहे. त्यांनी समाजाच्या हिताचा विचार न करता राजकीय दबावाला बळी दिला आहे. यामुळे मूळ ओबीसी समाजाच्या न्यायावर गदा आली आहे, असा आरोपही त्यांनी केला. या पार्श्वभूमीवर, १० ऑक्टोबर रोजी ओबीसी समाजाच्या हक्कासाठी मोर्चा काढण्याचा निर्णय अजून ठाम असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

: हॅलो डॉक्टर :

# दमा : कारण, लक्षणं आणि उपचार

लोकारोग्य



श्वासोच्छवासाशी संबंधित जे काही आजार आहेत त्यापैकी अनेकांना त्रासदायक असा जुनाट आजार म्हणजे दमा. दमा हा फुफ्फुसाच्या सर्वात सामान्य आजारांपैकी एक आहे. लहान मुलांपासून ते प्रौढ आणि वृद्धा पर्यंत प्रत्येकाला दम्याचा विकार उद्भवू शकतो. काही लोकांना अनेक गोष्टींची ॲलर्जी असल्यामुळे किंवा काही रुग्णामध्ये अनुवांशिक पद्धतीने दम्याचा आजार उदभवतो. दमा असलेल्या रुग्णाच्या श्वसननलिका अरुंद आणि सुजलेल्या असतात त्यामुळे त्यांना श्वास घेण्यास त्रास होतो ज्याला दमा म्हणतात. दमेकरी लोकांना बाहेरील ढगाळ वातावरणापासून देखील खूप जपावे लागते. अस्थमा किंवा दमा हा आजार नेमका काय आहे? त्याची कारण काय असतात? दम्याची नेमकी लक्षण कशी ओळखायची?आणि दम्यावर उपचार काय आहेत? याच प्रश्नाची उत्तर मिळविण्यासाठी डॉ. समीर भावे यांच्याशी केलेली बातचीत.

**दमा हा आजार म्हणजे नेमका काय आजार आहे?**

■ सर्वसाधारणपणे जेंव्हा आपण श्वास घेतो तेंव्हा हवा नाकपुड्यातून वायुमार्गात आणि नंतर फुफ्फुसात जाते. आपले फ्फुफुस हे असंख्य वायुमार्गाचे एक जटिल नेटवर्क आहे. जे रक्तप्रवाहात ऑक्सिजन हस्तांतरित करण्यात मदत करते. दमा किंवा श्वसननलिका संबंधी दमा म्हणजे जेंव्हा वायुमार्गाच्या अस्त्रांना सूज येते आणि त्यांना वेढलेले स्नायू घट्ट होतात, ज्यामुळे वायुमार्गाच्या बाजूने श्लेष्मा तयार होतो श्लेष्मामुळे हवेचे प्रमाण कमी होते. म्हणून दमेकरी लोकांना घरघर येते. खोकताना शिट्टीचा आवाज येतो. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन च्या मते दमा हा एक मोठा असंसर्गजन्य आजार आहे. जो आबालवृद्धांच्या फ्फुफुसावर परिणाम करतो.

**दम्याचे प्रकार नेमके किती आणि कोणते आहेत?**

■ दम्याची तीव्रता आणि सुरवातीच्या लक्षणावर दम्याचे विविध प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते. काही प्रकारचा दमा हा अधून मधून येतो जो अस्थमा अटॅक असतो आणि पुन्हा व्यक्ती नॉर्मल होते. काही प्रकारा मध्ये सातत्याने व्यक्तीला दम्याची लक्षण दिसतात. काही प्रकारचा दमा हा सौम्य असतो. तर काही प्रकारच्या दम्याची तीव्रता अधिक असते. कारणाच्या आधारावर ॲलर्जिक, ॲलर्जी नसलेला, व्यायाम प्रेरित,व्यावसायिक,अस्थमा असे दम्याचे प्रकार असतात.

**दम्याची कारण काय असतात? आणि लक्षण काय दिसतात?**

■ एखाद्या कुटुंबात आई वडिलांना किंवा इतरांना दमा असेल तर अनुवांशिक पद्धतीने दमा संक्रमित होतो. अनेकदा काही विषाणूजन्य संसगार्मुळे देखील फुफ्फुसात संसर्ग होऊन दमा उद्भवतो. शरीराची प्रतिकारशक्ती कमी असेल तरी दमा होऊ शकतो. हवेची ॲलर्जी म्हणजे हवेतील धूलिकण,थंड हवेचा संपर्क, प्रदूषित हवा काही औषध आणि काही पदार्थ यामुळे दमा उदभवू शकतो. दम्याच्या लक्षणांमध्ये सातत्याने खोकला, श्वाशोस्वास करण्यास त्रास होणे, बोलताना त्रास होणे, दम लागणे, झोपल्यानंतर तोंडातून घरघर आवाज येणे, व्हायरल इन्फेक्शन अशी लक्षण दिसतात.

**दम्यावर उपचार कोणते आहेत?**

■ दम्याच्या आजाराचे स्पायरोमेट्री, पीक फ्लो मिटर,मेथा कोलिन चाचणी, इमेजिंग चाचण्या द्वारे निदान करता येते. दम्याचा झटका आल्यास ब्रॉकोडायलेटर्स हे एक महत्वपूर्ण औषध दिले जाते. हे औषध वायुमार्गाला आराम देते. दमेकरी रुग्णाला सामान्यतः तोंडी, इंजेक्शनद्वारे, इन्हेलरद्वारे किंवा नेब्युलायझरद्वारे औषध दिली जातात. काही प्रकारचा दमा हा तीव्र असतो अशा रुग्णाची ब्रॉनिकल थर्मोप्लास्टी केली जाते. बदाम, हिरव्या पालेभाज्या, केळी, दूध, रताळे, गाजर असे पदार्थ खाल्याने देखील दम्याचा विकार नियंत्रणात येतो.

■ ■ ■

# फॉरेन्सिक अहवालाकडे दुर्लक्ष?



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :
नागपूर : माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांनी राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आज पत्रकार परिषदेत थेट आरोप करत एक गंभीर विधान केले आहे.

त्यांनी सांगितले की, विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यांच्या वाहनावर झालेल्या हल्ल्याच्या प्रकरणात नागपूर ग्रामीण पोलिसांनी तज्ज्ञांच्या फॉरेन्सिक अहवालाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आणि राजकीय दबावाखाली बी समरी अहवाल न्यायालयात सादर केला. हा दबाव खुद्द मुख्यमंत्री आणि गृहमंत्री असलेल्या फडणवीस यांच्याकडून आल्याचा आरोप देशमुख यांनी केला.

देशमुख यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या वाहनावर दगडफेक झाल्याचा प्रकार खोटा ठरवण्यासाठी पोलिसांनी संगनमताने तपास मोडीत काढला. फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या अहवालात दोन व्यक्तींनी वेगवेगळ्या दिशेने दगड मारल्याचे नमूद असून, त्यामुळे गाडीच्या काचा फुटल्या आणि त्यांना डोक्याला जखम झाली. हे स्पष्ट असूनही पोलिसांनी हा अहवाल बाजूला ठेवून एका खाजगी कंपनीच्या व्यवस्थापकाचे मत घेऊन ह्यघटना घडलीच नाही, असा अहवाल तयार केला.

फॉरेन्सिक अहवालानुसार हल्ला झाल्याचे स्पष्ट दिसते. पण, पोलिसांनी त्याकडे दुर्लक्ष करत खोटा अहवाल न्यायालयात सादर केला. पोलिसांना फॉरेन्सिक अहवालावर स्वतःहून वैज्ञानिक मत मांडण्याचा अधिकार नाही. मात्र, त्यांनी तसे करत बी समरीमध्ये चुकीची माहिती दिली, असे देशमुख म्हणाले.

ते पुढे म्हणाले, पोलीस अधीक्षकांनी तपास पूर्ण होण्याआधीच पत्रकार परिषद घेऊन, विरोधकांच्या आरोपांप्रमाणेच हल्ला खोटा असल्याचे भासवले. हे सर्व मुख्यमंत्री फडणवीस यांच्या राजकीय दबावाखाली घडल्याचे स्पष्ट आहे. फॉरेन्सिक लॅबचा अहवाल मिळाल्यानंतरही पुन्हा गुन्हा दृश्याचे पुनर्निर्माण करण्यासाठी फॉरेन्सिक लॅबवर दबाव टाकण्यात आला.

देशमुख यांनी याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी करत म्हटले की, फॉरेन्सिक अहवाल बदलण्यासाठी दबाव आणणाऱ्यांवर आणि खोटा अहवाल सादर करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. हे प्रकरण केवळ पोलीस तपासातील गोंधळ नाही, तर त्यामागे सत्ताधारींचा राजकीय हस्तक्षेप असल्याचे गंभीर निदर्शक आहे. या प्रकरणामुळे पोलीस यंत्रणेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, राजकीय दबाव टाकल्याचा आरोप लावण्यात आला आहे.

# तीन विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. ६ :
जिल्ह्याच्या देवरी तालुक्यातील पुराडा गावात शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील 3 विद्यार्थ्यांचा तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. हे विद्यार्थी सकाळी घरून शाळेसाठी बाहेर पडले होते. ते सायंकाळी उशिरापर्यंत घरी परतले नाही. आता त्यांचे थेट मृतदेहच हाती लागल्यामुळे याविषयी शंका व्यक्त केली जात आहे.

हे गाव स्थानिक आमदार संजय पुराम यांचे मूळगाव आहे. इथे आदिवासी मुलांसाठी शासकीय आश्रमशाळा आहे. मृत विद्यार्थी या शाळेत दररोज अपडाऊन करत होते. ते परवा सकाळी शाळेत गेले. पण त्यानंतर घरी परतलेच नाही. त्यामुळे त्यांच्या नातेवाईकांसह गावकऱ्यांनी त्यांचा शोध घेतला. पण ते सापडले नाही. अखेर त्यांचे मृतदेह गावालगतच्याच एका तलावात तरंगताना आढळले.

आदित्य बैस (गडेवार टोला), अभिषेक आचले (पुराडा) व तुषार राऊत (गडेवार टोला) अशी मृत विद्यार्थ्यांची नावे आहेत. यापैकी एकजण इयत्ता दहावीचा विद्यार्थी होता. तर दोन जण इयत्ता बारावीचे विद्यार्थी होते. या तिघांच्याही अंगावर संपूर्ण कपडे होते. त्यामुळे त्यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला? याविषयी वेगवेगळ्या अटकळी व्यक्त केल्या जात आहे. पण मृत्यूचे खरे कारण शवविच्छेदन अहवालातूनच स्पष्ट होणार आहे. या घटनेमुळे गावावर शोककळा पसरली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे रील बनवण्याच्या नादात एका बारावीच्या विद्यार्थ्याचा खदानीत बुडून मृत्यू झाल्याची घटना गत जुलै महिन्यातील जिल्ह्यातील कोंढा कोसारा परिसरात घडली होती. तीर्थराज धनपाल बरसागडे असे या विद्यार्थ्याचे नाव होते. तो रील बनवण्यासाठी आपल्या दोन मित्रांसोबत सीनेगावलगतच्या कोंढा कोसारा परिसरातील एका खदानीवर गेला होता. तिथे त्याने झाडावरून पाण्यात उडी मारली. त्यानंतर काही वेळातच त्याचा बुडून मृत्यू झाला. यावेळी त्याचा एक मित्र हे दृश्य मोबाईलच्या कॅमेऱ्यात कैद करत होता. त्यामुळे हा संपूर्ण घटनाक्रम कॅमेऱ्यात कैद झाला होता.



# नारायणा हेल्थ हॉस्पिटलतर्फे शिक्षकांसाठी बेसिक लाइफ सपोर्ट आणि प्रथोमपचार प्रशिक्षणाचे आयोजन

जागतिक प्रथमोपचार दिनानिमित्त मुंबईतील नारायणा हेल?थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलने फिनलँड इंटरनॅशनल स?कूलसोबत सहयोगाने शालेय शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी सर्वसमावेशक बेसिक लाइफ सपोर्ट (बीएलएस) आणि प्रथमोपचार प्रशिक्षण सत्राचे आयोजन केले.

या उपक्रमाचा शिक्षक व शालेय कर्मचाऱ्यांना सुसज्ज करण्याचा उद्देश होता, ज्यामुळे ते शाळेच्या आवारात विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांमध्ये होऊ शकणाऱ्या कोणत्याही वैद्यकीय किंवा जीवनास धोकादायक आपत्कालीन स्थिती हाताळण्यास सक्षम असतील.

जवळपास ४० कर्मचारी कार्यशाळेत उपस्थित होते. या सत्रामध्ये दैनंदिन घटनांपासून महत्त्वपूर्ण आपत्तीजनक स्थितींपर्यंत विविध वैद्यकीय स्थितींबाबत माहिती देण्यात आली. सहभागींना किरकोळ जखमा जसे कट, ओरखडे, भाजणे, कीटकांचा दंश, मोच आणि नाकातून रक्त येणे, तसेच गुदमरणे, ॲलर्जीक प्रतिक्रिया (ॲनाफिलेक्सिस), फ्रॅक्चर, बेशुद्धहोणे, स्ट्रोक आणि हृदयविकाराचा झटका यांसारख्या प्रमुख वैद्यकीय परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

पुढील नुकसान टाळण्यासाठी सीपीआर कसे द्यावे, बेशुद्ध व्यक्तीला कशाप्रकारे शुद्धीवर आणावे, मलमपट्टी योग्यरित्या कशी बांधावी आणि फ्रॅक्चर कसे स्थिर करावे याबद्दल प्रात्यक्षिके देखील दाखवण्यात आली. मानसिक आरोग्याचे महत्त्व ओळखून प्रशिक्षणात मानसिक त्रासाची सुरुवातीची लक्षणे ओळखणे, विद्यार्थ्यांमधील शारीरिक व भावनिक दोन्ही आपत्कालीन परिस्थितींना प्रतिसाद देण्यासाठी शिक्षकांना सुसज्ज करणे यावर देखील चर्चा करण्यात आली.

या उपक्रमामधून सामुदायिक जागरुकता, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि आपत्कालीन स्थितींमध्ये सुसज्जतेला चालना देण्याप्रती नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलची कटिबद्धता दिसून येते.

शालेय कर्मचाऱ्यांना या आवश्यक कौशल्यांसह सुसज्ज करत हॉस्पिटल आणि फिनलँड इंटरनॅशनल स्कूल यांनी मुलांसाठी व समुदायासाठी सुरक्षित वातावरणाची खात्री घेण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ■ ■ ■

## बहुगुणी गाजर

थंडीमध्ये बाजारात अगदी सहज उपलब्ध होणारं कंदमुळ म्हणजे गाजर. बीटा कॅरोटीनचं प्रमाण गाजरामध्ये अधिक असतं. अनेक पोषक तत्वांसह अ जीवनसत्त्वानं परिपूर्ण असलेलं गाजर थंडीच्या दिवसांमध्ये तरी नक्की खावं.

गाजराची कोशिंबीर, कच्च गाजर, गाजराचा हलवा, गाजराच्या वड्या असे अनेक प्रकार तयार केले जातात. परंतु नुसतं गाजर रोज खाल्ल्यानं आपली रोग प्रतिकारक शक्ती वाढते आणि वेगवेगळ्या धोकादायक आजारांपासून आपल्याला दूर राहण्याची क्षमता वाढता. रोज एक गाजर खाल्ल्यानं तुम्हाला हृदयविकाराचा धोका, कर्करोग, डोळ्यांचे विकार या आजारांपासून तुम्ही दूर राहू शकता. काय आहेत गाजराचे फायदे? जाणून घ्या.

गाजरानं पचनशक्ती सुधारते. गाजरात बिटा कॅरोटिन असतं. ते कॅन्सरला प्रतिबंधक ठरतं. गाजर कच्चं खावं. त्यानं जास्त फायदा होतो. गाजरामुळे वजन वाढत नाही त्यामुळे तुम्ही रोज एक गाजर बिनधास्त खाऊ शकता. गाजरापेक्षा गाजराच्या पानांमध्ये लोह असतं. त्यानं ॲनिमिया दूर होतो. थंडीत गाजराचं सेवन केल्यानं शरीरात उब राहते. गाजराचा रस आणि मध एकत्र करून प्यायल्यानं रोगप्रतिकारक शक्ती वाढते. गाजरांच्या पानांची भाजी तयार केली जाते. ती बनल्यावर उरलेलं पाणी पाऊन घ्या. त्यात पोषकद्रव्य असतात.

पालक आणि गाजराचा रस एकत्र करून प्यायल्यास तब्येत सुधारते. गाजरात अ जीवनसत्व असतं. रोज एक गाजर खाल्ल्यानं चष्म्याचा नंबर कमी व्हायला मदत होते. तसंच डोळ्यांचं आरोग्य सुधारण्यास मदत होते. गाजरात कॅल्शियम, फायबर, व्हिटॅमिन सी, ए असतं. त्यानं हृदयरोगावरही मात करता येते. ■ ■



संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# बुलढाण्यात आदिवासींचा मोर्चाद्वारे आक्रोश!



■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ६ :
राज्यात आरक्षणावरून रान पेटले असून विविध समाजांतर्फे आरक्षणविषयक मागण्यांसाठी आंदोलने करण्यात येत आहे. जिल्ह्याच्या तेराही तालुक्यांत आरक्षणाच्या मागण्यांवरून मोर्चे, धरणे, आदी आंदोलने सुरू आहे. मागील एक महिन्यापासून या आंदोलनाचा धडाका सुरूच आहे.

बुलढाणा शहरात आज, सोमवार ६ ऑक्टोबरला सकल आदिवासी समाजातर्फे आदिवासी आरक्षण बचाव आक्रोश मोर्चा काढण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयावर आज काढण्यात आलेला हा मोर्चा सर्वसामान्य स्थितीतील आदिवासी समाजाचे शक्तिप्रदर्शन ठरला.

भगवान एकलव्य यांच्या प्रतिमा असलेले वेगवेगळ्या रंगाचे ध्वज, हाती तीरकमान घेऊन अस्सल आदिवासीची वेशभूषा साकारलेले युवक, हाती असलेले फलक, महिलांची लक्षणीय उपस्थिती, ढोल-ताशांच्या गजरावर थिरकणारे युवक, मोर्चाने फुलून गेलेले रस्ते, पोलिसांचा बंदोबस्त, असा या मोर्चाचा थाट होता.

बंजारा आणि धनगर समाजाने केलेल्या अनुसूचित जमातीतील आरक्षण मागणीच्या विरोधात आदिवासी हक्क व आरक्षण बचाव कृती समितीच्यावतीने बुलढाण्यात आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

शहरातील जयस्तंभ चौकातील वीर एकलव्य पुतळ्यापासून हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर हजारो आदिवासी बांधवांसह धडकला. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांना मागण्याचे निवेदन देण्यात आले.

आदिवासी आरक्षण बचाव आक्रोश मोर्चाच्या नेत्या नंदिनी टारपे, एकलव्य संघटनेचे प्रदेश सचिव मधुकर पवार, आदिवासी पारधी संघटनेचे विदर्भ सचिव गजानन सोळंके, एकलव्य भिल्ल समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मोरे यांच्या मार्गदर्शनात काढण्यात आलेल्या या मोर्चात हजारो आदिवासींची उपस्थिती होती. मोर्चादरम्यान आदिवासी बांधवांनी एक तीर एक कमान, आदिवासी एक समान, अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता.

टांगलेले खेकडे, मांसे यासह विविध मागण्यांचे फलक व पारंपरिक पोषखात आदिवासी बांधव मोर्चात सहभागी झाले. धनगर आणि बंजारा समाजाने अनुसूचित जमातीत केलेल्या आरक्षणाची मागणीमुळे आदिवासी समाजावर अन्याय होण्याची भीती आहे. यामुळे अनुसूचित जमातीत या समाजांचा समावेश होवू नये, आदिवासी विकास निधी इतरत्र वळवू नये, यासह इतर मागण्यासंदर्भात हा मोर्चा काढण्यात आला.

जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्या माध्यमाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अन्य नेत्यांना विविध मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले. आदिवासी विकास परिषदेच्या नंदिनी टारपे, आदिवासी पारधी संघटनेचे विदर्भ सचिव गजानन सोळंके, एकलव्य संघटनेचे प्रदेश सचिव मधुकर पवार, एकलव्य भिल्ल समाजाचे जिल्हा अध्यक्ष विजय मोरे, आदींनी मोर्चाचे नेतृत्व केले.

महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ मंगळवार, दि. ७, ऑक्टोबर २०२५ ■

# विद्यार्थिनीला त्रास देणाऱ्यास अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

एक टवाळखोर तरुण अनेक दिवसांपासून अल्पवयीन विद्यार्थिनीला त्रास देत होता. मात्र कुठलाही प्रतिसाद मिळत नसल्यामुळे शनिवारी त्याने चिडून मुलीच्या घरावर दगडफेक केली. तिच्याशी गैरवर्तनही केले. शेवटी त्रस्त होऊन पीडितेने पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी १७ वर्षीय पीडितेच्या तक्रारीवरून विविध कलमान्वये गुन्हा नोंदवत आरोपी तरुणाला अटक केली. बादल तिलदुधारी चंद्रा (२२) असे अटकेतील तरुणाचे नाव आहे.

पीडित बालिका बाराव्या वर्गात शिकते. गत काही दिवसांपासून कॉलेजला ये-जा करताना बादल तिचा पाठलाग करीत होता. त्याच्याशी मैत्री करण्यासाठी तिच्यावर दबाव टाकत होता. रस्त्यात अडवून जबरीने बोलण्याचा प्रयत्न करीत होता. मात्र पीडिता त्याला प्रतिसाद देत नव्हती. उलट तिने याबाबत भावाला माहिती दिली होती.

यामुळे बादल चिडलेला होता. शनिवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास पीडिता घरी एकटी होती. या दरम्यान बादल तिच्या घरापुढे आला. त्याने शिविगाळ करीत दारावर दगडफेक सुरू केली. पीडिता गेट उघडून बाहेर आली असता तिच्या गैरवर्तन करीत अश्लील भाषेत टिपणी केली.

तिचा हात पकडून विनयभंग केला. पीडितेने कुटुंबीयांना घटनेची माहिती दिली. घटनेची पोलिसात तक्रार करण्यात आली. पोलिसांनी विनयभंग व पोक्सोच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून आरोपी बादल याला अटक केली.

## हिट ॲन्ड रनमध्ये तरुणाचा मृत्यू
# भरधाव जीपने उडविले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

शहरात हिट ॲन्ड रनच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. वाहन चालकांच्या (विशेषतः चारचाकी वाहनांचे चालक)बेदरकारपणामुळे अनेकांना जीव गमवावा लागत आहे. अजनीच्या वंजारीनगर परिसरात रविवारी रात्री भरधाव थार जीपच्या चालकाने एका दुचाकीस्वार तरुणाला उडविले आणि पळून गेला. बराच वेळपर्यंत तो तरुण जखमी अवस्थेत घटनास्थळी पडून होता. सूचना मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि त्याला रुग्णालयात भरती केले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्य झाला. या घटनेचा त्याच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे. प्रसाद अशोक काळे (३४) रा. वंजारीनगर असे मृताचे नाव आहे.

प्रसाद एलआयसीच्या म्यूच्युअल फंड विभागात काम करीत होता. १० महिन्यांपूर्वीच त्याचे लग्न झाले होते. रविवारी रात्री प्रसादने आई-वडिलांसोबत बसून एकत्र जेवण केले. त्यानंतर काही कामाने तो त्याच्या एमएच-४९/सीई-८१८५ क्रमांकाच्या दुचाकीने मेडिकल चौकात गेला. काम आटोपून रात्री १० वाजताच्या सुमारास तो घरी जात होता. महाजन गल्लीत पाण्याच्या टाकीकडे जाताना समोरून भरधाव आलेल्या जीपच्या चालकाने प्रसादच्या वाहनाला जबर धडक दिली आणि पळून गेला. रात्रीची वेळ असल्याने रस्त्यावर अधिक वर्दळ नव्हती. बराच वेळपर्यंत तो रस्त्यावर जखमी अवस्थेत पडून होता. दरम्यान कोणीतरी त्याल जखमी अवस्थेत पाहून पोलिसांना सूचना दिली.

### ५ मिनिटांपूर्वीच बोलला होता आईशी

प्रसाद काही कामाने मेडिकल चौकात गेला होता. रात्र अधिक झाल्याने आईने त्याला कॉल केला. प्रसादने ५ मिनिटात मेडिकल चौकातून परत घरी येत असल्याचे सांगितले, मात्र बराच वेळ होऊनही तो परतला नाही. त्यामुळे कुटुंबीयांना चिंता झाली. आईने पुन्हा त्याला कॉल केला, मात्र प्रतिसात मिळत नव्हता. आई-वडिलांच्या हृदयाची धडधड वाढली. काही वेळाने प्रसाद ऐवजी अजनी पोलिस घरी पोहोचले. प्रसादचा अपघात झाल्याची माहिती दिली. या घटनेचा प्रसादच्या वडिलांना मोठा धक्का बसला आहे. प्रसाद त्यांचा एकुलताएक मुलगा होता. त्याच्या लग्नाला अजून एक वर्षही पूर्ण झाला नव्हता. काळे कुटुंबासह संपूर्ण परिसरात प्रसादच्या मृत्यूने शोक पसरला आहे.

अजनी पोलिस घटनास्थळी पोहोचले. प्रसादला उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात दाखल केले. डोक्याला गंभीर मार लागला होता. ट्रॉमा सेंटरमध्ये उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये ही घटना कैद झाली आहे. मात्र फुटेजमध्ये आरोपीच्या वाहनाचा नंबर स्पष्ट दिसत नसल्याने त्याचा अद्याप सुगावा लागला नाही. पोलिसांनी आतापर्यंत ५० ठिकाणचे फुटेज तपासले आहेत. या फुटेजमध्ये, जीप चालक भरधाव आणि निष्काळजीपणे वाहन चालवत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

# राज्यातील अनाथ व दिव्यांग व्यक्तींच्या मनात
## आत्मविश्वास निर्माण करणारा दिवस : पद्मश्री शंकरबाबा पापळकर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

दिवसभराची कार्यव्यस्तता सांभाळत राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची आजची जिल्हाधिकारी कार्यालयातील भेट सर्व कर्मचाऱ्यांच्या उत्साहाला बळ देणारी ठरली. निमित्त होते अनाथ असलेल्या मालाने आपल्या अंधत्वावरही यशस्वी मात करुन निवड परीक्षेच्या माध्यमातून शासकीय सेवेला घातलेली गवसणी! तिचे हे यश सर्वांसाठी प्रेरणादायी ठरावे या सदिच्छेतून राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील गोपनीय शाखेत माला पापळकरच्या जागेवर जाऊन तिला शुभेच्छा दिल्या. तुज्यामधे असलेल्या सुप्त गुणांना ओळखून कामाची जबाबदारी देवूअसे त्यांनी सांगून तिच्या मनोबलाला उंचावले.

नागपूर, दि. 06 : आजचा दिवस सर्व अनाथ, दिव्यांग व्यक्तीचा मनात आत्मविश्वास निर्माण करणारा असून आमची माला नागपूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात रुजू होतांना पाहून मन भरुन आल्याचा भावना पद्मश्री सन्मानित शंकरबाबा पापळकर यांनी व्यक्त केल्या.



### जी जबाबदारी दिली जाईल ती यशस्वीपणे पूर्ण करेन : माला पापळकर

शासकीय सेवेतील कर्तव्यनिष्ठेची जबाबदारी मी समजून घेतली आहे. कोणत्याही परिस्थितीत मी प्रामाणिक प्रयत्न करेल, अशी भावना माला पापळकर हिने व्यक्त केली. पहिली ते सातवी पर्यंतचे माझे प्राथमिक शिक्षण व नंतर परतवाडा येथील पदवीपर्यंतचे शिक्षण मला शासकीय संस्थेसह बाबांच्या मदतीने घेता आले. ब्रेल लिपीतून उच्च तंत्रज्ञानाचा अविष्कार ठरलेल्या ऑनलाईन क्लासेसला मला मोबाईलच्या माध्यमातून जुळता आले. यातूनच मी स्पर्धा परीक्षेचा सराव करायला शिकले. ब्रेल लिपीतून व्हाईस सर्च पर्यंतचा हा प्रवास माझ्या आत्मविश्वासाला बळ देणारा ठरल्याचे तिने सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील अनुकंपा व सरळसेवा भरती प्रक्रियेला गती देऊन अत्यंत पारदर्शीपणे संपूर्ण राज्यात ही मोहीम यशस्वी राबविल्याबद्दल त्यांनी शासन व जिल्हा प्रशासनाप्रती गौरोद्गार काढले. जिल्हाधिकारी डॉ. बिपीन इटनकर यांनी या प्रेरणेचे स्त्रोत ठरणाऱ्या घटनेला स्वतः तिला सोबत घेऊन नियुक्ती देण्यात आलेल्या गृह शाखेत जाऊन तिच्या खुर्चीवर बसविले. अनेक आव्हानांवर मात करुन परीक्षेच्या माध्यमातून गुणवत्तेवर उभी राहिलेली माला ही खऱ्या अर्थाने युवकांची प्रेरणा व्हावी, अशा भावना व्यक्त करुन त्यांनी मालाला शुभेच्छा दिल्या. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, पापळकर यांच्या संस्थेला वेळोवेळी सहकार्य करणारे ज्येष्ठ संपादक श्रीमंत माने, प्राप्ती माने, रोटरी क्लबचे पदाधिकारी व विविध सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते. विशेष म्हणजे तिचे पालकत्व स्विकारलेले शंकरबाबा पापळकर हे स्वतः तिला शासकीय सेवेत रुजू होतांना साक्षीदार होण्यासाठी आले होते. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यभर ही मोहीम अत्यंत कमी कालावधीत यशस्वीपणे राबविली. दिनांक 4 ऑक्टोबर रोजी झालेल्या राज्यव्यापी सोहळ्यात संपूर्ण राज्यातून 10 हजार 309 उमेदवारांना शासन सेवेतील नियुक्तीचे आदेश देण्यात आले. यात नागपूर जिल्ह्यातील एकूण 941 युवा-युवतींना अनुकंपा व सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती देण्यात आली. यातील अनाथ असलेल्या माला पापळकर हिने आपल्या अंधत्वावर मात करुन जिद्दीने निवड परीक्षेत यश साध्य केले.

# विषारी वायू गळतीच्या घटनेविरोधात आम आदमी पक्षातर्फे धरणे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :



24 सप्टेंबर 2025 रोजी प्रभाग क्र. ६ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान चौक परिसरात केमिकल फॅक्टरीमधून विषारी वायूची गळती होऊन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या घटनेनंतर आम आदमी पार्टी, नागपूर शहर तर्फे दिनांक 25 सप्टेंबर 2025 रोजी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर आणि दिनांक 26 सप्टेंबर 2025 रोजी आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना संबंधित केमिकल फॅक्टरीविरुद्ध 7 दिवसांच्या आत कारवाई करून फॅक्टरी बंद करण्याचे निवेदन देण्यात आले होते. तथापि, या दोन्ही शासकीय कार्यालयांकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. प्रशासनाच्या या निष्क्रियतेचा निषेध म्हणून, प्रशांत मेश्राम, अध्यक्ष झ अनुसूचित जाती शहर, आणि नीलम अमेय नारनवरे शहर महिला उपाध्यक्ष यांच्या नेतृत्वात आम आदमी पार्टी, नागपूर शहर तर्फे घटनास्थळी फॅक्टरी विरोधात जोरदार घोषणाबाजी करत धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाद्वारे पक्षाने प्रशासनाला पुन्हा एकदा इशारा दिला आहे की, जर पुढील काही दिवसांत फॅक्टरीविरुद्ध ठोस कारवाई करण्यात आली नाही, तर आम आदमी पार्टी नागपूर शहर स्तरावर मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन छेडेल.

या आंदोलनाचे मार्गदर्शन श्री. अमेय नारनवरे महासचिव शहर, रोशन डोंगरे संघटनमंत्री, प्रदीप पौनीकर संघटनमंत्री, नामदेव कामडी शहर उपाध्यक्ष, व किसन निमजे, हेमराज कुंभारे, जव्वाद अहमद, शैलेश गजभिये, जगदीश रोकडे, सुभाष खांडेकर,क्षितिज वंजारी, संघमित्र मेश्राम, रुनाली गेडाम, सुरज रामटेकर,धम्मा जांभुळकर, स्थानिक नागरिक, बशीर शेख, चितेश्वर खापेकर, कल्पना वाळवे, संगीता गजवे, नलिनी दाते, अर्चना दाते, प्रविण लोखंडे, रोहित गोरले, चितेश्वर रामचंद्र खापेकर, गायत्री खापेकर, रविशीला गजानन खापेकर, योगेश्वर रामचंद्र खापेकर, विजय धार्मिक, अमोल देशभ्रतार आदी उपस्थित होते.

# दिपावली निमित्त शिवकालीन किल्ले स्पर्धाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ६ :

छत्रपती शिवाजी महाराज आणि गडकिल्ले हे महाराष्ट्राचे निर्विवाद शक्तीपीठ होय. गडकिल्ल्यांची महती आणि इतिहास. आपल्या येणाऱ्या पिढीमध्ये रुजावा आणि शिवकालीन गडकिल्ल्यांविषयी आस्मिता निर्माण व्हावी, तसेच त्यांच्यामध्ये इतिहासाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने आमदार सांस्कृतिक महोत्सव समिती - मध्य नागपूरचे आमदार प्रवीण दटके यांच्या संकल्पनेतून आणि दुर्गजागृती किल्ले स्पर्धा आयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी पासून दिपावली निमित्ताने शिवकालीन किल्ले स्पर्धा - २०२५ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी स्पर्धकांनी आपली नावे दि.१७ ऑक्टोबर पर्यंत आमदार प्रवीण प्रतिभा प्रभाकर दटके यांच्या ऑफिसमध्ये किंवा खाली दिलेल्या क्रमांकावर रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे.

स्पर्धेत विजयी होणाऱ्या स्पर्धकांचे मनोबल वाढवण्याकरिता प्रत्येक गटात प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ व विशेष सादरीकरण सह भव्य बक्षिसे स्पर्धकांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते दिली जाणार आहे. प्रामुख्याने तिनं गट ठेवले आहे ते यानुसार आहे. हौशी/ छंदिष्ट खुला गट यामध्ये कुठलेही वयोमर्यादा नाही आहे व या गटात प्रथम क्रमांक साठी २१ हजार, द्वितीय क्रमांक साठी १७ हजार, तृतीय क्रमांक साठी १५ हजार बक्षीस व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.

प्राथमिक शाळा गट- यामध्ये स्पर्धक १ - ५ वर्गात पर्यंतचे शिक्षण घेणारे असावेत व या गटात, प्रथम क्रमांक साठी १५ हजार, द्वितीय क्रमांक साठी १३ हजार, तृतीय क्रमांक साठी ११ हजार बक्षीस व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे .माध्यमिक शाळा गट यामध्ये स्पर्धक ६ - पदवी पर्यंतचे शिक्षण घेणारे असावेत व या गटात प्रथम क्रमांक साठी १५ हजार, द्वितीय क्रमांक साठी १३ हजार, तृतीय क्रमांक साठी ११ हजार बक्षीस व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. दुर्गजागृती किल्ले स्पर्धा आयोजन समिती निरजा पाटील, अविनाश अडकुलवार, विशाल देवकर, रोहित लाडसांगवीकर,वेदांत नाथे, वैभव गणोरकर, अभिषेक कळमकर, अभिषेक सावरकर, पुष्कर दहशास्त्र आहे. जास्तीत जास्त स्पर्धकांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आव्हान पत्रकार परिषदेतून करण्यात आले.

# चार दिवसीय नॉर्थ-ईस्ट फेस्टिवल ऑक्टेव्ह

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :




भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या मार्गदर्शनात पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर आणि दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नॉर्थ-ईस्ट फेस्टिवल "ऑक्टेव्ह" चे भव्य आयोजन 9 ते 12 ऑक्टोबर 2025 दरम्यान नागपूरमध्ये केले जाणार आहे.

दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूरच्या प्रांगणात होणा-या या सांस्कृतिक महोत्सवात पूर्वोत्तर भारतातील 223 कलाकार त्यांच्या अद्वितीय सांस्कृतिक सादरीकरणाद्वारे पूर्वोत्तरच्या समृद्ध परंपरा आणि कलांचा अनुभव प्रेक्षकांना देतील. पूर्वोत्तर भारतातील आठ राज्ये जसे, आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्किम आणि त्रिपुरा यांची पारंपरिक संस्कृती जतन करणे, संवर्धन करणे आणि प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने या फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन 9 ऑक्टोबर रोजी संध्या. 6 वाजता गणमान्य अतिथींच्या उपस्थितीत होईल. त्यानंतर पारंपरिक पोशाख शो व लोकनृत्यांचे सादरीकरण होणार आहे. 10 ते 12 ऑक्टोबर दरम्यान दररोज संध्याकाळी 6 ते 8 वाजेदरम्यान सांस्कृतिक संध्येचे आयोजन करण्यात येणार असून त्यात बिहू, बारदोई सिकला, होजागिरी, संग्राई मोग, सिंगी छाम, नागा वार नृत्य, काशाद मस्ती, वांगला नृत्य, चेराव नृत्य, पुंग ढोल चोलम, थांगता व चेरोल जोगोई, जूजू जाजा, मणीपुरी रास, सत्रिया नृत्य यांचा समावेश आहे.

पूर्वोत्तर राज्यांतील आकर्षक आणि उपयोगी हस्तशिल्प प्रदर्शित केले जातील. त्यात, बांबूचे फर्निचर, बास्केट, सजावटी वस्तू, घरगुती साहित्य, लाकूड आणि दगडाचे शिल्प, पारंपरिक कपडे व टेक्सटाईल्स, मातीचे शिल्प, जनजातीय पारंपरिक दागिने इत्यादींचा समावेश राहील. हा मेळा दररोज दुपारी 2 ते रात्री 9 वाजेपर्यंत खुला राहील. पत्रकार परिषदेत दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या संचालक आस्था कार्लेकर, पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर चे भूपेंद्र सिंग कोठारी, सी.एल.साळवी, हेमंत मेहता यांची उपस्थिती होती.

## प्रतिबंधित ई-सिगारेट विक्रेत्यास अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

गणेशपेठ पोलिसांनी गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारावर एका व्यक्तीला प्रतिबंधित ई-सिगारेटची विक्री करताना अटक केली. वसीम शेख मुस्तफा शेख (३७) रा. मोमिनपुरा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

गणेशपेठ ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय मेंढे, पोउपनि मल्हारी डोईफोडे आणि विजय नाचन पथकासह दुपारी १ वाजताच्या सुमारास परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, एम्प्रेस मिल रोडवर वंदे मातरम उद्यानाजवळील फुटपाथवर एक व्यक्ती ई-सिगारेटची विक्री करीत आहे. या माहितीच्या आधारावर पोलिस परिसरात पोहोचले असता वसीम संशयास्पदरित्या फिरताना दिसला. त्याच्याजवळ एक पिशवी होती. संशयाच्या आधारावर त्याला ताब्यात घेत पिशवीची झडती घेतली असता सरकारने प्रतिबंधित केलेल्या ई-सिगारेट आढळल्या. पोलिसांनी वेगवेगळ्या प्रकारच्या ७९ ई-सिगारेट जप्त केल्या.

# महावितरणच्या गो-ग्रीन योजनेला वाढती पसंती

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ६ :

वीजबिलांच्या छापील कागदांचा वापर बंद करण्यासाठी महावितरणने सुरू केलेल्या 'गो-ग्रीन' योजनेला वीजग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या तीन महिन्यांमध्ये तब्बल 2 लाख 3 हजार 340 वीजग्राहकांनी या योजनेत सहभाग घेतला आहे.

वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडून सोमवार (दि. 6) पर्यंत लघुदाब वर्गवारीतील पर्यावरणस्नेही 7 लाख 6 हजार 924 ग्राहक या योजनेत सहभागी झाले आहे व त्यांना 8 कोटी 48 लाख 30 हजार 880 रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

गो-ग्रीन योजनेतील वीजग्राहकांचा वाढता प्रतिसाद सहभाग स्वागतार्ह आहे. त्यांना वीजबिल डिजिटल स्वरुपात पाठवले जात आहे. पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी वीजग्राहकांनी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी केले आहे.

गेल्या तीन महिन्यांत 2 लाखांवर ग्राहकांचा सहभाग :वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. विशेष म्हणजे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या तीन महिन्यांमध्ये 2 लाख 3 हजार 340 ग्राहकांची या योजनेत भर पडली आहे. यात सर्वाधिक पुणे प्रादेशिक विभागातील 87 हजार 40 ग्राहकांचा तर कोकण प्रादेशिक विभागातील 78 हजार829 ग्राहकांचा समावेश आहे.




### गेल्या ३ महिन्यांत २ लाखांवर ग्राहकांचा सहभाग

या योजनेत आतापर्यंत 7 लाख 6 हजार 924 पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना 8 कोटी 48 लाख 30 हजार 880 रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. यामध्ये (कंसात आर्थिक फायदा रूपयांत) पुणे प्रादेशिक विभागात सर्वाधिक 2 लाख 88 हजार 238 (3.46 कोटी), कोकण- 2 लाख 62 हजार 237 (3.15 कोटी), नागपूर प्रादेशिक विभाग- 84हजार 531 (1.01 कोटी) आणि छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागामध्ये योजनेत सहभागी 71 हजार 918 वीजग्राहकांना 86 लाख 30 हजार रूपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

असे व्हा योजनेत सहभागीः गो-ग्रीन योजनेसाठी महावितरणच्या । या वेबसाइटवर किंवा मोबाईल ॲपवर नोंदणी करण्याची स्वतंत्र सोय उपलब्ध आहे. केवळ ग्राहक क्रमांक सबमीट करावे लागेल व छापील बिलाची प्रत रद्द करून संबंधितांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांक व इमेलवर दरमहा बिल पाठविण्यात येईल. नोंदणीकृत मोबाईल किंवा इमेल बदलण्याची सोय देखील त्याच ठिकाणी उपलब्ध आहे.

वार्षिक 120 रूपयांचा फायदाः महावितरणकडून गो-ग्रीनचा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात 10 रुपये सवलत देण्यात येत आहे. यात ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक 120 रुपयांचा फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील 12 महिन्यांची म्हणजे 120 रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे.

गो-ग्रीन योजनेचे फायदेः गो-ग्रीन सहभागी झालेल्या ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईल 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही ऑनलाईन बिल भरणे सोयीचे झाले आहे. इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणक किंवा मोबाइलमध्ये जतन करून ठेवता येते. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

# पुरवठा विभागात १९ उमेदवारांना नियुक्ती आदेश प्रदान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

अनुकंपा तत्वावरील व सरळ सेवेवर निवड झालेल्या उमेदवारांना आज नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. शहर व जिल्हा पुरवठा विभागातील एकुण १९ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले असून हा कार्यक्रम आज उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात नागपूर शहर पुरवठा अधिकारी विनोद काळे तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी (डीएसओ) आनंद पडोळे यांच्या हस्ते नियुक्ती आदेश वितरित करण्यात आले. कविवर्य सुरेश भट सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमात या वेळी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग गट क प्रवर्ग २ उमेदवार, अनुकंपा नियुक्तीचे प्रवर्ग गट क १ उमेदवार आणि अनुकंपा नियुक्ती गट ड प्रवर्गातील १६ असे एकूण १९ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले.



नियुक्ती आदेश प्रदान करताना नागपूर शहर पुरवठा अधिकारी विनोद काळे

नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर उमेदवारांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान झळकत होते. या प्रसंगी शासकीय सेवेत नवीन उमेदवारांचे स्वागत करत अधिकारी वर्गाने त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## प्रतिबंधित ई-सिगारेट विक्रेत्यास अटक

नागपूर : गणेशपेठ पोलिसांनी गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारावर एका व्यक्तीला प्रतिबंधित ई-सिगारेटची विक्री करताना अटक केली. वसीम शेख मुस्तफा शेख (३७) रा. मोमिनपुरा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. गणेशपेठ ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय मेंढे, पोउपनि मल्हारी डोईफोडे आणि विजय नाचन पथकासह दुपारी १ वाजताच्या सुमारास परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, एम्प्रेस मिल रोडवर वंदे मातरम उद्यानाजवळील फुटपाथवर एक व्यक्ती ई-सिगारेटची विक्री करीत आहे. संशयाच्या आधारावर त्याला ताब्यात घेत पिशवीची झडती घेतली असता सरकारने प्रतिबंधित केलेल्या ई-सिगारेट आढळल्या.

# अंगणवाडी कर्मचारी संघटनेचे ११ वे राज्य अधिवेशन उत्साहात




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ६ :


सिटू संलग्न अंगणवाडी कर्मचारी संघटना महाराष्ट्राच्या ११ व्या राज्य अधिवेशन उत्साहात पार पडले. रेशीमबाग येथून शेकडो अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या घोषणांच्या गजरात रॅली काढण्यात आली. अंगणवाडी कर्मचारी संघटना झिंदाबाद, योजना कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या यासह अनेक गगनभेदी घोषणांनी रॅली चा परिसर दुमदुमला. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्री बाई फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. अंगणवाडी कर्मचारी संघटना महाराष्ट्र च्या राज्य अध्यक्षा कॉ. शुभा शमीम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. शहीद स्मारकास पुष्पचक्र अभिवादन करीत उपस्थित प्रतिनिधी व अंगणवाडी सेविका यांनी अधिवेशन सभागृहात प्रवेश केला. अधिवेशनाच्या नगरास कॉ. सीताराम येचुरी यांचे सभागृहास कॉ. नीलिमा मोईत्रा तर मंचास कॉ. आशा मेश्राम यांचे नाव देण्यात आले. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी संघटनेच्या अध्यक्षा कॉ.शुभा शामीम होत्या. संचालन कॉ. विठ्ठल जुनघरे यांनी केले. प्रास्ताविक चंदा मेंढे यांनी केले. अधिवेशनाच्या स्वागत समितीचे स्वागताध्यक्ष आमदार सुधाकर अडबाले यांनी आपल्या स्वागतपर भाषणात राज्यभरातून आलेल्या प्रतिनिधींचे नागपूर नगरीत स्वागत करीत आयोजनाची संधी दिल्याबाबत आभार मानले. अंगणवाडी सेविका या शिक्षण आणि आरोग्य या दोन्ही व्यवस्थेचा कणा असल्याचे सांगत सभागृहात आणि बाहेर सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. अधिवेशनाचे उद्घाटन संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा कॉ. उषा रानी यांनी केले. केंद्रातील भाजप सरकार योजना कर्मचाऱ्यांकडून काम करण्याची अपेक्षा ठेवत आहे परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांना त्यांच्या कामाचा फक्त दामच नाही तर हक्क देखील देत नाही. असे आपल्या उद्घाटनाच्या भाषणात सांगितले. अधिवेशनासाठी अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या राष्ट्रीय महासचिव कॉ.ए.आर सिंधू या सुद्धा पुढील दोन दिवस राहणार असून आपणास त्यांचेही मार्गदर्शन अधिवेशनास लाभणार आहे.सीआयटीयू चे राज्य अध्यक्ष डॉ डी एल कराड यांनी देखील आपल्या मार्गदर्शनात कामगारांचे शोषण करणाऱ्या भांडवलशाही व्यवस्थेवर व भांडवलदारांचे दलाल असलेल्या भाजपवर घणाघाती हल्ला चढवला. सीआयटीयू चे राज्य महासचिव कॉ. एम. एच. शेख यांनी राज्य सरकारच्या कामगार विरोधी धोरणांचा समाचार घेत या विरोधात अंगणवाडी कर्मचारी यांनी प्रखर लढा दिला असून संघटना मजबूत करण्याचे आवाहन केले. शेवटी अध्यक्षीय समारोप कॉ. शुभा शमीम यांनी केले. जाहीर सभेचे आभार संगीता कांबळे यांनी केले. अधिवेशनाला महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनाचे अध्यक्ष कॉ.अशोक दगडे , कॉ. अशोक गव्हाणकर ,कॉ.प्रा.रमेशचंद्र दहीवडे कॉ.यशवंत झाडे उपस्थित होते. शेवटी अध्यक्षीय समारोप कॉ शुभा शमीम यांनी केले. जाहीर सभेचे आभार व्यक्त . संगीता कांबळे यांनी केले. अधिवेशनासाठी राज्यभरातून प्रतिनिधी उपस्थित असून ४ आणि ५ ऑक्टोबर रोजी अंगणवाडी कर्मचारी संघटना महाराष्ट्र च्या पुढीलतीन वर्षासाठीच्या कामकाजाची रूपरेषा यात ठरविण्यात आली. अधिवेशनासाठी राज्यभरातून १५० प्रतिनिधी उपस्थित होते.प्रतिनिधी सत्रात गेल्या ३ वर्षांचा राजकीय परिस्थितीचा, कार्याचा व संघटनात्मक अहवाल व जमा, खर्च मांडण्यात आला. नवीन राज्य कमिटी व पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

## आज विमाशि संघाची शिक्षण उपसंचालकासोबत समस्या निवारण सभा

**वाडी :** विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाची माध्यमिक, प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या प्रलंबीत प्रकरणे व समस्याचे निराकरण करण्याकरिता शिक्षण नागपूर विभागीय उपसंचालकासोबत समस्या निवारण सभा विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले , माजी शिक्षक आमदार तथा महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ मुंबई चे सरचिटणीस व्हि. यू. डायगव्हाणे यांच्या उपस्थितीत मंगळवार ७ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता कै. आबासाहेब खेडकर सभागृह, जिल्हा परिषद, नागपूर येथे आयोजित केली आहे.

तरी सदर समस्या निवारण सभेला समस्याग्रस्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना, खाजगी प्राथमिक शिक्षक संघ व समविचारी संघटनांचे सर्व जिल्हा,तालुका, शहर पदाधिकारी, पेन्शन फायटर, सदस्य, मार्गदर्शक व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे, अशी विनंती विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ जिल्हा नागपूर व नागपूर महानगरच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## अजय बोढारे यांची जिल्हा महामंत्री पदावर नियुक्ती



**वाडी:** नागपूर पंचायत समितीचे माजी सभापती अजय बोढारे यांची भाजपच्या नागपूर जिल्हा (रामटेक) महामंत्रिपदी नियुक्ती करण्यात आली आहे. हुडकेश्वर येथे झालेल्या जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीदरम्यान जिल्हाध्यक्ष राऊत यांनी ही घोषणा केली. अजय बोढारे हे २००४ पासून भाजपमध्ये सक्रिय असून त्यांनी पक्षाच्या संघटनात्मक कामात सातत्याने आपला ठसा उमटवला आहे. त्यांनी भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष, नागपूर पंचायत समितीचे सभापती, जिल्हा महामंत्री तसेच कामठी विधानसभा निवडणूक प्रमुख या जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या सांभाळल्या आहेत. संघटन बांधणीसाठी त्यांनी ग्रामीण भागातील असंख्य कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून पक्षाशी घट्ट नाते निर्माण केले आहे. त्यांनी या नियुक्तीचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत यांना दिले आहे.

## सरलाताई इंगळे पाटील यांची शिवसेना (शिंदे गट) महिला आघाडी शहर प्रमुखपदी नियुक्ती



**नागपूर:** शिवसेना (शिंदे गट) महिला आघाडीच्या यवतमाळ शहर प्रमुखपदी सौ. सरला ताई दिलीपराव इंगळे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. यवतमाळ येथे पार पडलेल्या भव्य पदग्रहण सोहळ्यात राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजयभाऊ राठोड यांच्या हस्ते इंगळे यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली. या प्रसंगी पश्चिम विदर्भ समन्वयक पराग पिंगळे, संपर्क प्रमुख हरिहर लिंगणवार, जिल्हा प्रमुख गजानन डोमाळे, महिला आघाडी जिल्हा प्रमुख दर्शना इंगोले, पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. सामाजिक कार्यक्षेत्रासोबतच चित्रपटसृष्टीतही उल्लेखनीय कामगिरी करून अनेक पुरस्कार मिळवणाऱ्या सौ. इंगळे यांनी यवतमाळचे नाव राज्यभर गाजवले आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे व समाजसेवेतील बांधिलकीमुळे त्यांच्यावर पक्षाने विश्वास दाखवला आहे.

शहर प्रमुखपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सरला इंगळे यांनी सांगितले की, महिला सबलीकरण, गोरगरिबांचे प्रश्न आणि शहराच्या विकासासाठी शिवसेना महिला आघाडी सक्षमपणे कार्य करेल. पत्रकार राजेंद्र बागडे. नीतू गटलेवार, सोनल बैस, प्रिती उपरे, राजश्री मानकर, आदींनी सरला इंगळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन व कौतुक केले.

## कमलाकर शेंडे भाजपा जिल्हा ग्रामविकास सेल सहसंयोजक पदी



**वाडी:** नागपूर तालुक्यातील हुडकेश्वर ( खुर्द ) चे माजी सरपंच कमलाकर शेंडे यांची भाजपच्या नागपूर जिल्हा ग्रामविकास सेलच्या सहसंयोजक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. हुडकेश्वर येथे झालेल्या जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीदरम्यान जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत यांनी ही घोषणा केली. कमलाकर शेंडे हे सुरुवाती पासून भाजपमध्ये सक्रिय असून त्यांनी पक्षाच्या संघटनात्मक कामात सातत्याने आपला ठसा उमटवला आहे. संघटन बांधणीसाठी त्यांनी ग्रामीण भागातील असंख्य कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून पक्षाशी घट्ट नाते निर्माण केले आहे. त्यांनी या नियुक्तीचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत यांना दिले आहे. माझ्यावर जी जबाबदारी सोपविली आहे ती पूर्णपणे निभवीन असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पक्षांनी दिलेला प्रथम राष्ट्र, नंतर पार्टी, व शेवटी स्वतः या त्रिसूत्रीचा अवलंब करेन. जिल्हातील ग्रामविकास बद्दल मी पक्ष वाढविण्यासाठी प्रयत्न करेल असे त्यांनी सांगितले.

## सांड नदीच्या पुलावरुन ओलढताना गाडीसह व्यक्ती गेला वाहून



**मौदा:** मागील काही दिवसा अगोदर या बाबद बातमी पण प्रकाशित केली पण ठेकेदार यांनी कुठली दखल घेतली नाही नेमकी घटना आज आज १ वाजता घडली मौदा तालुक्यातील तारसा नदीवरील पुलावर पाणी वाहत असताना गाडी ने पुलावरून जात असताना गाडी चे संतुलन बिघडल आणि पाण्याचा प्रवाहाने वाहून गेला. घटना स्थळी तहाशिदार दत्तात्रय निंबाळकर आणि ठाणेदार सारीन दुर्गे घटना स्थळी दाखल होऊन शोध मोहीम सुरू आहे. पोलीस स्टेशन मौदा हद्दीत येणाऱ्या मौजा तारसा गावातील सांड नदीच्या पुल्ल्यावरून वाहणाऱ्या पाण्यात एक इसम त्याची क्रमांक MH ३१ AS ५३०५ हे घेऊन निमखेडा कडून तारसा मार्गे नागपूरकडे जात असताना मोठर सायकल सह सांड नदीच्या पुल यावरून नदीपात्रात वाहून गेलेला असून सदर इसमाची ओळख पटलेली आहे सदर इसम निमखेडा गावात राहणारा जगदीश इनवते वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे असे असल्याबाबत माहीत मिळाली आहे. सदर मृतकचे प्रेत अद्याप पावे मिळालेले नसून शोध कार्य सुरू आहे.

## नागपूर मंडळाने ऑगस्ट महिन्यात रू.८.३० कोटींची स्क्रॅप विक्री केली



**नागपूर :** मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळाने ऑगस्ट २०२५ महिन्यात स्क्रॅप विक्रीच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या कालावधीत मंडळाने एकूण रू. ८.३० कोटी मूल्याची स्क्रॅप सामग्री विक्री करून संसाधन व्यवस्थापन आणि कार्यकुशलतेचा उत्कृष्ट नमुना सादर केला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान नागपूर मंडळाची एकूण स्क्रॅप विक्री रू.२६.७१ कोटींपर्यंत पोहोचली आहे. ही कामगिरी केवळ अपशिष्ट निपटानातील पारदर्शकता आणि कार्यक्षमतेचे द्योतक नाही, तर उत्पन्नवाढीच्या दिशेने मंडळाने घेतलेल्या प्रगत पावलांचेही प्रतिबिंब आहे.

नागपूर मंडळ प्रशासनाने स्क्रॅपची ओळख, वर्गीकरण, साठवणूक आणि लिलाव प्रक्रियेचे सुयोग्य नियोजन करून वापरात नसलेल्या सामग्रीचा प्रभावी पुनर्वापर सुनिश्चित केला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल मंडळ प्रशासनाने संबंधित शाखा व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले असून, आगामी महिन्यांत स्क्रॅप निपटान अधिक वेगाने पार पाडण्याचा संकल्प व्यक्त केला आहे, ज्यामुळे रेल्वे अधिक स्वच्छ, कार्यक्षम आणि उत्पन्नवर्धक होईल.

## वेस्टर्न कोलफिल्ड्सचे डॉ.हेमंत पांडे यांना 'लोक-केंद्रितेतृत्व' पुरस्काराने सन्मानित




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

डॉ. हेमंत शरद पांडे, संचालक (मानव संसाधन), वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड यांना अलीकडेच गोव्यात जनसंपर्क परिषद द्वारे आयोजित १९ व्या ग्लोबल कम्युनिकेशन कॉन्क्लेव्हमध्ये प्रतिष्ठित 'लोक-केंद्रित नेतृत्व' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी देशभरातील मान्यवर पाहुणे आणि विचारवंतांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान केला. डॉ.पांडे यांना त्यांच्या उत्कृष्ट नेतृत्व, दूरदर्शी दृष्टिकोन आणि मानव-केंद्रि कार्यशैलीसाठी ओळखले गेले, ज्याद्वारे त्यांनी डब्लू सी एल मध्ये मानव संसाधन व्यवस्थापनाला नवीन उंचीवर नेले आहे. त्यांच्या गतिमान मार्गदर्शनाखाली, संस्थेमध्ये अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आले, ज्यामुळे कार्य संस्कृती, कर्मचारी सहभाग, कल्याण आणि क्षमता विकास बळकट झाला. त्यांचे नेतृत्व कर्मचारी सक्षमीकरण, समावेशकता आणि कामातील सकारात्मक नवोपक्रमावर आधारित आहे, जे डब्लू सी एल च्या 'काळजी घेऊन वाढ' या मूळ भावनेशी सुसंगत आहे. पुरस्कार समर्पित करताना डॉ. पांडे म्हणाले की, मानव संसाधन क्षेत्रातील प्रत्येक कामगिरी केवळ कर्मचाऱ्यांच्या वचनबद्धता आणि सामूहिक प्रयत्नांमुळेच शक्य झाली आहे. ग्लोबल कम्युनिकेशन कॉन्क्लेव्ह हा एक प्रमुख वार्षिक कार्यक्रम आहे. जो धोरणकर्ते, कॉर्पोरेट व्यावसायिक, संप्रेषण तज्ञ आणि विचारवंतांना एकत्र आणून नेतृत्व, जनसंपर्क आणि संघटनात्मक उत्कृष्टतेवर चर्चा करतो.

## मॉ सरस्वती चॅरिटेबल ट्रस्ट व नवरात्र उत्सव मंडळातर्फे नवरात्र उत्सवाचीं सांगता



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ६ :

मॉ सरस्वती चॅरिटेबल ट्रस्ट व नवरात्र उत्सव मंडळ, सरस्वती नगर, काटोल यांच्या वतीने आयोजित नवरात्र महोत्सवाची सांगता भव्य सत्कार समारंभाच्या आयोजनाने उत्साहात आणि भक्तिपूर्ण वातावरणात पार पडली. या कार्यक्रमास काटोल विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. श्री. चरणसिंग ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या समारंभात नवरात्र उत्सवाच्या आयोजनात मोलाचे सहकार्य करणाऱ्या मान्यवर अधिकाऱ्यांचा आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. सत्कारमुर्तींमध्ये काटोल येथे नवनिर्वाचित उपविभागीय पोलीस अधिकारी पराग पोटे , काटोल येथील थानेदार रणजीत शिरसाठ, सायक पोलीस उपनिरीक्षक विवेक राऊत, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा घोगले, सायक पोलीस उपनिरीक्षक संजय माडवगळे , सायक महावितरण अभियंता प्रवीण बालपांडे, जय भवानी डेकोरेशन तुमसर चे संचालक विलास बावनकर, नवरात्री उत्सव दरम्यान नव दिवस ज्यानी चागल्या पध्दतीने मिनाबाजार मेल्याचे आयोजन केले नागपूर येथील भाटी एण्ड भाटी चे संचालक अश्रफ भाटी, अरशद भाटी सम्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आले . मंडळाच्या वतीने त्यांना सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व शाल देऊन गौरवण्यात आले. सत्कारानंतर आमदार श्री. ठाकूर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सरस्वती मंदिर व चंडिका माता मंदिराचा ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व विशद केला. त्यांनी सांगितले की, 'या मंदिरांचे काटोल शहराच्या सांस्कृतिक, धार्मिक व आध्यात्मिक जीवनात फार मोठे योगदान आहे. अशा पवित्र स्थळी आयोजित हा उत्सव खरोखरच समाज एकत्र आणणारा आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र रेवतकर आणि त्यांच्या कार्यकारिणीचे सहकार्य उल्लेखनीय ठरले. मंडळातील पदाधिकारी राजू मक्कड, आशिष मक्कड, चंदू गिरी, जगदीश पालीवाल, श्री शैलेन्द्र उपाध्याय, नितेश खंडाते, मनोज

### आमदार यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार

कच्छवा, भूषण ठाकरे, संजय मांडवगडे,, पराग मानकर विकल परमाल, मुन्ना मिश्रा, नितेश बत्रा, यांनी नियोजन व आयोजनात विशेष मेहनत घेतली. याप्रसंगी ॲड. दीपक केने, समीर उमप, किशोर गाढवे, सुभाष कोठे, संदीप सरोदे, राजेंद्र डंभाळे, तानाजी थोटे, प्रवीण लोहे आणि भूषण भोयर उपस्थित होते.

उत्सवाच्या सांगतेला काटोल शहरातील सर्व नवरात्र उत्सव मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते, यामुळे कार्यक्रमाचे स्वरूप अधिक व्यापक आणि एकात्मिक झाले. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंडळाने गरबा-रास, देवी अर्चना, महाआरती, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमांद्वारे उत्सव साजरा केला.

## नांद,चिखलापार परिसरात मुसळधार पाऊस

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. ६ :

जलाशयाचे दोन गेट उघडण्यास आले



चिखलापार जवळील नांद नंदीला आज दुपारी १ वाजता पासून मुसळधार पडलेल्या पावसामुळे पुर आल्याने उमरेड - चिखलापार - समुद्रपूर या मार्गावरील वाहतूक ठप्प पडली असून दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगा लागल्या आहे. तसेच याच नदींवर मोठया पुलाचे बांधकाम सुरू आहे. आज पडलेल्या पावसामुळे अगोदरच सोयबीन पिक नष्ट झाली आहे.

त्यात पराठी, धान , मिरची पिके अडचणीत सापडण्याची शक्यता शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. आज पडलेल्या पावसामुळे नांद (शेडेश्वर) धरणाचे दोन दरवाजे उघडण्यात आले असून याबाबची माहिती तहसिलदार बाबासाहेब टेळे यांना दिल्याची माहीती भिवापूर खविस सभापती भास्कर येगळे दिली आहे. नांद नदी ला आलेल्या पुरामुळे बरीच वाहने उमरेड रोड वरून मांगरूळ ते नांद या मार्गनि वळती झाले. त्यामुळे या मार्गावरून वाहनाची ये -जा करणे वाढले होते.

### रोजगार मेळाव्याचे ८ ला आयोजन

**नागपूर:** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नागपूर, मॉडेल करीअर सेंटर, नागपूर तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने बुधवार दि. ८ ऑक्टोबर रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रद्धानंद पेठ, नागपूर येथे करण्यात आलेले आहे. या रोजगार मेळाव्यामध्ये टॅलेंटराईज टेक्नोक्रेट प्रायव्हेट लिमिटेड, वैभव इंटरप्राइज, विंध्य इन्फो मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, द मेंटोर इत्यादी कंपन्यामार्फत ४१९ पेक्षा जास्त जागांसाठी दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर, डिप्लोमा इत्यादी पात्रताधारक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन उमेदवारांची प्राथमिक निवड केली जाणार आहे.

## गांधी जयंती निमित्त विविध ठिकाणी स्वच्छता अभियान



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

उदय श्रमजीवी संस्थान तर्फे गांधी जयंती निमित्त दिनांक २५ सप्टेंबर ते २ ऑक्ट प्रयत्न विविध ठिकाणी स्वच्छता करण्यात आली त्यात राष्ट्र संत तुकोजी महाराज याचे स्मारक अगरमदेवी चौक तसेच गांधीसागर येथील संत गाडगे बाबा यांचे स्मारक, मॉडेल मिल चौक, राजे रघूजी महाराज यांचे स्मारक, शहिद शंकर महाले यांचे स्मारक, रांका स्मारक कल्याणश्वर महाल चौक, असे एकूण ३५ ठिकाणी स्वच्छता जनजागरण कार्यक्रम घेण्यात आले आणि गाडीखाना मैदान येथे समापन कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी कमलाकर उतखेडे संचालक हॅरिझन कॉन्व्हेन्ट व मनपा स्वच्छता कर्मचारी देवेंद्र गोंडाने यांचा श्याम तेलंग व अनिल आदमने यांच्या हस्ते सत्कार करून कार्यक्रमाचा सांगता झाला. याप्रसंगी संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक दिलीप दिवटे, मिलिंद येवले, तसेच संस्थेचे अध्यक्ष उमेश निनावे, सचिव प्रविण घरजाळे, अमोल चव्हाण पिंटू ढोबळे, विवेक सूर्यवंशी, सुहास माहूरकर, विवेक पोहाने, सचिन चरडे, संतोष गिरीपुंजे उपस्थित होते.

## तेजस बहुउद्देशीय संस्था द्वारा अन्न आणि किराणा सामानाचे वाटप



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ६ :

'मानव सेवा ही ईश्वरी सेवा' तेजस बहुउद्देशीय संस्था गेल्या ५ वर्षांपासून भुकेल्यांना अन्न आणि किराणा सामानाचे वाटप करत आहे. असहाय्यांना मदत करणारे मानवाच्या रूपात देव आहेत, असे संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार यांचे मत आहे. त्यांना मदत करणाऱ्यांमध्ये कामठी कॅन्टचे माजी उपाध्यक्ष महेंद्र भुटानी, नागपूरचे विदर्भ नेते सीए सुनील चोखरे, सीए शिल्पी टिबडीवाल, तिवारी गॅस एजन्सीचे संचालक बबलू तिवारी, सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र उर्फ ??मोंटू भुटानी, राजू अग्रवाल जीडी, महाराष्ट्र टेक्सटाईल सेंटर कामठीचे मनोज बत्रा, डॉ. नयना दुफारे, सामाजिक कार्यकर्त्या रजनी पिल्ले मॅडम , राजस्थान झालावाढ पोलिसांचे हवालदार पदम वर्मा, संघटनेचे उपाध्यक्ष देविदास पेटारे, संघटनेचे संस्थापक/अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार यांचा तर्फे अन्न ,किराना सामान गोळा करुण हे अन्न किराना दरमहा असहाय्य लोकांना दिले जाते. आज २७/सप्टेंबर/२०२५ रोजी कुंभारे कॉलनी, जयभीम चौक, कादर झंडा मशिदीमागे, छोटी अजनी, कन्हान सत्रापूर येथे अन्न आणि किराणा सामानाचे वाटप करण्यात आले. अन्न वाटप करताना संघटनेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार, उपाध्यक्ष देविदास पेटारे यांचे पुत्र अभय पेटारे, मार्गदर्शक एम.ए. जब्बार, सदस्य नरेश शिंदे उपस्थित होते. अरगुलेवार यांनी वृद्धाश्रम बांधण्यासाठी मदतीची विनंती केली. तेजस संस्थेचा हात नेहमीच मानवतेसोबत आहे.

## बाजारगाव जि. प. शाळेतील मारहाण प्रकरण

### सत्यशोधन समिती गठित करण्याची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. ६ :** बाजारगाव जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनींना मारहाण प्रकरणात सत्यता पडताळून पाहण्यासाठी 'सत्यशोधन समिती' गठित करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक-शिक्षकेत्तर सेनेने केली आहे. या संदर्भात मनसे शिक्षक सेनेचे राज्य सरचिटणीस शरद भांडारकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जि. प. चे सीईओ विनायक महामुनी यांना निवेदन सादर केले. विद्यार्थिनींना प्लास्टिक उचलून कचरापेटीत टाकण्यास सांगितल्यावर दुर्लक्ष केल्यामुळे साहाय्यक शिक्षिका मनीषा चौधरी यांनी सौम्य चापट मारल्याचा आरोप आहे. प्रत्यक्षदर्शी विद्यार्थी व कंत्राटी शिक्षिकेचे म्हणणेही असेच असल्याचे निवेदनात नमूद आहे. वैद्यकीय प्रमाणपत्र व पोलिस अहवालातील माहिती वस्तुस्थितीला धरून नसल्याचे मनसे शिक्षक सेनेचे म्हणणे आहे. मनीषा चौधरी यांच्या सेवाकाळात कोणतीही तक्रार नसून त्या गुणवत्तापूर्ण शिक्षण देत असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी शिक्षक संघटनेचा प्रतिनिधी असलेली स्वतंत्र समिती तातडीने नेमावी, सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवावेत, जेणेकरून शिक्षकांवर खोटे आरोप होणार नाहीत, अशी मागणीही करण्यात आली. शिष्टमंडळात देविदास काळाने, मनोज घोडके, रामकृष्ण ढोले, प्रदीप दुरुगकर, चंद्रकांत मासूरकर, मनीषा चौधरी आदी उपस्थित होते.

# देवलापार येथे शिवसेना कार्यकर्त्यांचा संघटन मेळावा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक, दि. ६ :**

देवलापार येथील विद्या सेलिब्रेशन हॉल येथे शिवसेना संघटन मेळावा व कार्यकर्ता संवाद कार्यक्रमास शिवसेना नेते राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल यांनी उपस्थित राहून सर्व कार्यकर्त्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला.

यावेळी बोलताना शिवसेना नेते राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल म्हणाले,'आजच्या कार्यकर्ता मेळाव्यातील उत्स्फूर्त उपस्थिती पाहून आनंद झाल्याचे सांगितले. सुरुवातीच्या काळात पक्षाची ताकद काहीशी कमी होती, पण सर्व कार्यकर्त्यांच्या एकजुटीने, निष्ठेने आणि मेहनतीने आज शिवसेना दिवसेंदिवस बळकट होत असल्याचा मनस्वी आनंद व्यक्त केला.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक शिवसैनिकाने छातीला माती लावून, जनतेत राहून ताकदीने काम करावे, असे आवाहन करण्यात आले. कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्या अथक परिश्रमांमुळेच रामटेक विधानसभेवर ५० टक्के पेक्षा अधिक मतदान घेऊन भगवा फडकवता आला. कारण शिवसैनिक हे जनतेच्या सुखदुःखात सहभागी होणारे, जनतेत राहणारे कार्यकर्ते आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना हा कार्यकर्त्यांचा आणि जनतेचा पक्ष आहे, त्यामुळे अधिक जोमाने आणि सक्षमतेने काम करण्याचे आवाहन केले. शिवसेना –महायुती सरकार हे जनसामान्यांसाठी काम करणारे सरकार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. लाडकी बहीण योजना असो किंवा सीएम किसान योजना असो, अशा अनेक जनकल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. अनावश्यक खर्च कमी करून महिलांसाठी, शेतकऱ्यांसाठी आणि सर्वसामान्यांसाठी सातत्याने कार्य केले जात आहे. आजपर्यंत कोणत्याही विधानसभेत ८० हजार सदस्य नोंदणी झालेली आहे.

आता हा विक्रम मोडून एक लाख सदस्यांची नोंदणी करायची आणि महाराष्ट्रातील नंबर एक मतदारसंघ म्हणून रामटेकला उभे करायचे, असे आवाहन यावेळी केले.

कार्यकर्त्यांनी सदस्यसंख्या वाढवावी, लोकांच्या भेटीगाठी घ्याव्यात, त्यांच्या सुखदुःखात सामील व्हावे आणि लोकांची कामे करावीत, कारण लोक जेव्हा आपलं कार्य पाहतील, तेव्हा नक्कीच डोक्यावर घेतील, असा विश्वास व्यक्त केला.




अनेक योजना व विकासकामे मतदारसंघात सुरू असून, लोकांच्या आशीर्वादाने महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिपदाची जबाबदारी पार पाडताना १४ कोटी जनतेसाठी कार्य करण्याची संधी लाभली असल्याचे सांगितले. जनतेची सर्व कामे प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने केली जातील, असे आश्वस्त केले.

विरोधक नावं ठेवत होते की ङ्घधान बोनस मिळणार नाही, पाणंद रस्ते होणार नाहीतङ्घ असे म्हणत होते. पण आज ती सर्व कामे पूर्णत्वास गेली आहेत. पाणंद रस्त्यांचा 'रामटेक पॅटर्न' आज महाराष्ट्राने स्वीकारला असून हा उपक्रम राज्यभर राबविला जात आहे. वंचित, शोषित, महिला, युवक, आदिवासी या सर्व घटकांच्या कल्याणासाठी सातत्याने काम करण्याचे आवाहन यावेळी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले.

शिवसेना गाव तिथे शाखा, शाखा तिथे फलकङ्घ हा उपक्रम राबवून गावोगावी संपर्क वाढवा असे नमूद केले.काळजी करण्याचे काही कारण नाही, आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे भक्त आहोत. भगवा हातात घ्या आणि विजयी मोहिमेला प्रारंभ करा, असे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी यावेळी सांगितले.

यावेळी प्रसंगी ग्रा. पंचायत बोथीया पालोरा सदस्य शैलेश उईके, अविनाश राऊत, अतुल वाढिवे, रुपेश सरोदे,ग्रा. पंचायत वरघाट येथील सरोज धुर्वे, अनुपा टेकाम, संगीता खंडाते, घोटी येथील वर्षा ठाकरे, संगीता खेडकर, कांचन चोखंद्रे, देवलापार येथील व्यंकट दशमेर, देवराव भलावी, मंगला जिवतोडे, शोभा चौधरी, ग्रा.पं.वडंबा अंतर्गत नवेगाव येथील आश्विन मरसकोल्हे, दिपक टेकाम, कट्टा गावातील गणपत वरठी, मीना इनवाते, शकुंतला धुर्वे, सुखदास कुमरे, सरिता कोडवते सह अनेक आदिवासी बंधू भगिनींनी व मुस्लिम बांधव अबरार सिद्दिकी, सलीम शेख, समीर सिद्दिकी, राजिक शेख, हनीफ पठाण, फैजल अन्सारी अशा शेकडो लोकांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख वर्धराज पिल्ले,शिवसेना रामटेक तालुका प्रमुख विवेक तुरक, युवासेना उपजिल्हाप्रमुख कमलेश शरणांगत,माजी जिल्हा परिषद सदस्य नरेश धोपटे, संजय झाडे, पंचायत समिती माजी सभापती संजय नेवारे व चंद्रकांत कोडवते, रामटेक तालुका संघटक देवानंद वंजारी, हिमांशु पानतावने, आदिवासी विकास आढावा समिती अध्यक्ष शिवा कोकोडे, लखन खंडाते, चमन जयस्वाल, कुंदन वैद्य, अशोक जयस्वाल, इंद्रजीत वलोकर, समाजसेवक स्मित गुप्ता, शिवसेना उप तालुका प्रमुख शेखर खंडाते, सरपंच संघटना रामटेक तालुका अध्यक्ष आशिष मासुरकर, दुर्गेश बरबटे, विलास वाढीवे, युवासेना रामटेक तालुका प्रमुख प्रफुल वरखेडे, युवासेना रामटेक तालुका संघटक आकाश पंधरे, युवासेना उप तालुका प्रतिक डोंगरे, विभाग प्रमुख एकनाथ गोडबोले, उपविभाग प्रमुख विलास वाढीवे, रिजवान पठाण, वडंबा सरपंच मुकेश दुबे, वरघाट सरपंच देवराज इनवाते, पथरई सरपंच संदीप वासनिक, डोंगरताल सरपंच उपेश उईके, दहोदा सरपंच आकाश वासनिक,सालई सरपंच उत्तम धराडे, बांद्रा सरपंच कल्पना भलावी, टांगला सरपंच पंचफुला मडावी, मुसेवाडी सरपंच भारती बोरजवाडे, सुशिल उईके, सचिन कोडापे, पं.समिती माजी उपसभापती प्रणालीताई सरोदे, शिवसेना महिला आघाडी विभाग प्रमुख ज्योतीताई धुर्वे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

## सशक्त व महासत्ता भारतासाठी समाज एकता गरजेचे : श्याम हरकरे यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. ६ :**

डॉ.हेडगेवार यांनी स्वातंत्र्य भारत साठी आंदोलन सुरू केले. त्यांना यासाठी सक्षम कारावास सुध्दा झाला.१९३० मध्ये जंगल सत्याग्रह सुरू केला. आज संघाचा शताब्दी महोत्सव साजरा होत आहे.कॉंग्रेस नगरमध्ये कॉंगेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनाची पूर्ण जबाबदारी डॉ. हेडगेवार यांनी सांभाळली. भारताला विश्व गुरू बनविण्याचे स्वप्न डॉ.हेडगेवार यांचे होते. तेव्हापासून हिंदु संघटन वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु केले. १०० वर्षाचा काळ २५० च्यावर छोटे छोटे संघटन, देशसेवा करणारा स्वयंसेवक हे सर्व याची देही ,याची डोळा आज पहायला मिळत आहे. १९३६ मध्ये संघाला थांबविण्याचा प्रयत्न झाला. १९३८ पासुन हिंदुराष्ट्राचा छात्र शक्ती राष्ट्र शक्ती, सर्वच क्षेत्रात संघाचे काम सुरू आहे. सोबतच वनवासी भागात खुप मोठ्या प्रमाणात काम सुरू आहे.डॉ. हेडगेवार यांचा संघ स्थापने मागचा उद्देश स्पष्ट करीत सांगितले की आपला भारत देश सशक्त व महासत्ता बनण्यासाठी समाजाला एकत्र येऊन कार्य करण्याची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे अखिल भारतीय परियोजना प्रमुख ( धर्म जागरण) श्याम हरकरे यांनी केले.




दत्तवाडीतील गजानन सोसायटी क्रीडा मैदानावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वाडी नगराचा श्री विजयादशमी उत्सव रविवार ५ ऑक्टोंबर रोजी उत्साहात साजरा झाला. तेव्हा ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

सर्वप्रथम संध्याकाळी ६ वाजता नगरातुन स्वयंसेवकांचे पथसंचालन झाले यात समाजाने सहभाग घेत प्रत्येक चौकात स्वयंसेवकांनावर पुष्पवर्षाव केला. व्यासपिठावर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय दमके प्रमुख वक्ता रा. स्व. संघाचे अखिल भारतीय परियोजना प्रमुख ( धर्म जागरण) श्याम हरकरे ,उमरेड जिल्हा संघचालक दिपक दुधाने वाडी नगर संघचालक दिनेश मंत्री उपस्थित होते. श्री विजया दशमी उत्सवाची सुरवात शस्त्रपूजनाने करण्यात आली. डॉ. संजय दमके यांनी संघाच्या कामाची प्रशंसा केली व संघाचे कार्य कसे देश हिताचे आहे हे समजावून सांगितले.संघाच्या कार्यकर्त्या प्रत्येकाच्या मदतीला धावतात त्यामुळे सर्व प्रथम संघाच्या कार्यकर्त्याला नमन, गरीब वस्तीत मंदीर सुरू करा आणि त्यामंदीरात वाचनालय सुरू करा. असेही त्यांनी सांगितले. स्वयंसेवकांद्वारे सांघिक गीत, योगासन, नियुद्ध व सामूहिक व्यायाम योग चे प्रदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, व परिचय वाडी नगर कार्यवाह संगीत करार यांनी केले. उत्सवाचे मुख्यशिक्षक साईभानू मुथीयाला होते.वक्तयाचा उद्बोधन पूर्वी अमृतवचन, सुभाषित, व वैयक्तिक गीत झाले. उत्सव पाहण्यासाठी वाडी नगरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकात्मता मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

## पत्रकार युवराज मेश्राम यांची विदर्भ शाहीर कलाकार परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धी प्रमुखपदी नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ६ :** कळमेश्वर तालुक्यातील जेष्ठ समाज सेवक तथा वरिष्ठ पत्रकार युवराज मेश्राम यांची विदर्भ शाहीर कलाकार परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धी प्रमुख या पदावर नुकतीच नियुक्ती करण्यात आली. यावेळी त्यांनी काटोल येथे विदर्भ शाहीर कलाकार परिषदेच्या मेळाव्यात युवराज मेश्राम यांना नियुक्तीपत्र विदर्भ शाहीर कलाकार परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष मनीष जी भिवगडे तसेच केंद्रीय कार्याध्यक्ष अलंकारजी टेंभुर्णे यांच्या उपस्थितीत नागपूर जिल्हा अध्यक्ष दयाल कांबळे अरुण वाहने नागपूर जिल्हाचे नव्याने झालेले अध्यक्ष नेंद्र डोंगरे अरुण सहारे यांच्या हस्ते युवराज मेश्राम यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थितीत काटोल येथे युवराज मेश्राम यांची जनसेवेची प्रबळ इच्छाशक्ती, सेवाभावी वृत्ती, कलाकारांचे हित, सांस्कृतिक क्षेत्रात काम करण्याची आवड तसेच संगठन बांधनीचा दांडगा अनुभव लक्षात घेता पत्रकार मेश्राम यांची महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्धी प्रमुख या पदावर नियुक्ती करण्यात आली युवराज मेश्राम यांनी आपल्या निवडीचे श्रेय विदर्भ शाहीर कलाकार परिषदेचे अध्यक्ष मनीष जी भिवगडे कार्याध्यक्ष अलंकार टेंभुर्णे दयाल कांबळे अरुण सहारे अरुण वाहने यांना दिले असुन या कलेच्या माध्यमातून कलाकारांचे हित जोपासण्या साठी सदैव तत्पर राहणार असुन वरिष्ठांच्या विश्वासाला तडा जावूदेणार नहीं अशी ग्वाही मेश्राम यांनी दिली. मेश्राम यांची विदर्भ शाहीर कलाकार परिषदेची प्रसिद्धी प्रमुख पदी निवड झाल्याबाल नागपूर जिल्हाच्या वतीने त्यांच्या अभिनंदन करण्यात येत आहे नेंद्र डोंगरे रवी दलाल संगीता भक्ते संजय खांडेकर मायाताई गणोरकर सोनाली ताई गोडाने नामदेव ठाकरे गंगाधर नागपूर जीवन बागडे रुपेश मेश्राम विश्वजीत मेश्राम जनतेने त्यांचे अभिनंदन केले आहे.

## नेहरू महाविद्यालयात रोजगाराच्या संधी' या विषयावर व्याख्यान



■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. ६ :** येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे वाणिज्य व व्यवसायिक शाखेच्या वतीने 'कंपनी सचिव म्हणून रोजगाराच्या संधी' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सी.एस. पलक भालोटिया, आयसीएसआयचे विदर्भ विभागाचे कार्यकारी अधिकारी प्रफुल्ल दास प्रामुख्याने उपस्थित होते.मुख्य वक्त्या पलक भालोटिया यांनी विद्यार्थ्यांना कंपनी सचिव या क्षेत्रातील रोजगाराच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजय टेकाडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात कंपनी सचिवाच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना या क्षेत्रात करिअर घडविण्यासाठी प्रेरित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. नभा कांबळे यांनी केले.

संचालन प्रा. राहुल डोईफोडे यांनी तर आभार प्रा. भाग्यश्री चौधरी यांनी मानले. कार्यक्रमाला वाणिज्य विभागातील प्रा. राहुल डोईफोडे, प्रा. सुमित जुनगरी, प्रा. भाग्यश्री चौधरी, प्रा. ऐश्वर्या जटप, प्रा. शुभांगी लामसोंगे, डॉ. अर्चना उमरकर, डॉ. वैशाली झोडे तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## सेंटर पॉइंट शाळेत महात्मा गांधी जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ६ :**

सेंटर पॉइंट शाळा, वर्धमान नगर येथे महात्मा गांधी जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका कांचन उके यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून झाली.

यावेळी बोलताना मुख्याध्यापिका उके म्हणाल्या, महात्मा गांधी फक्त राजकारणी नव्हते, तर ते एक आदर्श मानवतावादी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्य, अहिंसा आणि प्रेम या मूल्यांद्वारे संपूर्ण जगाला नवा मार्ग दाखवला. म्हणूनच ते 'महात्मा' म्हणून ओळखले जातात.ङ्घ गांधीजींना 'बापू' असे संबोधले जाण्यामागे त्यांच्या नेतृत्वातील



माणुसकी, प्रेम, आणि राष्ट्रासाठीचे योगदान याची जाणीव असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात तिसऱ्या वर्गातील कियान पसारी ,निवान जैन यांनी भक्तिगीत व गांधीजींच्या जीवनावर आधारित भजन सादर केली. अद्विक वाठूळकर ने गांधीजींसारखी वेशभूषा करून उपस्थितांचे लक्ष वेधले. कार्यक्रमात उपमुख्याध्यापिका दीपा चक्रवर्ती, जयती चक्रवर्ती, हिंदी विभाग प्रमुख प्रतिभा जांभूळकर, तसेच सुनिता पाटील, रुबी माथुर ,मंजुषा गजभिये, वंदना अलमडोहकर, अर्चना ढोक, ज्योती नायक ,वर्षा खोदनकर, सुनिता बर्गट, वैशाली सातमोहनकर, लता पुरोहित,रंजना होले ,अकिल युसुफ ,प्रमोद जांभूळकर ,रुची त्यागी आदी शिक्षकवृंद उपस्थित होते.

## तालुका स्तरीय मैदानी स्पर्धेत श्री विश्वनाथ बाबा हायस्कूल अव्वल

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. ६ :**

येथील श्री विश्वनाथ बाबा हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी नागपूर ग्रामीण तालुका स्तरीय मैदानी स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करुण अव्वल स्थान पटकाविले. १९ वर्षावरील विद्यार्थी सागर पारधी याने ८०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक तर ४०० मीटर धावण्यात द्वितीय क्रमांक पटकावला. तर आर्या कुरडकर हिने २०० मीटर व ४०० मीटर या दोन्ही धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्यामकुमार जयस्वाल, सचिव राजेश जयस्वाल, मुख्याध्यापक राजेश



बिडवाईक, पर्यवेक्षक राजीव वाल्दे, क्रीडा शिक्षक विवेक चौधरी, प्रा.बलदेव राठोड ,संदीप उपासे , विजया बोरकुटे , इंदिरा मोहतकर ,चव्हाण ,विजया बोरकुटे , आखरे , खुशी गणवीर ,किर्ती चौके , जयकिशोर जैस्वाल , सतीश जैस्वाल ,विजय जैस्वाल सर,उमेश दडमल , स्वप्नील जैस्वाल , अशोक जांभळे ,विवेक चौधरी , प्रा. अशोक डोंगरकर , प्रा. सुधाकर लडके दिलीप तळहांडे तसेच तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## प्रमोद मारोडकर यांचा सेवानिवृत्ती सन्मान सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
**हिंगणा, दि. ६ :** लकडगंज,नागपूर येथील विनायकराव देशमुख हायस्कूल व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील आदर्श आणि यशस्वी मुख्याध्यापक प्रमोद मधुकरराव मारोडकर यांचा सेवानिवृत्ती सन्मान सोहळा नुकताच पार पडला.याप्रसंगी संस्थेचे पूर्वाध्यक्ष अविनाश देशपांडे,संस्थेचे सचिव अंबरीश घटाटे,शाळेच्या मुख्याध्यापिका अनुश्री पारखी, व्यासपीठावर उपस्थित होते.शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कारमूर्ती प्रमोद मारोडकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.संस्थेचे पूर्वाध्यक्ष अविनाश देशपांडे,शाळेच्या मुख्याध्यापिका अनुश्री पारखी, ॲड. आदित्य बनसोड,पर्यवेक्षक मंगेश बावसे,ज्येष्ठ शिक्षक रामकृष्ण सावरकर,पूनम चव्हाण,राखी असोलकर,उदय लोहारकर,रंजना बिडकर, वैशाली देशमुख, सविता भाले, हितेंद्र ठाकरे



यांनी मुख्याध्यापक प्रमोद मारोडकर यांचा जीवनपट उलगडून दाखविला तर मारोडकर यांनी शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.शाळेतील शिक्षिका मधुरा जोशी यांनी संचालन आणि आभार मानले.याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मारोडकर कुटुंबीय उपस्थित होते.

## एक पौधा जिंदगी के नामच्या धर्तीवर वाढदिवस साजर



**नागपूर, दि. ६ :** वानाडोंगरी – वागधाराच्या रॉयल गायत्री पार्क–२ मध्ये राहणाऱ्या एका कुटुंबातील विजय गौडखेडे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या मित्रांनी रोपटे भेट देऊन वाढदिवस साजरा केला. त्यांच्या मित्रांनी सांगितले की, रोपे आपल्या जीवनासाठी महत्त्वाची आहेत, जसे आज वाढत्या झाडांच्या अंदाधुंद कत्तलीमुळे पर्यावरणाचे खूप नुकसान होत आहे. ज्यामुळे आपल्या जीवनावर परिणाम होत आहे. आपल्या जीवनासाठी अत्यंत आवश्यक असलेली झाडे दुर्मिळ होत आहेत, म्हणूनच आम्ही 'एक पौधा जिंदगी के नाम' या मोहिमेअंतर्गत त्यांचा वाढदिवस साजरा करत आहोत, कोणताही आनंदाचा प्रसंग असो, आम्ही लोकांना रोपे भेट देऊन रोपे लावण्याची विनंती करत आहोत. यावेळी प्रफुल्ल जयसिंगपुरे, विकी हरिणखेडे, शिल्पा वानखेडे, ज्योती पाटणकर, प्रीती जयसिंगपुरे, संगीता गौरखेडे उपस्थित होते.

# लोकसारंग हरदास यांनी शाळा व शिक्षकांबद्दल व्यक्त केली कृतज्ञता

■ महासागर प्रतिनिधी
**हिंगणा, दि. ६ :**

लिबरल एज्युकेशन सोसायटी, नागपूर द्वारा संचालित हडस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय हे माझे ऊर्जा केंद्र असून शालेय जीवनात माझ्यावर झालेले संस्कार व्यावसायिक जीवनात आजही पावलोपावली उपयोगी पडतात, अशी भावना अमेरिकेतील एल एज टोटली ऑसम ग्रुपचे संस्थापक ⁕लोकसारंग हरदास⁕ यांनी व्यक्त केली आणि शाळा व शिक्षकांबद्दल कृतज्ञता भाव व्यक्त करताना ⁕स्व. लाडकर सर , स्व. लाडकर मॅडम व स्व. गिल्लरकर⁕ सरांविषयी विशेष उल्लेख करून उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

उत्तर अंबाझरी मार्गावरील हडस हायस्कूल चे १९७५ च्या बॅचचे विद्यार्थी असलेले लोकसारंग हरदास यांनी आज आपल्या शाळेला सदिच्छा भेट दिल्यानंतर स्वागत समारंभात मनोगत व्यक्त

**शाळा हेच माझे ऊर्जा केंद्र : लोकसारंग हरदास**




करताना म्हणाले की , स्वर्गीय गिल्लरकर⁕ सरांनी व शाळेतील शिक्षकांनी आम्हाला घडवलं म्हणूनच आम्ही आदर्श व्यक्ती म्हणून नावारुपास येऊ शकलो. लिबरल एज्युकेशन सोसायटीला शाळेच्या प्रगतीसाठी शक्य तेवढी आर्थिक मदत करू अशी ग्वाही दिली. ⁕लोकसारंग हरदास⁕ यांनी सीबीएसई विभागाची पाहणी केली व शैक्षणिक प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. २ महाराष्ट्र सिग्नल कंपनी एनसीसी च्या छात्र सैनिकांनी सलामी देऊन स्वागत केले. स्वागत समारंभ प्रसंगी अविनाश पेंडसे, उपाध्यक्ष⁕ , लिबरल एज्युकेशन सोसायटी यांनी पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत केले. ⁕मुख्याध्यापिका मृणाल कासखेडीकर डॉक्टर प्राजक्ता गंगाखेडकर यांनी सौ हरदास यांच्यासाठी भेटवस्तू भेट दिली. ⁕कोषाध्यक्ष, विनय लाडकर⁕ यांनी लोकसारंग हरदास यांचा विद्यार्थ्यांना परिचय करून दिला. विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात आपल्या मनातील प्रश्न जाहीरपणे विचारले व त्या प्रश्नांची हरदास यांनी समाधानकारक उत्तरे दिली. दया कर दान भक्ती का.... ही शालेय प्रार्थना विद्यार्थ्यांनी सादर केली. यावेळी लिबरल एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष, अविनाश पेंडसे कोषाध्यक्ष, विनय लाडकर व गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य सतीश साल्पेकर, राम जोशी, हेमंत डांगे , किशोर जोशी याशिवाय श्रीमती गिल्लरकर प्रामुख्याने उपस्थित होत्या. अध्यक्ष डॉक्टर ए.पी. जोशी व सचिव निलेश साठे यांनी स्वागत सोहळ्यास शुभेच्छा दिल्या. प्राचार्य अजय लाबडे, मुख्याध्यापिका मृणाल कासखेडीकर व सीबीएसई विभागाच्या मुख्याध्यापिका डॉक्टर प्राजक्ता गंगाखेडकर , हडस हायस्कूल नागपूर अलुमिनी असोसिएशनचे अध्यक्ष किरण दुरुगकर, तुषार मंडलेकर, प्रशांत गोडबोले व इतर सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी पिंपळापुरे यांनी तर आभार मुख्याध्यापक अजय लाबडे यांनी मानले.

## नागपूर विद्यापीठ समुह गायन स्पर्धेत रामकृष्ण वाघ महाविद्यातील विद्यार्थ्यांचे सुयश

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ६ :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ गांधी विचारधारा विभाग अंतर्गत घेण्यात आलेल्या समूह गायन स्पर्धेत रामकृष्ण वाघ महाविद्यालयाला पाचवे नामांकन पारितोषिक प्र. कुलगुरूंच्या हस्ते प्राप्त झाले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव डॉक्टर वाघ व लता वाघ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

प्राचार्य पंकज झगडे व संपूर्ण सहकारी प्राध्यापकांचे योगदान लाभले ,संगीत विभाग प्रमुख सह. प्रा. सचिन देशमुख व सह.प्रा.हर्षद रोठे यांचे प्रयत्न फळास आले, स्पर्धेत बीए, बीबीए, बीसीसी



विभागातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. अनुक्रमे ऋतुजा खोबरागडे, सुचिता मेश्राम ,अंजली शुक्ला, भूमी देशकर, वैष्णवी बडवाईक,सुप्रिया ठाकरे, रुचिता ठाकरे, मोनाली महल्ले, रुचिता जांभुळकर, पायल बेहेनिया यांनी स्पर्धेत यशस्वी सहभाग नोंदविला

# शहराच्या जडणघडणीसाठी ज्येष्ठ नागरिकांचे सहकार्य आवश्यक

## अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांचे प्रतिपादन, मनपातर्फे जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

नागपूर शहराच्या जडणघडणीत साक्षीदार राहिलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या सूचना तसेच त्यांचे सहकार्य आवश्यक असून,त्यांच्या सकारात्मक सूचनांवर निश्चितपणे अंमलबजावणी केली जाईल, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. यांनी बुधवारी (ता. १) केले.

नागपूर महानगरपालिकेचा ज्येष्ठ नागरिक कक्ष आणि सिनिअर सिटीझन कौन्सिल ऑफ नागपूर डिस्ट्रीक्टच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त विशेष कार्यक्रम कविवर्य सुरेश भट सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्या हस्ते दीप प्रज्वलीत करून झाले. यावेळी उपायुक्त डॉ. रंजना लाडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, सहाय्यक आयुक्त नरेंद्र बावनकर,



मनपाच्या ज्येष्ठ नागरिक कक्षाचे सचिव व समन्वयक सुरेश रेवतकर, महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिक सल्लागार समितीचे माजी सदस्य हुकुमचंद मिश्रीकोटकर, सिनिअर सिटीझन कौन्सिल ऑफ नागपूर डिस्ट्रिक्ट चे अध्यक्ष मनोहरराव खर्चे, ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे सचिव डॉ. राजू मिश्रा, ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भचे अध्यक्ष प्रभूजी देशपांडे व्यासपीठावर उपस्थित होते. सर्व समावेशक भविष्यासाठी ज्येष्ठ नागरिकांच्या आवाजाला सक्षम बनविणे ही यावर्षी ज्येष्ठ नागरिक दिनाची संकल्पना आहे. यावेळी बोलताना वैष्णवी बी. यांनी नागपूर शहराच्या अमृत महोत्सवी वर्षात ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम नागपूर महानगरपालिका राबवित असल्याचे सांगितले. नागपूर शहराची जडणघडण आपण पाहिली आहे. त्यामुळे शहराचा भविष्यात विकास कसा व्हावा, यासंदर्भात निश्चितपणे आपल्या काही कल्पना असतील.

यासाठी आपण महापालिकेच्या संकेतस्थळावर जाऊन सूचना देऊ शकता. महापालिकेतर्फे संचालित होणाऱ्या विविध योजनांची माहिती महानगरपालिकेने ज्येष्ठ नागरिकांना उपलब्ध करून दिली आहे. ज्येष्ठ नागरिक असले तरी विचाराने अजूनही तरूण असल्याने सूचना महानगरपालिकेसाठी निश्चितपणे महत्त्वपूर्ण ठरणार असून, त्या सूचनांचे स्वागत करू, असे त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष कार्य केलेल्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी काही जणांचा यावेळी वैष्णवी बी. यांच्या हस्ते तुळशीचे रोपटे व महापालिकेच्या मानाचा दुपट्टा देऊन सत्कार करण्यात आला. यात सुरेश रेवतकर, महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिक सल्लागार समितीचे माजी सदस्य हुकुमचंद मिश्रीकोटर सिनिअर सिटीझन कौन्सिल ऑफ नागपूर डिस्ट्रीक्टचे अध्यक्ष मनोहरराव खर्चे, ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठानचे सचिव डॉ. राजू मिश्रा, ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भचे अध्यक्ष प्रभूजी देशपांडे, अविनाश तेलंग, तुलशीदेवी गांधी, मदनमोहन डागा, नामदेवराव फटिंग, ॲड. अजय घारे, दीपक शेंडेकर यांचा समावेश होता.

या कार्यक्रमानंतर यावेळी शेतकऱ्यांच्या जीवनावर रमेश थोरात यांनी पथनाट्य सादर केले. तसेच संजय भाकरे फाऊंडेशन निर्मित बाकी शून्य या ज्येष्ठ नागरिकांच्या वेदनांवर प्रकाश टाकणारे नाटक सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी केले तर आभार ज्येष्ठ नागरिक कक्षाचे सचिव सुरेश रेवतकर यांनी मानले.

# कळमेश्वरचे नगराध्यक्ष पद अनुसूचित जाती करिता राखीव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

दिवाळीनंतर लगेच महाराष्ट्रातील नगरपरिषद तथा नगरपंचायत च्या निवडणुकांचा बिगुल वाजणार आहे. त्याच अनुषंगाने मुंबई येथे नगरपरिषद व नगरपंचायत यांच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले. 2014 ला महायुतीचे सरकार आल्यानंतर त्यांनी थेट नगराध्यक्ष निवडून देण्याचा निर्णय अमलात आणला होता. त्याच अनुषंगाने कळमेश्वर तालुक्यातील महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या कळमेश्वर व त्यासोबतच मोहपा येथील नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. कळमेश्वर नगरपरिषद अध्यक्ष पदाचे आरक्षण अनुसूचित जाती करिता राखीव करण्यात आलेली आहे.

आता या जागे करिता अनुसूचित जातीतील महिला आणि पुरुष दोन्हीही निवडणूक लढू शकतात व मोहपा येथील नगराध्यक्ष पदाचे आरक्षण मागास प्रवर्ग म्हणजे ओबीसी वर्गाकरिता जाहीर झालेले आहेत. तिथे सुद्धा महिला आणि पुरुष निवडणूक लढू शकतात. मागील साडेतीन वर्षापासून येथील निवडणूक प्रलंबित आहे. या ठिकाणी प्रशासकराज अमलात आलेला आहे व या प्रशासक राजाला येथील जनता त्रस्त झालेली आहे जनतेची कामे लवकरात लवकर व्हावी या करिता नगरसेवक व नगराध्यक्ष असणे अतिशय आवश्यक आहे. 2017 जानेवारी ला येथील शेवटची निवडणूक पार पडली होती.

तर यामध्ये कळमेश्वर येथे भारतीय जनता पार्टीच्या स्मृती इखार या थेट नगराध्यक्ष पदाकरिता निवडून आलेल्या होत्या.पण सत्ता मात्र पाच वर्षे उपाध्यक्ष सह काँग्रेस पक्षाने भोगली. पाचही वर्ष इथे तणावाचे वातावरण पाहावयास मिळालेले होते तर मोहपा येथे झालेल्या निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पदासह दहा जागांवर माजी आमदार सुनील केदार गटाने दणदणीत विजय मिळविलेला होता.

# गायत्री पार्क येथे नवरात्रीला विविध कार्यक्रम व रावण दहन

■ महासागर प्रतिनिधी
इसासनी, दि. ६ :

नेहमीप्रमाणे, या वर्षीही, महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर जिल्ह्यातील हिंगणा व तहसीलमधील इसासनी ग्रामपंचायत (वाघधरा) परिसरात रायसोनी एमबीए कॉलेजजवळ असलेल्या रॉयल गायत्री पार्क-२ येथे नवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर शेरवली देवी, माँ दुर्गेची मूर्ती स्थापित करण्यात आली. सोसायटीतील रहिवाशांनी १० दिवस उत्साहाने देवीची पूजा आणि सेवा केली. प्रतिष्ठानेनंतर, परिसरातील मान्यवर आणि बुद्धिजीवींना सोसायटीमध्ये पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले आणि दररोज त्यांच्या हस्ते प्रार्थना करण्यात आली. त्यांच्या उपस्थितीत त्यांच्याच हस्ते माता राणीची आरती करण्यात आली. या अनुषंगाने रॉयल गायत्री पार्क 2 येथे समाजातील राजकीय पक्षांशी संबंधित, पत्रकारितेशी संबंधित, जनकल्याण संघाशी संबंधित, श्री राम सेनेशी निगडित लोकांसह परिसरातील मान्यवर विचारवंत, माजी मंत्री रमेशचंद्र बंग, ग्रामपंचायत इसासनीचे सरपंच अरविंद ढोणे, भाजपचे





जिल्हाध्यक्ष लिलाधर पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.

गिरी, पत्रकार विनायक इंगळे गुरुजी, गंजनन ढाकुलकर, लीलाधर दाभे, प्रफुल्ल पांडे यांच्यासह राजकीय पक्षांचे शशिकांत थोटे, माजी जिल्हा पंचायत सदस्य अर्चना गिरी, सुरेश ठाकरे (गांधी), गीता सुरेश ठाकरे, आदर्श पटले, सुशील दीक्षित, सामाजिक कार्यकर्ते राम कांदळे, श्रीकृष्ण कावळे, श्री. बबलू बनोटे, धनराज वासनिक, दादाराव मेश्राम, मीना मेश्राम, उषा प्रधान, अज्जू भाई देशबंधू, प्रमोद डोंगरे. जन कल्याण संघाचे अरविंद पेटकर, नरेश अंबुले, जामदेन, धर्मेंद्र ठाकरे, कात्रे, देशमुख आणि रामटेके उपस्थित होते. यावर्षी गोंधळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, ज्याचा रहिवाशांनी रात्री उशिरापर्यंत आनंद घेतला. विजय गौरखेडे आणि संगीता गौरखेडे यांनी त्यांच्या विशेष सादरीकरणाने गोंधळ कार्यक्रमाला प्रोत्साहन दिले आणि अमूल्य योगदान दिले.

समिती सदस्यांनी आनंद व्यक्त केला आणि विजय गौरखेडे यांचे शाल आणि नारळ देऊन स्वागत केले. १० दिवस चाललेल्या या कार्यक्रमात पंकज गौरखेडे आणि ज्योती पाटणकर यांनी त्यांच्या सुंदर गाण्यांच्या सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. सोसायटीतील रहिवासी समीर शाह यांनी त्यांच्या गझल आणि संवादांनी कार्यक्रमात एक अनोखी ऊर्जा भरली.

समिती सदस्यांनी विजेत्या मुलांना बक्षीसही दिले. दसऱ्याच्या दिवशी सोसायटीच्या मैदानावर रावण दहन करण्यात आले. सोसायटीच्या तरुण कलाकार शौर्य गौरदीप यांनी भगवान रामाची वेशभूषा केली. आणि एका लहान मुलीने सीता मातेची भूमिका साकारली आणि रावण दहन केले.

नवमीच्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते आणि शेकडो लोकांनी सोसायटीमध्ये उपस्थित राहून महाप्रसाद घेतला. त्याच अनुषंगाने, ३ ऑगस्ट रोजी संध्याकाळी मोठ्या थाटामाटात माता राणीची मूर्ती विसर्जनासाठी सोसायटीबाहेर काढण्यात आली. या शुभ प्रसंगी, सोसायटीतील महिला, पुरुष आणि मुलांनी डीजेच्या तालावर भरपूर नाच केला. सोसायटीचे सचिव प्रदीप नकाटे, मुकेश नंदनवार, ज्ञानेश्वर गौतम, पंकज गौरदीपे, प्रफुल्ल जयसिंगपुरे, अमोल वासु, पराते जी, रफिक भाई, संदीप महानदे, विजय गोरखेडे, राजेश रेवतकर आणि पत्रकार प्रफुल्ल पाटणकर यांचे हा कार्यक्रम यशस्वी करण्यात विशेष योगदान होते.

# सुरक्षा रक्षकाचा चिमुकलीवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

निमाणाधिन इमारतीत काम करणाऱ्या मजूर दाम्पत्याच्या ५ वर्षीय मुलीवर तेथीलच नराधम सुरक्षा रक्षकाने लैंगिक अत्याचार केला. हे कुकृत्य करताना तो स्थानिक नागरिकांना दिसला. संतप्त नागरिकांनी आरोपी सुरक्षा रक्षकाला पकडून चांगला चोप दिला आणि नंतर पोलिसांच्या स्वाधिन केले. माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली. शुभम ज्ञानेश्वर इखार (३१) रा. अयोध्यानगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बेलतरोडी ठाण्याच्या हद्दित सिंगापूर सिटीचे बांधकाम सुरू आहे. पीडित चिमुकलीचे आई-वडील येथे मजुरीसाठी आले होते. आरोपी शुभम दोन दिवसांपूर्वीच तेथे सुरक्षा रक्षक म्हणून नोकरीला लागला होता. शुक्रवारी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास चिमुकलीचे आई-वडील कामात व्यस्त होते. या संधीचा फायदा घेत आरोपी शुभम पीडितेला एका निमाणाधिन इमारतीच्या ५ व्या माळ्यावर घेऊन गेला. परिसरात काही कुटुंब आधीपासूनच राहात आहेत. स्थानिक नागरिक काही कामाने ५ व्या माळ्यावर गेले असता शुभम पीडितेवर अत्याचार करताना दिसला. त्याचे कुकृत्य पाहून लोकांमध्ये रोष पसरला. त्यांनी शुभमला पकडून घटनेची माहिती पीडितेच्या आई-वडिलांना

**आरोपीला २ दिवसांचा पीसीआर**

पोलिसांनी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून शुभमविरुद्ध लैंगिक अत्याचार आणि पोक्सो ॲक्टच्या कलमान्वये गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. प्राथमिक तपासात शुभम हा मानसिक रोगी असल्याची माहिती पुढे आली आहे. त्याने तिने त्याच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती दिली. पोलिसांनी शुभमला न्यायालयात हजर केले असता त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

दिली. एकाने नियंत्रण कक्षाला माहिती दिली. बेलतरोडीचे ठाणेदार मुकुंद कवाडे आणि पोउपनि चौधरी पथकासह घटनास्थळी पोहोचले. तोपर्यंत नागरिकांनी शुभमला चांगला चोप दिलेला होता.



नागपूर : प्रभाग १०, प्लॉट नं १००, कामगार नगर येथील नवशक्ती दुर्गा उत्सव मंडळातर्फे देवी विसर्जन करण्यात आले. यावेळी कविता चितारे, स्वाति चितारे, अनीता वाघमारे, मनीषा वाघमारे, शारदा श्रीवास्तव, दुर्गा टेकाडे नमिता चोपकर उपस्थित होते.

# जयंती नगरीमध्ये नवरात्री गरबा व रावण दहन उत्सव साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

जयन्ती नगरी-2 मध्ये यावर्षी नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने दहा दिवसांचा गरबा महोत्सव मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. माँ दुर्गेची आराधना आणि सांस्कृतिक परंपरांनी नटलेला हा महोत्सव दसरा पर्वाच्या दिवशी संपन्न झाला. यातील प्रमुख आकर्षण होते 36 फूट उंच रावण दहनाचे भव्य आयोजन.

शेकडोंच्या संख्येने नगरी-2 शी संलग्न सर्व सोसायट्या तसेच बेस्ट बेलतरोडी येथील नागरिक या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी झाले आणि आतिषबाजीच्या प्रकाशात सजलेल्या या देखाव्याचा आनंद लुटला.

विशेष म्हणजे, गेली 12 वर्षे जयन्ती नगरी-2 मध्ये या सनातन धर्मपरंपरेचे पालन होत आहे. यावर्षी देखील या उत्सवाचे केंद्रबिंदू ठरले येथील तरुण प्रोफेशनल्स, ज्यांनी



आपल्या-आपल्या कार्यक्षेत्रातील व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून 36 फूट उंच रावणाची निर्मिती केली आणि या परंपरेला अधिक जिवंत बनवले. हा उत्सव केवळ धार्मिक व सांस्कृतिक आनंदाचा प्रतीक ठरला नाही, तर समाजातील एकता, सहभाग आणि तरुणांची निष्ठा यांचेही अनुपम उदाहरण म्हणून पुढे आला.

# कारने चिमुकल्याला चिरडले

**नागपूर :** चालकाने निष्काळजीपणे कार पार्क करीत एका चार वर्षाच्या चिमुकल्याला चाकाखाली चिरडले. गंभीर जखमी चिमुकल्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना पारडी ठाण्यांतर्गत सोनबानगर परिसरात घडली. या घटनेने संपूर्ण परिसरात शोक पसरला आहे. कान्हा राहुल देशमुख असे मृत चिमुकल्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राहुल देशमुख हे कुटुंबासह सोनबानगर रेल्वे क्रॉसिंग रोडवर राहतात. शनिवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास कान्हा घरापुढे वाळूच्या ढिगावर खेळत होता. या दरम्यान शेजारी राहणाऱ्या नीलेश ज्ञानेश्वर सतीबावणे (३५) हा त्याच्या एमएच-४३/एडब्ल्यू-१२५६ क्रमांकाची कार घेऊन तेथे आला.

# अखेर डॉ. पालटेवारला अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

तब्बल १८ दिवसांच्या विलंबानंतर अखेर आर्थिक गुन्हे शाखा (ईओडब्ल्यू)ने रामदासपेठच्या मेडिट्रीना रुग्णालयात झालेल्या १६.८३ कोटींचा घोटाळा प्रकरणात आरोपी डॉ. समीर पालटेवारला अटक केली आहे. एक दिवसापूर्वीच अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. व्ही. धुळधुळे यांनी पालटेवार दाम्पत्यासह या घोटाळ्यात सामील १३ आरोपींचा अंतरिम जामीन अर्ज फेटाळला होता. यावेळी न्या. धुळधुळे यांनी दिलेल्या निरीक्षणात स्पष्ट नमूद केले की डॉ. समीर पालटेवार याने इतर १३ जणांसह अनेक शेल कंपन्या स्थापन करून मेडिट्रिना हॉस्पिटलमधून निधी वळविला.

आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा (ईओडब्ल्यू)ने रुग्णालयाचे भागीदार गणेश चक्करवार यांच्या तक्रारीवरून डॉ. पालतेवारसह १७ जण व फर्मविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविला होता. इतर आरोपींमध्ये रुग्णालयाचा लेखापाल अर्पण किशोर पांडे, किशोर विनायक पांडे, अभिषेक किशोर पांडे, ॲबस्ट्रॅक्ट आयटी ग्रूपचा भागीदार आकाश मधुकर केदार, रीता मुकेश बडवाईक, वैशाली रामदास बडवाईक, तृप्ती प्रकाश घोडे, एम.एस.सेवा हेल्थकेअरचा संचालक सर्व्हेस ढोमणे, प्रियंका सर्व्हेस ढोमणे, १६ अलाईड हेल्थ केअर सर्व्हीसेसची संचालक कल्याणी बडवाईक आणि नईम दिवानी याचा समावेश आहे. १७ सप्टेंबर २०२५ रोजी, आर्थिक गुन्हे शाखेने सीताबर्डी पोलिस ठाण्यामार्फत डॉ. समीर पालटेवार, पत्नी सोनाली आणि इतर १३ जणांविरुद्ध पाचवा गुन्हा दाखल केला.

# एमबीबीएस प्रवेशाच्या नावावर २५.६० लाखांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

एमबीबीएसमध्ये प्रवेश मिळवून देण्याच्या नावावर २५.६० लाखांचा गंडा घातल्याप्रकरणी प्लेसमेंट एजन्सीच्या संचालकासह चार आरोपींवर सक्करदरा पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे. अतुल रमेश इंगोले, व्यंकट रेड्डी रा. इरागुडा-हैदराबाद, उमंग पटेल रा. अहमदाबाद-गुजरात आणि शितल रा. सक्करदरा अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी समृद्धी राजू पराते (२१) रा. महाजन लेआऊट, सावनेरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. अतुल हा रेशीमबागच्या प्रगती हाईट्स येथील पिपललिंक प्लेसमेंट प्रा. लि. कंपनीचा संचालक आहे. २०२२ मध्ये समृद्धीला एमबीबीएसमध्ये प्रवेश घ्यायचा होता. या दरम्यान तिला पेपरमध्ये पिपललिंक प्लेसमेंट कंपनीची जाहिरात दिसली. तिने रेशीमबाग येथील कार्यालयात जाऊन अतुलची भेट घेतली. अतुलने तिला, अहमदनगरच्या कोपरगाव येथील आर.जे.एस. कॉलेजचे कोलंबस सेंट्रल विद्यापीठ अमेरिकासोबत टायअप असल्याची माहिती दिली. तसेच व्यंकट हा कोलंबस विद्यापीठाचा निदेशक, तर अमंग पटेल हा सीईओ असल्याचे सांगितले. आरोपींनी समृद्धीला कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून देण्याची थाप मारली. बेसिक प्रशिक्षण नोंदणी, खानावळ, वसतिगृह, प्रथम आणि द्वितीय वर्षाचे शुल्क म्हणून वेळोवेळी ऑनलाईन आणि रोख २८.६० लाख रुपये घेतले. आरोपींनी विद्यापीठाच्या नावाने बनावट ईमेल आयडी तयार करून समृद्धीला एमबीबीएस प्रथम वर्षाची पावती, गुणपत्रिका, विद्यार्थी ओळखपत्र आणि प्रोजेक्शन लेटर मेल केले.

**महासागर प्रभाग वार्ता**

# समता नगर ते विटभट्टी रोड बनला धोकादायक, प्रशासन निष्क्रीय

प्रभू गजभिये,
नागपूर दि. ६

प्रभाग क्रमांक २ -समता नगर साहू पान पैलेस ते विटभट्टी रोडपर्यंत बनवण्यात आलेल्या मुख्य रस्त्यावर सध्या मोठ्या खड्ड्यांनी जीवघेणे रूप धारण केले आहे. या रस्त्यावर पावसाळ्यात सतत पाणी साचते आणि खड्डे दिसत नसल्यामुळे नागरिकांचे जीव धोक्यात येत आहेत.

प्रवेशद्वाराजवळ असलेल्या खड्ड्यांमुळे शाळेत जाणारी मुले, आपत्कालीन रुग्ण, सामान्य नागरिक यांना दररोज त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा अपघात झाले असून, जनतेच्या जीवमालाची हानी होत आहे.विशेष म्हणजे, या रस्त्यावर २०१७ ते २०२२ दरम्यान कार्यरत असलेल्या नगरसेविकेचे कार्यालय व निवास आहे. याच परिसरात उत्तर नागपूरचे आमदार यांचे मिलेनियम कॉलेज देखील आहे. तरी देखील आजवर या रस्त्याकडे कोणतेही लक्ष दिले गेलेले नाही. ना नगरसेवक सक्रिय



आहेत, ना आमदारांनी कोणतीही कारवाई केली आहे.जेव्हा नागरिकांनी ही बाब कडे नेली, तेव्हा त्यांना केवळ एकच उत्तर मिळाले ‘‘आपला परिसर अनधिकृत आहे.‘‘ असे उत्तर देऊन प्रशासन हात झटकते, पण प्रश्न असा आहे की, मग जनतेने जिवावर उदार होऊन वाट पहायची का?

‘‘जनतेच्या जीवमालावर सत्ताधाऱ्यांकडून डोळेझाक का केली जातेय? प्रशासन जनजागृती अभियान चालवत नाही, अथवा डिमांडची प्रक्रिया का होत नाही? तत्काळ रस्त्याची डागडुजी/पुनर्बांधणी करण्यात यावी.,जलनिकासीची योग्य व्यवस्था केली जावी.नियमित देखभाल व दुरुस्तीसाठी स्थायी निधीची तरतूद करण्यात यावी.नागरिकांसोबत जनजागृती बैठकांचे आयोजन करण्यात यावे. ह्या मागण्या प्रवीण वासनिक, प्रणय वासनिक, विनोद मेश्राम, रमेश साहू, राकेश साहू, प्रफुल मोहोड, अजय नागदेवे, प्रतीक वाडके, चंद्रशेखर कोटांगले, अमर कोटांगले, सुशील मारापे, मैक्श बोधी, सेवक पटले, आकाश ठाकरे ,संकेत ठाकरे, मुकेश भगत, विनोद कटरे ,किशोर सांगोळे यांनी केली आहे.

# प्रभाग क्रमांक ३ परिसरात खराब रस्त्यांमुळे नागरिक त्रस्त

प्रदीप पौनिकर,
नागपूर दि. ६

प्रभाग क्र.३,निजाममुद्दीन कॉलोनी, यशोधरा नगर, विटा भट्टी चौक या परिसरात रस्ता खराब झाल्याने नागरिक हैराण आहेत.

कॉलोनी मध्ये जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था ही एक मोठी समस्या बनली आहे. रस्ते खराब झाले यामुळे नागरिकांना अनेक अडचणी येत आहेत, जसे की दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे नुकसान, अपघात होण्याची शक्यता, पावसाचे पाणी साचल्यामुळे रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्यानी नागरिकांना वाहतूक करणे कठीण झाले आहे .रस्त्यांची नियमित देखभाल आणि दुरुस्ती केली जात नाही, ज्यामुळे रस्त्यांची अवस्था खूप खराब झाली आहे.

आसीनगर झोनचे सहाय्यक आयुक्त यांना अनेकदा तक्रार केल्यानंतर ही रस्त्याचे काम हे तसेच आहे जर लवकरात लवकर रस्ता बनवला नाही तर स्थानिक नागरिकांचा



आणि आम आदमी पक्षाचा वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

यावेळी प्रदिप पौनिकर, सारिका भगत, शुभम मोरे, अब्दुल सलाम, अविनाश सोरते, हर्ष चरडे आम आदमी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# वासवानी दवाखान्यासमोर ४ फूट खोल खड्डा अपघातांची शक्यता

प्रमोद जांभूळकर
नागपूर दि.६

प्रभाग ७ अंतर्गत येणाऱ्या इंदोरा-जरीपटका रोडवर वासवानी दाताच्या दवाखान्यासमोर रस्त्यात मोठा खड्डा पडल्यामुळे नागरिकांचे मोठे हाल सुरू आहेत. सदर खड्डा अंदाजे ४ फूट खोल असून, या खड्ड्यामुळे परिसरात अपघाताची भीती निर्माण झाली आहे.दवाखान्यात उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांचे चाक बारंवार खड्ड्यात अडकत असून, वाहनांचा तोल जाऊन अपघात होत आहेत.

विशेषत: दुचाकीस्वार व वृद्ध नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.सदर भागात



अनेक लहान मुले खेळत असतात. ते चेंडूच्या मागे खड्ड्याजवळ जात असताना त्यांना पाय मुरगळून दुखापत होण्याचा धोका सतत निर्माण होत आहे.या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधून देत तातडीने खड्डा बुजवण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप ढोले, विजय वाघमारे, गोल्डी डोंगरे, यश वाघमारे, संजय रामटेके, जीतू गोडबोले, रक्षित फुलझेले, सागर डोंगरे, निखिल नंदेश्वर, निलेश बोरकर आदींनी केली आहे.

नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा खड्डा लवकरात लवकर बुजवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.